महाराष्ट्र पोलीस दलाचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक

- कथा
- लेख
- कविता
- ललित लेख

Vol : 52 | Issue : 11 | Mumbai | Marathi Monthly | August 2026 | Pages 84 | RNI No. 21352 | Price : Rs. 30 /-



## सर्वोत्कृष्ट गुन्हेतपास व सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पारितोषिक

## गडचिरोली येथे दूरदृश्य प्रणालीद्वारे २२ मिनी सेतू केंद्रांचे मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

## दक्षता मासिकाचा सतीश राजवाडे यांच्याशी विशेष संवाद

# निर्विघ्न आषाढी वारीसाठी पोलिसांचे योगदान

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक...

## आता दक्षता पीडीएफ स्वरूपात
## महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावर
## मोफत उपलब्ध!

**S.B.Collect**

छापील मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी
https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php
*अथवा*
खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा.




**दक्षता छापील अंकाची नियमित मासिक वर्गणी रु. ३०/-**
**वार्षिक वर्गणी रु. ३००/- फक्त**

**वेबसाईटवर दक्षता मासिक मोफत वाचण्यासाठी : https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/**
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

**https://www.mahapolice.gov.in/ dakshata-magazine**

YouTube MAHARASHTRA POLICE HEADQUARTERS- DAKSHATA अंतर्गत नव्या यु-ट्युब चॅनलवर ऐका दक्षता मासिकातील दर महिन्याची उत्कृष्ट तपासकथा ऑडिओ-व्हिज्युअल स्वरूपात.

पत्रव्यवहारासाठी पत्ता: महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१,
वर्गणीसाठी दूरध्वनी: ०२२-२२०४९७०१, email: mpd.dakshata@mahapolice.gov.in

**पोलीस आणि जनता यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामध्ये आपणही सहभागी व्हा!**




ऑगस्ट २०२६ । वर्ष ५२ वे । अंक ११ वा

**मार्गदर्शन**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक
महाराष्ट्र राज्य, मुंबई

**रामनाथ ल. पोकळे**
पोलीस महानिरीक्षक
(नि. व स.)

**मुद्रक/ प्रकाशक/ सरसंपादक**
**सुहास बावचे**
सहायक पोलीस महानिरीक्षक

**सहभाग**
**विजय मनोहर खरात**

**अंकरचना व अंतर्गत व्यवस्थापन**
**सुरेंद्र बनगे**
कार्यालय अधीक्षक

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
सरसंपादक दक्षता
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई ४००००१
दूरध्वनी:०२२ २२०४९७०१/२२८३४५११
mpd.dakshata@mahapolice.gov.in

**वितरण व्यवस्था**
वर्गणीसाठी संपर्क
दूरध्वनी : ०२२ २२०४९७०१

**मांडणी, मुद्रण व प्रकाशन**
? यांनी महाराष्ट्र स्टेट पोलीस वेल्फेअर फंड यांचेकरिता मे. प्रिंट प्लस प्रा. लि. २१२, स्वस्तिक चेंबर्स, एस टी रोड, चेंबूर, मुंबई ४०००७१ येथे मुद्रित करून महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४००००१ येथून प्रसिद्ध केले.
१०२, आर विंग, मोहन पाम्स, चैतन्य विद्यालयाजवळ, शिरगांव, बदलापूर, जि. ठाणे
नागरिकत्व भारतीय

एकूण पृष्ठे ८४

*या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ अथवा महाराष्ट्र राज्य पोलीस दल सहमत असेलच असे नाही.*

# संपादकीय...

सस्नेह नमस्कार. भक्ती, सेवा, समता आणि वारकरी परंपरेचे प्रतीक मानल्या गेलेल्या आषाढी एकादशीचा सोहळा नुकताच संपन्न झाला.विठ्ठलाच्या ओढीने पंढरपूरकडे जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांची आपल्या दैवताशी भेट झाली. त्याचवेळी कामाप्रती निष्ठा हाच देव मानणाऱ्या पोलीस बांधवांनी वारकऱ्यांचा प्रवास विनासायास, निर्विघ्न पार पडावा यासाठी आपले कर्तव्य चोख बजावले. यासाठी केलेले नियोजन आणि त्याची अंमलबजावणी यांवर प्रकाश टाकणारा लेख अंकात समाविष्ट करत आहोत.

नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात पोलीस दलाची भूमिका जनतेच्या सुरक्षेपलीकडे जाऊन नागरिकांबरोबर विश्वासाचे नाते प्रस्थापित करणारी यंत्रणा अशी ठरली आहे. जिल्हा पोलीस दलाने समाजोपयोगी उपक्रमांची लोकसहभागातून अंमलबजावणी करत सकारात्मक सामाजिक संदेशांचा प्रसार करण्याचे व्रत अंगिकारले आहे. त्यातूनच प्रत्येक जागतिक दिनाला कृतिशील स्वरूप देण्याचा नवा आणि अनोखा पायंडा पोलिसांनी पाडला आहे. जून महिन्यात साजऱ्या होणाऱ्या विविध जागतिक दिनांच्या पार्श्वभूमीवर अनेक उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांचा वृत्तांत अंकात प्रकाशित करण्यात आलेला आहे.

गडचिरोलीमधील दुर्गम भागातील नागरिकांना शासकीय सेवांचा गावातच लाभ घेता यावा यासाठी २२ मिनी सेतू केंद्रे उभारण्यात आली आहेत. रहिवासी, जात, उत्पन्न, जन्म इत्यादींचे दाखले, महाआयडी नोंदणी, आधार सेवा, बँकिंग सुविधा, विविध शासकीय योजनांचे अर्ज व पेन्शन सेवा सदर ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे शासनाच्या योजना प्रभावीपणे सर्वदूर पोहोचवणे शक्य होणार आहे. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या या केंद्रांच्या लोकार्पण सोहळ्याचे वृत्त अंकात देत आहोत.

राज्यातील पोलीस घटकांअंतर्गत अपहृत/ हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी दिनांक ०८ ते २३ जून २०२६ दरम्यान ऑपरेशन शोध IV मोहीम राबवण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान छत्रपती संभाजीनगर ग्रामीण घटकातील रेकॉर्डवरील १३ मुली व चार मुले अशा एकूण १७ अपहृत/ हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यात आला आहे. त्यासंबंधीचा वृत्तांत प्रकाशित करण्यात आला आहे.

याखेरीज श्री. जयंत नाईकनवरे, श्री. सूरजश वांदिले, श्री. एस. वाय. संदे, श्री. रामकृष्ण अघोर, श्री. अनिल जावकर, श्री. बाबर शेख यांचे आशयसंपन्न लेख अंकाची उपयुक्तता वाढवण्याबरोबर मनोरंजनात्मक मूल्यातही भर घालतील असा विश्वास वाटतो. त्याचप्रमाणे अंकात तपासकथा, पाककृती, शब्दकोडे ही नेहमीची सदरे अंतर्भूत आहेतच. वाचकवर्ग अंकाचे स्वागत करेल ही अपेक्षा.

**आपला स्नेहांकित,**



**(सुहास बावचे)**
**सहायक पोलीस महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# सेवा, सुरक्षा व समर्पण : महाराष्ट्र पोलिसांची ओळख



> आषाढी वारीदरम्यान इंटीग्रेटेड कंट्रोल रूम आणि ड्रोनद्वारे प्राप्त होणाऱ्या लाईव्ह फीडवर देखरेख करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात आले. एसडीआरएफ व एनडीआरएफ पथके आवश्यक सुरक्षा साधनसामग्रीसह तैनात करण्यात आली होती. तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीसाठी बंदोबस्ताचे काटेकोर नियोजन करण्यात आले.

सस्नेह नमस्कार.

सोलापूर ग्रामीण घटकामध्ये आषाढी वारी २०२६ साठी झालेल्या तयारीचा आढावा घेण्यासाठी पंढरपूर येथे आढावा बैठक घेण्यात येऊन त्यात बंदोबस्ताच्या अनुषंगाने अनेक मुद्द्यांची चर्चा करण्यात आली. त्यानुसार पंढरपूरच्या आषाढी वारीचे नियोजन करण्यात आले. यात वारीच्या बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांची दर चार तासांनी तपासणी करून त्याची नोंद ठेवणे, त्यांच्यासाठी चहा, पाणी, भोजन व निवासाची व्यवस्था करणे, गरजेनुसार अतिरिक्त बंदोबस्ताची व मनुष्यबळाची तरतूद करणे, वारी निर्विघ्नपणे पार पडावी यासाठी पंढरपूर शहरात वाहतुकीचे सुयोग्य नियोजन आणि अवजड वाहनांना प्रतिबंध, पालखी मार्ग, महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे व पार्किंग परिसर अशा ठिकाणांचे सीसीटीव्हीच्या साहाय्याने संनिरीक्षण अशा अनेक मुद्द्यांचा अवलंब करण्याच्या सूचना देण्यात आल्या. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून Deep Search Metal Detector, Bomb Detection and Disposal Squad, Dog Squad यांचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर देण्यात आला. वारीदरम्यान इंटीग्रेटेड कंट्रोल रूम आणि ड्रोनद्वारे प्राप्त होणाऱ्या लाईव्ह फीडवर देखरेख करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात आले. एसडीआरएफ व एनडीआरएफ पथके आवश्यक सुरक्षा सामग्रीसह तैनात करण्यात आली. तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटीसाठी बंदोबस्ताचे काटेकोर नियोजन करण्यात आले. पोलीस दल आणि त्याला जनतेने केलेले सहकार्य यांमुळे वारी निर्विघ्न पार पडली आहे.

नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात पोलीस दलाची भूमिका केवळ जनतेच्या सुरक्षिततेपुरती मर्यादित न राहता समाजाशी विश्वासाचे नाते निर्माण करणाऱ्या जनताभिमुख संस्थेची ठरली आहे. समाजोपयोगी उपक्रमांची लोकसहभागातून अंमलबजावणी, सकारात्मक सामाजिक संदेशांचे प्रदान आणि प्रत्येक जागतिक दिनाला दिलेले कृतिशील स्वरूप ही आज येथील पोलीस दलाची ओळख बनलेली आहे. जून महिन्यातदेखील विविध जागतिक दिनांच्या पार्श्वभूमीवर अनेक उपक्रम राबवण्यात आले. त्या अनुषंगाने दिनांक ३ जून २०२६ रोजी जागतिक सायकल दिनी आयोजित करण्यात आलेली व पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार, इंधन बचत आणि शारीरिक स्वास्थ्याची जपणूक यांचा संदेश देणारी सायकल रॅली, दिनांक ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करण्यात आलेली २,५०० पेक्षा जास्त वृक्षांची लागवड आणि त्यांच्या संवर्धनाची प्रतिज्ञा, दिनांक १४ जून रोजी जागतिक रक्तदाता दिनानिमित्त पार पडलेली ६ रक्तदान शिबिरे, तसेच दिनांक २६ जून रोजी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने संपन्न झालेली 'ड्रग फ्री गडचिरोली' मॅरेथॉन या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून जिल्हा पोलीस दल आणि नागरिक यांच्यातील परस्परविश्वासाचे संबंध अधिक दृढ झाले आहेत. जिल्ह्यातील अत्यंत





**दूरदृश्य प्रणालीद्वारे २२ मिनी सेतू केंद्रांचे लोकार्पण करताना मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. देवेंद्र फडणवीस व राज्याचे मुख्य सचिव श्री. राजेश अग्रवाल**

दुर्गम व संवेदनशील भागातील नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देण्यासाठी २२ मिनी सेतू केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. भामरागड व एटापल्ली तालुक्यातील २२ मिनी सेतू केंद्रांमध्ये ९ आदीसेवा केंद्रे आणि १३ पोलीस दादालोरा खिडकी केंद्रांचे रूपांतर करून निर्माण केलेली मिनी सेतू केंद्रे यांचा समावेश आहे. या केंद्रांवर रहिवासी, जात, उत्पन्न, जन्म आदी दाखले, महाआयडी नोंदणी, आधार सेवा, बँकिंग सुविधा, विविध शासकीय योजनांचे अर्ज व पेन्शन सेवा या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामुळे दुर्गम परिसरातील जनतेपर्यंत शासनाच्या सर्व योजना प्रभावीपणे पोहोचवणे शक्य होणार आहे.

महाराष्ट्र पोलीस दलातील प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुरक्षित शस्त्र हाताळणी आणि नियंत्रित व अचूक नेमबाजी कौशल्य या अनुषंगाने प्रशिक्षित करण्याच्या मुख्य उद्देशाने राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १, पुणे येथे दिनांक ०९ मार्च २०२६ पासून फायरिंग प्रशिक्षक (टीओटी) प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. यामुळे नेमबाजीत उत्कृष्ट कामगिरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांची पोलीस दलाला ओळख करून देणे तसेच त्यांना योग्य प्रकारे प्रोत्साहित करून पोलीस दलामध्ये व्यावसायिक उत्कृष्टतेची संस्कृती अधिक दृढ करणे शक्य होणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संबंधित प्रशिक्षकांनी आपापल्या मूळ घटकांमध्ये नियमितपणे दोन किंवा तीन दिवसीय शस्त्र सुरक्षा व गोळीबार प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणे आणि त्यानंतर वार्षिक गोळीबार सराव आयोजित करणे अपेक्षित आहे. सदर प्रशिक्षणात प्रत्येक घटकातील मुख्यालयात नेमणुकीस असलेले एक अधिकारी व नऊ प्रशिक्षक अशा एकूण १० प्रशिक्षणार्थींचा समावेश केला जातो. दिनांक १३ जून २०२६ रोजी फायरिंग प्रशिक्षक (टीओटी) प्रशिक्षण सत्र क्रमांक १० चा सांगता समारंभ पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे पार पडला. यावेळी फायरिंग प्रशिक्षक (टीओटी) प्रशिक्षण याबाबत आढावा घेण्यात आला. याप्रसंगी प्रशिक्षण सत्र क्रमांक १० मधील सहभागी घटक प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षणाबाबतचे अभिप्राय जाणून घेण्यात आले. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गुणवंत प्रशिक्षणार्थी यांचा पदक आणि चषक देऊन गौरव करण्यात आला.

आपत्कालीन प्रसंगी राज्यातील नागरिकांना पोलिसांची मदत तत्काळ उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली – डायल ११२' प्रकल्प कार्यान्वित आहे. २४×७ सज्ज असलेल्या राज्यभरातील ४४ पोलीस घटकांच्या माध्यमातून आपद्ग्रस्तांना त्वरित प्रतिसाद देण्यात येतो. सदर प्रणालीमुळे आज राज्यातील महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुले यांच्यासंबंधीच्या गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण घटत असल्याचा प्रत्यय येत आहे.

मे २०२६ करिता सर्वोत्कृष्ट गुन्हा उकल या पारितोषिकासाठी अकोला पोलीस घटकातील अकोट पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर २४४/२०२६, तर सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी पारितोषिकासाठी नाशिक शहर पोलीस घटकातील पंचवटी पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर ३१८/२०१८ आणि नंदुरबार पोलीस घटकातील नंदुरबार तालुका पोलीस ठाणे येथील गु. रजि. नंबर ११२/२०२५ या गुन्हेतपासाची निवड करण्यात आली. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा. जयहिंद!

**आपला स्नेहांकित,**

सदानंद दाते

**सदानंद दाते**
**पोलीस महासंचालक,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

# अंतरंग

## ऑगस्ट २०२६

### पोलीस विशेष




०७. आषाढी वारीसाठी पोलिसांचे योगदान

१०. गडचिरोलीतील २२ मिनी सेतू केंद्रांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण
दुर्गम भागात लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाला नवी दिशा
प्रशासनाचा लोकाभिमुख चेहरा कामातून दिसावा





२४. समाजहित, जनजागृती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची वाटचाल:
जून महिन्यातील जागतिक दिनांच्या निमित्ताने गडचिरोली पोलीस दलाचे लोकाभिमुख उपक्रम – **एम. रमेश, पोलीस अधीक्षक, गडचिरोली**

३३. ऑपरेशन शोध-४ अंतर्गत १७ लेकरं सुखरूप कुटुंबात परतली.
पोलिसांच्या अथक प्रयत्नांनी १७ कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा फुलला आनंद..





७६. डायल ११२ च्या तत्परतेमुळे अपहृत तरुणीची तीन तासांमध्ये सुखरूप सुटका


### मुलाखत


१३. कला, सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्तीचा त्रिवेणी संगम
'पुढच्या शुक्रवारी ७ वाजता' दक्षता मासिकाचा सतीश राजवाडे यांच्याशी विशेष संवाद


### छायाचित्र दालन




१८. सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी - पोलीस सन्मान सोहळा


### कविता


४६. संघर्ष – **दिनेश बारी**

५४. पंढरपूर वारी आणि पोलिसांचे योगदान – **अमोल फटांगरे**

७७. निसर्गगीत –**बाळकृष्ण ठाणगे**


### लेख




२९. पोलीस प्रतिमा – **जयंत नाईकनवरे**

४४. आई-बाप म्हणून तुम्ही जिंकलातच...! – **बाबर शेख**

६३. एमपीएससी पूर्व परीक्षा यशासाठी आवश्यक वाचनसूची – **एस. वाय. संदे**

६६. 'नि'चे निर्मल, निर्व्याज निवेदन – **अनिल जावकर**


### नवी दिशा... नवीन संधी




३९. इन्फ्ल्युअन्सर्स आणि क्रिएटर इकॉनॉमीचा उदय – **सुरेश वांदिले**


### कथा


५३. लाडका मोत्या – **मीना म्हसे**

५५. संधीचे सोने – **रामकृष्ण अघोर**

७४. प्रयत्ने वाळूचे कण रगडता... – **सचिन बेंडभर**


### तपासकथा




२०. ज्वाळा – **विजय ढमाळ, पोलीस निरीक्षक, पंचवटी पोलीस ठाणे, नाशिक**

३६. लांडगा – **सुनील भाबड, पोलीस निरीक्षक, नंदुरबार तालुका पोलीस ठाणे, नंदुरबार**

४७. वेळही आली होती... – **रामदास वाकोडे, पोलीस निरीक्षक, रावेर पोलीस स्टेशन, जळगाव**

५७. छत्रपती संभाजीनगर (ग्रा.) पोलिसांची तांत्रिक झेप : 'ई साक्ष'ची न्यायालयाने प्रथमच घेतली दखल – **रविकिरण नरवडे, पोलीस निरीक्षक, चिखलठाणा पोलीस ठाणे, छ. संभाजीनगर (ग्रा.)**

७०. उलगडा – **राष्ट्रपाल लोखंडे, पोलीस उपनिरीक्षक एमआयडीसी पोलीस ठाणे, लातूर**





### ७९. पाककृती

### ८१. शब्दकोडे

# आषाढी वारीसाठी पोलिसांचे योगदान

आषाढी एकादशीचे तमाम मराठी जनसमुदायासाठी एक आगळे महत्त्व आहे. या दिवशी राज्याच्या कानाकोपऱ्यातून अनेक वारकरी पायी चालत जाऊन विठूरायाचे दर्शन घेतात. वारकऱ्यांची कोणतीही असुविधा होऊ नये म्हणून त्या मार्गावर सर्व ठिकाणी सर्व शासकीय यंत्रणा तत्परतेने आपले कार्य करत असतात. सालाबादप्रमाणे या वर्षी वारकऱ्यांना सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र पोलिसांनी करावयाच्या उपाययोजना व वारीची तयारी याबद्दलची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्याविषयीचा वृत्तांत सदर लेखात दिला आहे.



सोलापूर ग्रामीण घटकामध्ये आषाढी वारी – २०२६ बंदोबस्ताच्या अनुषंगाने मा. श्री. सदानंद दाते, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी १३ जुलै २०२६ रोजी सायं. ०५.०० वा. पोलीस संकुल, पंढरपूर येथील सभागृहामध्ये आढावा बैठक घेतली.

सदर बैठकीस मा. पोलीस महासंचालक श्री. सदानंद दाते, श्री शिरीष जैन, आयुक्त, महाराष्ट्र राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई, श्री रंजन कुमार शर्मा, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर, श्री एस. कार्तिकेयन, जिल्हाधिकारी, सोलापूर, श्री. कुशल जैन, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर, श्री. जयदीप प्रदक्षिणे, वरिष्ठ रेल्वे अधिकारी, तसेच इतर अधिकारी उपस्थित होते.

बैठकीच्या प्रारंभी श्री. अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी PowerPoint Presentation (PPT) द्वारे 'आषाढी वारी– २०२६' बंदोबस्ताची



तयारी, नियोजन, संभाव्य धोके (Risk Factors) व प्रस्तावित उपाययोजना यांचे सविस्तर सादरीकरण केले. सादरीकरणानंतर मा. पोलीस महासंचालक यांनी बंदोबस्त अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी मा. पोलीस महासंचालक महोदयांनी खालीलप्रमाणे महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

१. बंदोबस्तावर नियुक्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांची प्रत्येक चार तासांनी प्रत्यक्ष तपासणी करून त्याची नोंद ठेवावी.

२. बंदोबस्तावरील सर्व अधिकारी व अंमलदार यांच्यासाठी चहा, पिण्याचे पाणी, भोजन व निवासाची योग्य व्यवस्था करावी.

३. आवश्यकतेनुसार अतिरिक्त बंदोबस्ताची मागणी करावी. उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाचा योग्य व प्रभावी वापर करावा.

४. पंढरपूर शहरात जड वाहतूक (Heavy Vehicles) प्रवेश होऊ नये यासाठी योग्य वाहतूक नियोजन करावे. तसेच आवश्यक ठिकाणी टोईंग व्हॅन तैनात कराव्यात.

५. पालखी मार्ग, महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे व पार्किंग परिसर येथे सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करून त्यांचे निरीक्षण करावे.

६. Deep Search Metal Detector (DSMD) चा व्यापक वापर करावा तसेच Vehicle Mounted DSMD द्वारे पालखी मार्गाचे तपासणी अभियान राबवावे.

७. Bomb Detection and Disposal Squad (BDDS) मार्फत नियमित Anti &Sabotage Checking करून DSMD चा प्रभावी वापर करावा.

८. Anti &Sabotage Checking व DSMD पथकांची जास्तीत जास्त तैनाती करून संवेदनशील ठिकाणी सातत्याने तपासणी करावी.

९. Integrated Control Room मध्ये तसेच ड्रोनद्वारे प्राप्त होणाऱ्या Live Feed वर सतत देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावेत.

१० SDRF / NDRF पथकांची आवश्यकतेनुसार तैनाती करून



त्यांना Life Jacket व इतर आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून द्यावे.

११. व्ही.आय.पी. भेटींच्या अनुषंगाने VIP Bandobast चे सूक्ष्म नियोजन करून सर्व सुरक्षा प्रोटोकॉल्सचे काटेकोर पालन करावे.

१२. पुढील वारीपासून बंदोबस्तावरील अधिकारी व अंमलदार यांच्या भोजन व्यवस्थेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतूद करण्याबाबत शासनस्तरावर प्रस्ताव सादर करावा.

**कार्यवाही :-**

**मा. पोलीस महासंचालक महोदयांनी दिलेल्या सर्व सूचनांचा समावेश आषाढी वारी - २०२६ बंदोबस्त आराखड्यामध्ये करण्यात आला आहे. सूचनांनुसार आवश्यक सुधारणा करून अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे.**

मा. पोलीस महासंचालक महोदयांनी दिलेल्या सर्व सूचनांचा समावेश आषाढी वारी – २०२६ बंदोबस्त आराखड्यामध्ये करण्यात आला आहे. सूचनांनुसार आवश्यक सुधारणा करून अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे. विशेषतः सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, सीसीटीव्ही निरीक्षण, Anti & Sabotage Checking, VIP Bandobast नियंत्रण कक्ष कार्यपद्धती, तसेच मनुष्यबळ व्यवस्थापन या बाबींमध्ये आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. ■

## गडचिरोलीतील २२ मिनी सेतू केंद्रांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

### दुर्गम भागात लोकाभिमुख डिजिटल प्रशासनाला नवी दिशा

# प्रशासनाचा लोकाभिमुख चेहरा कामातून दिसावा




गडचिरोलीची नक्षलप्रभावित परिसर ही ओळख आता बदलत असून ही ओळख बदलण्यात गडचिरोली पोलीस प्रशासनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे.
गडचिरोली येथील शासकीय यंत्रणा ही अधिकाधिक लोकाभिमुख काम करण्यासाठी कट्टीबद्ध आहे. १६ जूनला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृष्य प्रणालीद्वारे गडचिरोली येथे २२ मिनी सेतू केंद्रांचे झालेले लोकार्पण हे याचेच द्योतक आहे. या सेतू केंद्रांची वैशिष्ट्ये तसेच या मिनी सेतू केंद्रांबद्दलची माहिती सदर वृत्तात देण्यात आली आहे.

गडचिरोलीत नक्षलवादाचा प्रभाव कमी झाल्यानंतर आता प्रशासनाची






जबाबदारी अधिक वाढली आहे. दुर्गम भागातील नागरिकांना केवळ प्रशासनाची उपस्थितीच नव्हे, तर प्रशासनाचा लोकाभिमुख चेहरा आणि शासनाच्या सेवांचा प्रत्यक्ष लाभ घेता आला पाहिजे. नक्षलवाद्यांनी अनेक वर्षे रोखून धरलेल्या शासनाच्या सर्व योजना आता प्रत्येक नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवणे हेच राज्य शासनाचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

गडचिरोली जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम व संवेदनशील भागातील नागरिकांना शासकीय सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध व्हावी या हेतूने १६ जून २०२६ रोजी दूरदृश्य प्रणालीद्वारे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते २२ मिनी सेतू केंद्रांचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच गडचिरोली येथून जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे तथा जिल्हा पोलीस अधीक्षक एम. रमेश उपस्थित होते. तसेच भामरागड व एटापल्ली तालुक्यातील सर्व मिनी सेतू केंद्रांवरील केंद्र चालक, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे सांगितले, की लोकशाही आणि तिच्या संस्था नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतात, याची प्रचिती या मिनी सेतू केंद्रांच्या माध्यमातून आदिवासी बांधवांना मिळेल.

**ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचांनी गावात मिनी सेतू केंद्र सुरू झाल्यानंतर नागरिकांना जन्म, उत्पन्न आदी विविध दाखले गावातच सहज उपलब्ध होत असल्याचे सांगितले. त्यामुळे नागरिकांची तालुक्याच्या मुख्यालयापर्यंतची पायपीट, वेळ आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाचत असल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले.**

मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमाच्या दरम्यान भामरागड येथील मिनी सेतू केंद्र चालकाकडून इंटरनेट सुविधा व सेवा वितरणाची माहिती जाणून घेतली. केंद्रावर इंटरनेट सुविधा सुरळीत असून रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला, आधार सेवा तसेच विविध शासकीय सेवांचा लाभ नियमितपणे नागरिकांना दिला जात असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

आरेवाडा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचांनी गावात मिनी सेतू केंद्र सुरू झाल्यानंतर नागरिकांना जन्म, उत्पन्न आदी विविध दाखले गावातच सहज उपलब्ध होत असल्याचे सांगितले. त्यामुळे नागरिकांची तालुक्याच्या मुख्यालयापर्यंतची पायपीट, वेळ आणि खर्च मोठ्या प्रमाणात वाचत असल्याचे त्यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले.

राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालक यांनी गडचिरोली दौऱ्यादरम्यान या अभिनव उपक्रमाची संकल्पना मांडली होती. पूर्वी



नक्षलप्रभावित भागांमध्ये महसूल व इतर शासकीय यंत्रणांना पोहोचणे अत्यंत कठीण होते. त्या काळात पोलीस विभागाने 'पोलीस दादालोरा खिडकी' सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत शासनाच्या सेवा पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले असल्याचे मुख्यमंत्री यांनी यावेळी नमूद केले.

### मिनी सेतू केंद्रांची ठळक वैशिष्ट्ये

- गडचिरोली जिल्ह्यातील भौगोलिक दुर्गमता आणि डिजिटल दरी लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे.
- भामरागड व एटापल्ली तालुक्यात २२ मिनी सेतू केंद्रात ९ आदीसेवा केंद्रे आणि १३ 'पोलीस दादालोरा खिडकी' केंद्रांचे मिनी सेतू केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आले आहे.
- या केंद्रावर रहिवासी, जात, उत्पन्न, जन्म आदी दाखले, महाआयडी नोंदणी, आधार सेवा, बँकिंग सुविधा, विविध शासकीय योजनांचे अर्ज व पेन्शन सेवा उपलब्ध असेल.

**मिनी सेतू केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आलेल्या आदी सेवा केंद्रांमध्ये आरेवाडा, हेडरी, लाहेरी, टेकला आणि मल्लम पोडूर ग्रामपंचायत येथील तसेच धोडराज, वांगेतुरी, गर्दे वाडा, कोठी मन्नेराजाराम पोलीस स्टेशन येथील पोलीस दादा लोरा खिडकी केंद्रांचा समावेश आहे.**

यासाठी राज्य सेतू सोसायटीमार्फत संगणक, प्रिंटर, स्कॅनर, फर्निचर व इंटरनेट सुविधा उपलब्ध करण्यात आली असून प्रत्येक केंद्र चालकाला एक वर्षासाठी दरमहा ८ हजार रुपयांचे ऑपरेशनल साहाय्य देण्यात येणार आहे.

### आदी सेवा केंद्रे

मिनी सेतू केंद्रांमध्ये रूपांतर करण्यात आलेल्या आदी सेवा केंद्रांमध्ये आरेवाडा, हेडरी, लाहेरी, टेकला आणि मल्लम पोडूर ग्रामपंचायत येथील तसेच धोडराज, वांगेतुरी, गर्देवाडा, कोठी मन्नेराजाराम पोलीस स्टेशन येथील पोलीस दादा लोरा खिडकी केंद्रांचा समावेश आहे. उर्वरित आदी सेवा केंद्रे आणि पोलीस दादालोरा खिडकी केंद्रांद्वारेही दुर्गम भागातील नागरिकांना शासकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ■

दक्षता मासिक ऑनलाइन वाचण्यासाठी भेट द्या: https://www.mahapolice.gov.in/dakshata-magazine/
अथवा खालील क्युआर कोड आपल्या मोबाईलमध्ये स्कॅन करा

मुलाखत

# कला, सायबर सुरक्षा आणि व्यसनमुक्तीचा त्रिवेणी संगम

# 'पुढच्या शुक्रवारी ७ वाजता'

## दक्षता मासिकाचा सतीश राजवाडे यांच्याशी विशेष संवाद



महाराष्ट्र पोलीस दलाचे अधिकृत मुखपत्र असलेल्या दक्षता मासिकाने नेहमीच गुन्हेगारी नियंत्रणासोबतच सामाजिक प्रबोधनाचा आणि जनजागृतीचा वारसा समर्थपणे चालवला आहे. आजच्या डिजिटल आणि आधुनिक युगात पोलिसांसमोर सायबर गुन्हेगारी आणि तरुण पिढीला विळखा घालणारे अंमली पदार्थांचे (ड्रग्ज) जाळे ही दोन अत्यंत गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. या ज्वलंत आणि अत्यंत संवेदनशील

विषयांवर भाष्य करणारे, मानवी मनाच्या गुंतागुंतीचा वेध घेणारे एक नवीन नाटक मराठी रंगभूमीवर दाखल झाले आहे, ज्याचे नाव आहे : **'पुढच्या शुक्रवारी ७ वाजता'**

या नाटकाचे लेखन श्री. सुदीप मोडक यांनी केले असून दिग्दर्शन श्री. नीरज शिरवईकर यांचे आहे. या नाटकाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि 'स्टार प्रवाह'चे बिझनेस हेड श्री. सतीश राजवाडे यांनी प्रदीर्घ काळानंतर रंगभूमीवर एक अभिनेता म्हणून पुनरागमन केले आहे. या नाटकात त्यांनी एका संवेदनशील आणि नैतिक मूल्ये जपणाऱ्या मानसोपचारतज्ज्ञाची म्हणजेच डॉ. अतुल यांची मध्यवर्ती भूमिका साकारली आहे. या नाटकातील सामाजिक संदेश आणि त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या सायबर व ड्रग्जच्या धोक्यांविषयी दक्षता मासिकाच्या प्रतिनिधीने घेतलेली ही विशेष आणि सविस्तर मुलाखत.

**दक्षता प्रतिनिधी :** नमस्कार सतीशजी, दक्षता मासिकाच्या माध्यमातून महाराष्ट्र पोलीस दल आणि राज्यातील लाखो वाचक आपल्याशी जोडले गेले आहेत. दक्षता हे नियतकालिक आता डिजिटल स्वरूपात आणि ऑनलाईन मोफत उपलब्ध असल्यामुळे ते राज्यभरातील गावाखेड्यांपर्यंत, तसेच देशभरातल्या वाचकांपर्यंत पोहोचते. दीर्घकाळानंतर आपलं रंगभूमीवर पुनरागमन झाले आहे. त्याबद्दल अभिनंदन. या नाटकाची मूळ संकल्पना काय आहे? आणि पुढच्या शुक्रवारी ७ वाजता असं वेगळं शीर्षक ठेवण्यामागचा उद्देश काय?

**सतीश राजवाडे :** सर्वप्रथम, महाराष्ट्र पोलिसांचे मुखपत्र असलेल्या दक्षता मासिकाशी संवाद साधताना मला अत्यंत अभिमान वाटत आहे, कारण समाजात सुरक्षिततेचं आणि दक्षतेचं वातावरण निर्माण करण्यात पोलिसांचं योगदान अनन्यसाधारण आहे. नाटकाच्या नावाविषयी सांगायचं तर, हे शीर्षक जितकं गूढ आहे, तितकंच ते मानवी नातेसंबंधांच्या आणाभाकांवर आधारलेलं आहे. या नाटकाचे मूळ लेखक सुदीप मोडक आहेत आणि मी या नाटकात केवळ एक कलाकार म्हणून भूमिका साकारत आहे. या नाटकात मी डॉ. अतुल या मानसोपचारतज्ज्ञाची (ड्रग थेरपिस्ट) भूमिका करत असून, सुदीप मोडक यांनी स्वतः व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या मंगेश नावाच्या एका हुशार तरुणाची भूमिका केली आहे. सुदीप यांनी जवळपास ७ ते ८ वर्षं या विषयावर अतिशय सखोल अभ्यास आणि संशोधन करून हा उत्कृष्ट मसुदा तयार केला आहे. यामध्ये सायबर गुन्हेगारी, ऑनलाईन हॅकिंग आणि अमली पदार्थांचे व्यसन या तीन अत्यंत महत्त्वाच्या आणि आजच्या ज्वलंत मुद्द्यांचा सूरजख मिलाफ साधण्यात आला आहे.

**नाटकाच्या शीर्षकाबद्दल सांगायचं, तर नाटकाचा विषय गंभीर असला तरी प्रेक्षकांना नाटकाकडून निखळ मनोरंजनाचीही तितकीच अपेक्षा असते. तालमीदरम्यान डॉक्टर हे पात्र त्या व्यसनाधीन मुलाला भेटण्यासाठी वारंवार एकच वाक्य वापरतं... ''आता भेटूया पुढच्या शुक्रवारी ७ वाजता.''**

नाटकाच्या शीर्षकाबद्दल सांगायचं, तर नाटकाचा विषय गंभीर असला तरी प्रेक्षकांना नाटकाकडून निखळ मनोरंजनाचीही तितकीच अपेक्षा असते. तालमीदरम्यान डॉक्टर हे पात्र त्या व्यसनाधीन मुलाला भेटण्यासाठी वारंवार एकच वाक्य वापरतं... ''आता भेटूया पुढच्या शुक्रवारी ७ वाजता.'' हे वाक्य कथानकात एक अत्यंत महत्त्वाचा दुवा ठरतं. त्यामुळेच आमचे निर्माते अजित भुरे यांना हे शीर्षक सुचलं आणि ते नाटकासाठी अत्यंत समर्पक आणि आकर्षक ठरलं.

**दक्षता प्रतिनिधी:** या नाटकात आपण सायबर फ्रॉड आणि ड्रग्ज या दोन अत्यंत ज्वलंत विषयांची गुंफण केली आहे. आजच्या वास्तव समाजात या दोन गुन्ह्यांचा परस्पर संबंध कसा येतो, यावर हे नाटक कशा प्रकारे प्रकाश टाकतं?




**सतीश राजवाडे :** हा या नाटकाचा मुख्य आत्मा आहे. आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हेगारी अत्यंत वेगाने पसरत आहे आणि दुर्दैवाने या गुन्हेगारीत तरुण पिढी आघाडीवर आहे. आमचा नायक मंगेश हा एका झोपडपट्टीत राहणारा मुलगा आहे, परंतु त्याची बुद्धिमत्ता अफाट आहे, तो एक उत्कृष्ट कोडर आणि हॅकर आहे. गरिबी, योग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि चुकीच्या संगतीमुळे तो अमली पदार्थांच्या (ड्रग्ज) आहारी जातो. अमली पदार्थांचं व्यसन अत्यंत महागडं असतं. हे व्यसन पूर्ण करण्यासाठी आणि ड्रग्ज खरेदी करण्यासाठी त्याला पैशांची प्रचंड गरज भासते. अशा वेळी त्याच्या हॅकिंगच्या कौशल्याचा वापर तो सायबर फसवणूक करण्यासाठी आणि बेकायदेशीर कृत्यांसाठी करायला लागतो. हेच आजचं वास्तव आहे. गुन्हेगारी जगत अशा हुशार पण व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्या तरुणांचा वापर करून सायबर हल्ले किंवा आर्थिक फसवणूक घडवून आणतं. हा केवळ एका तरुणाचा प्रश्न नसून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेला लागलेली वाळवी आहे.

**दक्षता प्रतिनिधी :** या नाटकात आपण ड्रग थेरपिस्टची भूमिका साकारत आहात. ही भूमिका स्वीकारण्यामागे आपली काही सामाजिक बांधिलकी किंवा वैयक्तिक कारण होतं का?

**सतीश राजवाडे:** मी नेहमीच मानत आलो आहे, की कथा आणि विषय ही एक फार मोठी सामाजिक जबाबदारी आहे. आपण प्रेक्षकांसमोर काय मांडतोय, याला खूप महत्त्व आहे. या नाटकाच्या निमित्ताने मला एका मोठ्या आणि गंभीर सामाजिक विषयाशी जोडलं जाता आलं, याचा मला मनापासून आनंद आहे. या नाटकामुळे जर व्यसनाच्या गर्तेत अडकलेली मुलं, मुली किंवा त्यांचे कुटुंब यांना १% जरी उमेद आणि आशेचा किरण मिळू शकला, तर तेच या नाटकाचं आणि माझं खरं यश असेल.

**दक्षता प्रतिनिधी :** एका ड्रग थेरपिस्टचं पात्र जिवंत करण्यासाठी आपल्याला काही विशेष अभ्यास किंवा निरीक्षण करावं लागलं का?

**सतीश राजवाडे:** थेट बाह्य संशोधन करण्यापेक्षा तालमीदरम्यान मी ते पात्र आतून शोधण्याचा प्रयत्न केला. नाटकात या डॉक्टरांची स्वतःची अशी एक भूतकाळातली पार्श्वभूमी आहे. ते स्वतः कधीतरी अशाच एका वेदनेतून गेले होते आणि त्यातून बाहेर पडल्यावर त्यांना आयुष्याचं खरं मोल कळलं होतं. त्यामुळे मला हे पात्र शांत पण ठाम अशा स्वरूपात उभं करायचं होतं. मानसोपचारतज्ज्ञ हा एका स्पंजसारखा असतो; तो समोरच्याचे सगळे विचार आणि दुःख शोषून घेतो आणि अत्यंत संयमाने व्यक्त होतो. तोच ठहराव आणि संयम मी माझ्या अभिनयात उतरवण्याचा प्रयत्न केला आहे.

**दक्षता प्रतिनिधी :** नाटकात व्यसनात अडकलेला मंगेश दाखवला आहे. एका व्यसनी व्यक्तीमुळे कुटुंबावर आणि समाजावर कसा अनिष्ट परिणाम होतो?

**सतीश राजवाडे :** एखादी व्यक्ती जेव्हा अमली पदार्थांच्या आहारी जाते, तेव्हा तिला संपूर्ण जगच आपलं शत्रू आहे असं वाटायला लागतं. व्यसनामुळे मानवी बुद्धी सुन्न होते आणि ती व्यक्ती नकळतपणे आपल्या स्वतःच्या कुटुंबाला व मित्रांना दुखवत जाते. व्यसन हे रक्तामध्ये भिनत असल्यामुळे ते

सोडणं अत्यंत कठीण असतं. श्रीमंत असो वा गरीब, अमली पदार्थांच्या विळख्यामुळे दोन्ही स्तरांवरील कुटुंबं उद्ध्वस्त होतात. व्यसनाचे महागडे मार्ग शोधण्यासाठी आणि पैशांची गरज भागवण्यासाठी चोरीचे, गुन्हेगारीचे मार्ग अवलंबले जातात. काही मिनिटांच्या नशेसाठी किंवा तात्पुरत्या सुखासाठी लोक आपलं संपूर्ण आयुष्य पणाला लावतात. म्हणूनच दक्षतासारख्या ताकदीच्या माध्यमातून हा संदेश पोहोचवणं गरजेचं आहे की  या दलदलीत अडकूच नका!

प्रेक्षक नाटक पाहून बाहेर पडताना भावूक आणि अंतर्मुख होतात. हे केवळ मनोरंजनात्मक नाटक नसून समाजाचे डोळे उघडणारं उत्तम प्रबोधन आहे, अशा प्रतिक्रिया आम्हाला प्रेक्षकांकडून सतत मिळत आहेत. अगदी मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू कुलकर्णी साहेबांनीही या नाटकाचं मनापासून कौतुक केलं आहे आणि विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांनाही हे नाटक दाखवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. अनेक तरुण मुलं, 'नाटक पाहिल्यानंतर आम्हाला यातून जगण्याची नवी उमेद मिळाली!' असं प्रत्यक्ष येऊन सांगतात, हीच आमच्या संपूर्ण चमूच्या कामाची खरी पावती आहे.

**दक्षता प्रतिनिधी :** महाराष्ट्र पोलिसांचा एनडीपीएस विभाग अमली पदार्थांविरोधात सातत्याने कारवाया करत असतो. पोलिसांच्या या मोहिमेला समाजाची आणि थेरपी सेशन्सची कशी साथ मिळायला हवी?

**सतीश राजवाडे :** नुकत्याच एका कार्यक्रमात पोलीस महानिरीक्षक ज्योतिप्रिया सिंग मॅडम यांनी एक अत्यंत मोलाचा विचार मांडला होता – 'Know your neighbour' (आपल्या शेजाऱ्याला ओळखा). आपल्या आजूबाजूला काय घडत आहे, यावर प्रत्येक सजग नागरिकाचं बारीक लक्ष असलं पाहिजे. परिसरात काहीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती द्या: पोलीस निश्चितच आपलं आणि समाजाचं रक्षण करतील. हा तरुण पिढीला उद्ध्वस्त करण्याचा एक प्रकारचा समांतर वॉर आहे. त्यामुळे सतत सतर्कता बाळगून पोलिसांना सहकार्य करणं ही प्रत्येक नागरिकाची पहिली पायरी ठरते.

**दक्षता प्रतिनिधी :** अमली पदार्थ आणि सायबर फ्रॉड यांसारख्या अदृश्य धोक्यांपासून सावध राहण्यासाठी नागरिकांनी कोणती शिस्त पाळली पाहिजे?

**सतीश राजवाडे :** सर्वात महत्त्वाचं म्हणजे सतर्कता! अनोळखी नंबरवरून आलेले कॉल्स, मेसेजेस यावर विश्वास ठेवू नका; आपले बँक डिटेल्स किंवा ओटीपीकधीही कोणाशीही शेअर करू नका. आजकाल पसरत असलेल्या डिजिटल अरेस्ट सारख्या धमक्यांना अजिबात घाबरू नका. आधी शांत राहा, विचार करा आणि पोलिसांशी त्वरित संपर्क साधा. भीतीपोटी नागरिक घाईघाईने चुकीची पावलं



उचलतात आणि फसवणुकीचे बळी ठरतात. त्यामुळे भीती बाजूला सारून थेट कायद्याची मदत घेणं हाच सर्वात उत्तम मार्ग आहे.

**दक्षता प्रतिनिधी:** पुढच्या शुक्रवारी ७ वाजता या नाटकाचं सादरीकरण आणि तांत्रिक मूल्यं प्रेक्षकांना खिळवून ठेवण्यात यशस्वी ठरली आहेत. रंगमंचावरील फिरत्या सेटच्या प्रयोगाविषयी काय सांगाल?

**सतीश राजवाडे:** नाटकाचे दिग्दर्शक नीरज शिरवईकर यांनी नाटकातील भावनिक आंदोलनं पडद्यावर आणण्यासाठी अत्यंत कल्पक तंत्राचा वापर केला आहे. रंगमंचावर एका बाजूला डॉ. अतुल यांची कॉर्पोरेट स्वरूपाची सुसज्ज केबिन आहे, तर दुसऱ्या बाजूला मंगेश राहत असलेली अत्यंत गचाळ झोपडपट्टी आहे. हे दोन विभिन्न सामाजिक स्तर दर्शवण्यासाठी नेपथ्यकाराने फिरत्या रंगमंचाची निर्मिती केली आहे, जो प्रत्यक्ष प्रयोगादरम्यान प्रेक्षकांसमोर ९०

अंशात फिरतो. या फिरत्या मंचाच्या माध्यमातून आम्ही उच्चभ्रू वर्गातील कोरडेपणा आणि झोपडपट्टीतील जगण्याचा संघर्ष यातील दरी स्पष्टपणे दाखवू शकलो आहोत. त्याचप्रमाणे, मंगेश जेव्हा अमली पदार्थांच्या अंमलाखाली असतो, तेव्हा त्याला होणारे भास आणि त्याच्या मानसिक यातना दर्शवण्यासाठी केवळ विशिष्ट प्रकाशझोतांचा वापर केला गेला आहे, जे प्रेक्षकांना थक्क करतात.

**दक्षता प्रतिनिधी:** पोलीस दलाच्या माध्यमातून अनेकदा ड्रग्ज रॅकेट्स उद्ध्वस्त केली जातात आणि सायबर गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या जातात. परंतु, केवळ कायद्याच्या बळावर गुन्हेगारी थांबवणे शक्य नाही, यावर नाटक काय भाष्य करतं?

**सतीश राजवाडे :** आमचे पोलीस बांधव अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गुन्हेगारांचा छडा लावतात, हे कौतुकास्पद आहे. परंतु कायद्याला जेव्हा समाजातील संवेदनशीलतेची जोड मिळते, तेव्हाच खऱ्या अर्थाने क्रांती घडून येते. जेव्हा एखादा तरुण पहिल्यांदा ड्रग्जच्या आहारी जातो, तेव्हा तो गुन्हेगार नसून पीडित असतो. त्याला वेळेत योग्य उपचार आणि कौटुंबिक पाठबळ मिळालं नाही, तर तो गंभीर गुन्हेगारीच्या गर्तेत ओढला जातो. आमचं नाटक हेच सांगतं, की गुन्हेगाराला शिक्षा करण्यासोबतच त्याच्यातली मानवी मूल्यं जागी करून त्याचं पुनर्वसन करणं अत्यंत गरजेचं आहे. पोलीस जर समाजाचं रक्षण करत असतील, तर नागरिकांनीही आपल्या कुटुंबात मुलांशी संवाद वाढवून पोलिसांच्या या कार्याला हातभार लावला पाहिजे. संवादाचा अभाव हेच आजच्या तरुण पिढीच्या भरकटण्याचं सर्वात मोठं कारण आहे.

**दक्षता प्रतिनिधी :** एक जबाबदार नागरिक म्हणून कायदा व सुव्यवस्था राखण्यात सामान्य माणसाचं काय कर्तव्य आहे?

**सतीश राजवाडे :** मी याचे प्रामुख्याने तीन नियम सांगेन:

१. नियमांचे पालन करा: शासनाने आणि पोलीस दलाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन करा.

२. कायदा हातात घेऊ नका: कोणत्याही परिस्थितीत स्वतः कायदा हातात न घेता देशाच्या पोलीस यंत्रणेवर पूर्ण विश्वास ठेवा.

३. संवाद साधा: पोलीस ठाण्यात जाण्यास किंवा पोलिसांशी मोकळेपणाने बोलण्यास अजिबात घाबरू नका. पोलीस आपले खरे रक्षक आहेत. नेहमी लक्षात ठेवा 'Stay on the right side of law.'

**दक्षता प्रतिनिधी:** शेवटी, दक्षता मासिकाच्या वाचकांना आणि विशेषतः आजच्या तरुण पालकांना आपण काय आवाहन करू इच्छिता?

**सतीश राजवाडे:** आजच्या धावपळीच्या युगात आपण आपल्या मुलांना सगळ्या भौतिक सोयी-सुविधा देतो, पण त्यांना आपला वेळ देत नाही. पालकांनी आपल्या मुलांच्या इंटरनेट वापराबाबत आणि त्यांच्या वर्तनातील बदलांबाबत अत्यंत दक्ष असायला पाहिजे. मुलांना जर घरामध्ये सुरक्षित आणि मोकळं वातावरण मिळालं, तर ते कोणत्याही व्यसनाकडे किंवा सायबर गुन्हेगारीच्या वाममार्गाकडे वळणार नाहीत. हे नाटक प्रेक्षकांना केवळ दोन तास खिळवून ठेवत नाही, तर नाट्यगृहातून बाहेर पडताना स्वतःकडे आणि आपल्या नात्यांकडे एका वेगळ्या नजरेने पाहायला भाग पाडतं. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांसोबत हे नाटक आवर्जून पाहावं, हीच आमची इच्छा आहे.

### संपादकीय टिपण

'पुढच्या शुक्रवारी ७ वाजता' हे नाटक आजच्या डिजिटल युगातील सामाजिक वास्तवाचे जळजळीत प्रकटीकरण आहे. अमली पदार्थांच्या आहारी गेलेल्या बुद्धिमत्तेचा सायबर गुन्ह्यांसाठी कसा वापर केला जाऊ शकतो आणि या चक्रव्यूहातून बाहेर पडण्यासाठी मानसोपचार कसे महत्त्वाचे ठरतात, हे या नाटकाने अतिशय प्रभावीपणे मांडले आहे. महाराष्ट्र पोलीस दल ज्या प्रकारे गुन्हेमुक्तीसाठी प्रयत्नशील आहे, त्याच ध्येयाला समांतर असा संदेश हे नाटक प्रेक्षकांच्या मनात रुजवण्यात यशस्वी ठरले आहे. अशा आशयघन नाटकांना समाजातील प्रत्येक घटकाने पाठिंबा देणे ही काळाची गरज आहे. ■

# छायाचित्र दालन

मे २०२६ करिता सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षिसाकरिता नाशिक शहर पोलीस घटकातील पंचवटी पोलीस ठाणे येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक ३१८/२०१८ या गुन्हेतपासाची निवड करण्यात आली आहे. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी वपोनि विजय ढमाळ, पोनि कैलास वाघ आणि वाल्मिक शार्दुल, सपोनि मधुकर पिंगळे व पोलीस अंमलदार यतीनकुमार पवार यांना गौरवण्यात आले.

**सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी ऑगस्ट महिन्याच्या सदर अंकात पृष्ठ क्रमांक २० वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.** ■













मे २०२६ करिता सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी बक्षिसाकरिता नंदुरबार पोलीस घटकातील उपनगर पोलीस ठाणे येथील गुन्हा रजिस्टर क्रमांक २९९/२०२४ या गुन्हेतपासाची निवड करण्यात आली आहे. या गुन्हेतपासाचे तपासी अधिकारी व अंमलदार यांचा राज्याचे पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते यांच्या हस्ते प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पोनि अमितकुमार मनेळ व पोलीस अंमलदार विपुल पाटील यांना गौरवण्यात आले. **सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी ऑगस्ट महिन्याच्या सदर अंकात पृष्ठ क्रमांक ३६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.** ■







तपासकथा




विजय ढमाळ
पोलीस निरीक्षक
पंचवटी पोलीस ठाणे
नाशिक


# ज्वाळा

**माणूस एकदा दु:खाच्या वा अन्य आगीत होरपळू लागला की त्याला कशाचेच काहीच वाटेनासे होते. नेमके असेच घडले पंचवटी परिसरात राहणाऱ्या सौजन्या, कमल, राजस आणि सलमान यांच्या बाबतीत. पाच ऑगस्टच्या रात्री सौजन्याच्या आजूबाजूला राहणाऱ्या लोकांना रात्री अचानक जाग आली ती आसमानाला भिडणाऱ्या महाकाय आगीच्या ज्वाळांनी. त्या ज्वाळा सौजन्याच्या घरातून निघत होत्या. काय झाले होते नेमके?**



आषाढ महिन्याचा शेवट आला असला तरी श्रावणधारांची बरसात आधीच सुरू झाली होती. पाच ऑगस्टला दिवसभर अधूनमधून बरसणारा पाऊस स्वत:च्या अस्तित्वाची साक्ष देत होता. पावसाळ्यातही नाशिकचा पंचवटी परिसर हा गजबजलेला असतो. पण ५ तारखेला फारशी रहदारी नव्हती. बाजारसमितीतून भाजीपाला घेऊन जाणारे येणारे लोक हेही फारसे नव्हते. त्यामुळे त्या दिवशी रात्री सगळीकडे लवकरच सामसूम पसरली. हिरावाडीतील आपल्या घरात सौजन्या भिंतीला लागून असलेल्या पलंगावर निवांत बसली होती.



**कैलास वाघ**
पोलीस निरीक्षक
पंचवटी पोलीस ठाणे
नाशिक



**वाल्मीक शार्दुल**
पोलीस निरीक्षक
पंचवटी पोलीस ठाणे
नाशिक



**मधुकर पिंगळे**
सहा. पोलीस निरीक्षक
पंचवटी पोलीस ठाणे
नाशिक



**यतीन कुमार पवार**
पोलीस अंमलदार
पंचवटी पोलीस ठाणे
नाशिक

दिवसभर झालेल्या दगदगीने आराम पडावा म्हणून भिंतीला डोके टेकवून आणि डोळे बंद करून बसली होती. आपला डोळा कधी लागला ते तिलाच कळले नाही. थोड्या वेळाने तिचे डोळे उघडले ते एका कोवळ्या जिवाच्या रडण्याच्या आवाजाने. तो कोवळा जीव म्हणजे तिची नात– कमलची मुलगी राजस. राजसचा जन्म होऊन काही महिनेच झाले होते.

''अलेलेले... काय झालं आमच्या बाळाला? भुकू लागली का? ओ..ओ.. मंमं द्यायचं? कमल, एऽऽ कमल, हिला भूक लागली वाटतं.'' सौजन्या राजसला जोजवत आपल्या लेकीला म्हणाली.

''हो आई, मी तिची दुधाची बाटलीच भरून आणत होते.''

मायलेकींचा हा संवाद होत असताना बेल वाजली. सौजन्याने दरवाजा उघडला, तर पाच फूट आठ इंच उंचीचा धिप्पाड माणूस समोर उभा होता. त्याला पाहून सौजन्याच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले.

''तू? तू यहाँ क्या कर रहा हैं सलमान इस वक्त?''

''मै यहाँ क्या कर रहा हू मतलब? तुम कहना क्या चाहती हो?''

''तुम्हे नही पता, मै क्या कहना चाहती हू?''



**थोड्या वेळाने तिचे डोळे उघडले ते एका कोवळ्या जिवाच्या रडण्याच्या आवाजाने. तो कोवळा जीव म्हणजे तिची नात- कमलची मुलगी राजस. राजसचा जन्म होऊन काही महिनेच झाले होते.**

''नही पता। देख, तू अभी निकल मेरे घर से। तू अब यहाँ नहीं रहे सकता।''

तिने सलमानला धक्काबुक्की करून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला, पण उलटपक्षी सलमानने सौजन्याच्या दंडाला पकडून हिसडा दिला आणि आत आला. आत आल्यावर त्याने दरवाजा लावला.

''मै अकेली थी, तब तक तू यहा आता था, तब वो सब जायज था। लेकिन अब मै अकेली नही हु। मेरे साथ मेरी बेटी और नातीन है। इसलिये अब तू यहा नही आ सकता।''

''अच्छा... तेरे लोग आ गये तो मेरी जरुरत खतम हो गई, बराबर ना?'' डोळे मोठे करत आणि कमलकडे अंगुलीनिर्देश करत त्याने सौजन्याला विचारले. त्याच्या या प्रश्नावर सौजन्या गप्प बसली. स्वतःला नियंत्रित ठेवण्याचा ती पूर्ण प्रयत्न करत होती. बराच वेळ असाच गेला.

''मै तेरे से बहस नही करना चाहती। तू अभी निकल यहा से।''

''तू चाहे जितना भी जोर लगा ले। मै यहा से जाने वाला नही।'' छद्मीपणे हसत सलमान म्हणाला आणि त्याने त्याच्याबरोबर आणलेल्या पिशवीतून तंदुरी कबाब बाहेर काढले. ते कबाब तो तिला खिजवत खाऊ लागला.

''देख सलमान, मेरे घर मे ये सब नही चलेगा।''

पण तिच्या या बोलण्याकडे दुर्लक्ष करून त्याने खाणे तसेच पुढे सुरू ठेवले. हे सगळे होईपर्यंत बराच वेळ झाला होता. शेवटी तिने वादावादी वाढू नये म्हणून गप्प बसणे पसंत केले.

सगळी आवराआवर होईपर्यंत बराच उशीर झाला होता. थकल्या भगल्या जिवाला आरामाची गरज होती. सौजन्या, कमल या दोघींचेही

डोळे निद्रेने मिटत होते. त्या दोघी त्यांच्या त्यांच्या दिवाणवर निद्रेच्या अधीन झाल्या. सगळे घर शांत झाले असतानाही सलमान मात्र अजूनही झालेल्या भांडणांच्या आगीत धुमसत होता. सौजन्या आपल्याला यायला मनाई कशी काय करू शकते? हा प्रश्न त्याला सतावत होता. शेवटी तो उठला आणि स्वयंपाकघराच्या दिशेने निघाला.

***

थोड्या वेळाने रात्रीच्या त्या मिट्ट अंधारात एकदम प्रकाश आल्याचे जाणवल्याने आजूबाजूच्या लोकांनी डोळ्यांना दिपवणाऱ्या त्या उजेडाच्या दिशेने बघितले. त्यांच्यासमोर एक वास्तू आगीच्या ज्वाळांमध्ये होरपळत होती. त्या ज्वाळांना जणू आकाशाकडे जाण्याची ओढ लागली होती. जमलेल्या लोकांपैकी काहीजण त्या आगीला विझवण्याचा कसोशीने प्रयत्न करत होते. तेवढ्यात काहींना आतून काळीज चिरून जाणाऱ्या किंकाळ्यांचा आवाज ऐकू आला. प्रसंगी स्वतःची पर्वा न करता ते त्या किंकाळ्यांच्या दिशेने धावले. मोठ्या कसोशीने त्यांनी आतमध्ये असलेल्या सौजन्या, कमल, राजस यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. तर काहींनी फायर ब्रिगेड, पंचवटी पोलीस ठाणे या ठिकाणी फोन केले. फोनवरून त्यांनी सदर घटनेची माहिती दिली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पंचवटी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस निरीक्षक विजय ढमाळ तसेच अन्य पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्परतेने घटनास्थळ गाठले. पोलिसांनी तातडीने सर्व पीडितांना रुग्णालयात रवाना केले. पण रुग्णालयाच्या वाटेवरच राजसचा करुण अंत झाला. डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

''डॉक्टर, त्या दोघीजणी कशा आहेत? आम्ही भेटू शकतो त्यांना?'' साहेबांनी डॉक्टरांकडे विचारणा केली.

''वेल... आम्ही त्यांना वाचवण्याचा पूर्ण प्रयत्न करतोय. पण आत्ताच काही सांगता येणार नाही.



**पोलिसांनी तातडीने पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून पोलिसांनी अर्धवट जळालेली प्लास्टिकची बॉटल, झाकण, जळालेल्या काही गोष्टींचे अवशेष तसेच नऊ नंबरचा काळ्या रंगाचा चप्पल जोड इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी संकलित केल्या.**

कंडीशन क्रिटिकल आहे दोघींची.''

''आम्हाला स्टेटमेंट घ्यायचं होतं.''

''ठीक आहे, पण त्यांना फार त्रास देऊ नका.''

''थँक्स डॉक्टर.''

बर्निंग वॉर्ड मध्ये दाखल असलेल्या सौजन्या आणि कमल या दोघींकडे बघवतही नव्हते. चेहरा आणि शरीरावर अनेक ठिकाणी भाजल्याच्या खुणा होत्या. परंतु बोलण्याच्या परिस्थितीत असल्याने पोलिसांनी त्यांचे जबाब घेतले. दोघींनी दिलेल्या जबाबांनुसार पोलिसांनी पुढचा तपास सुरू केला.

पोलिसांनी तातडीने पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. घटनास्थळावरून पोलिसांनी अर्धवट जळालेली प्लास्टिकची बॉटल, झाकण, जळालेल्या काही गोष्टींचे अवशेष तसेच नऊ नंबरचा काळ्या रंगाचा चप्पल जोड इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी संकलित केल्या. पोलिसांच्या कामाला वेग आला असताना दुसरीकडे डॉक्टरही आपल्या परीने त्यांना वाचवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करत होते, पण शेवटी ज्याची भीती होती तेच घडले. सौजन्या आणि कमल यांचाही दुर्दैवी अंत झाला. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली. साहेबांनी माहिती समजताच प्राधान्याने तिन्ही मृतदेह इन्क्वेस्ट पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवून दिले. पोलिसांनी केलेल्या तपासात काही महत्त्वाची माहिती समोर आली होती. त्यानुसार पोलिसांनी पुढचा तपास सुरू केला.

पोलिसांना सलमानबद्दल माहिती समजली. तो ट्रेनने त्याच्या गावी जात असल्याचे समजताच पोलिसांनी ट्रेनमध्ये शोधकार्य सुरू केले. उत्तरप्रदेशकडे जाणाऱ्या एका ट्रेनमध्ये त्यांना सलमान दिसून आला. त्यांनी त्याला पकडलेदेखील, पण तो तिथून पळाला. पण हार मानतील तर ते महाराष्ट्र पोलीस

कुठले? त्यांनी जिद्दीने त्याचा शोध रात्रंदिवस सुरू ठेवला. शेवटी त्यांच्या प्रयत्नाला यश आलेच आणि सलमान पोलिसांना सापडला. पोलीस त्याला घेऊन नाशिकच्या दिशेने निघाले.

''सलमान, अब बोल तूने उन तीनों को क्यू मारा? देख झूट बोलने की सोचना भी मत। तेरे लिये सच बता देना यही बेस्ट ऑप्शन है।''

साहेबांकडे बघत तो छद्मीपणे हसला.

''हस क्या रहा है? सर जो पूछ रहे हैं उसका जवाब दे।'' पोलीस अंमलदार यतीनकुमार पवार यांनी दरडावले. हे सगळे सुरू असताना साहेबांना त्यांच्या सहकाऱ्यांनी तपासासंदर्भातले काही अपडेट्स दिले. ते कळल्यावर साहेबांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलले. त्यांनी परत एकदा आपले लक्ष सलमानकडे वळवले.

''देख सलमान, तू अगर झूठ बोला तो तुझे कोई नही बचा सकता। तो जो सच है वही बोल दे।'' साहेबांच्या डोळ्यातला आत्मविश्वास त्याला जाणवला. आपण आता फार काळ स्वतःला वाचवू शकणार नाही हे त्याला उमगले.

''साब, उसका पती गुजर जाने के बाद बिलकुल अकेली हो गयी थी वो। तब उसको सहारा किसने दिया? मैनेच ना? जब मेरी जरुरत थी, तब मेरे आगे पिछे घुमती फिरती थी। तब मेरा साथ उसको पसंद आता था। हम दोनो उसी के घर में रहते। बहुत प्यार था साब, हमारे बीच। एक दुसरे के बिना ना जीने की कसमे खाई थी हमने।''

''तो फिर क्यू?''

''बाद मे वो कमल आ गई, उसकी बेटी, उसके साथ रहने के लिए। तो उसके आते ही उसने मुझे



**पोलिसांनी संपादित केलेला सर्व मुद्देमाल वैद्यकीय तपासणीसाठी न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवला. तसेच आरोपित सलमानची ओळख परेड करण्यात आली.**

किनारे कर दिया। मुझे बोलती थी 'तू अभी हा नही रह सकता। चला जा मेरे घर से।' ऐसे कैसे जाता साब? मोहब्बत हो गई थी मुझे उससे। रात मे आख बंद कर देता तो वही आती थी सामने... और वो मुझसे पल्ला झाडना चाहती थी। उस दिन भी ऐसा ही हुआँ। मै मेरी तंदुरी लेके शांती से खाना खाने के लिए घर मे बैठ गया। और अंदर जाते ही उसने चिलमचिल्ली शुरू कर दी। मेरा माथा ठनकने लगा। मुझसे झगडा करके वो सो गई। लेकिन मै क्या करता? मै कैसे सो सकता था? कानो मे उसका कहाही घूम रहा था। मै रात को उठा और किचन मे से बॉटल ली। उसमे मैने पेट्रोल लिया था। वो तिनों के उपर डाला और बादमे माचिस की जलती हुई काडी डाली। बाद मे मै वहा से बाहर निकला और मेरे दोस्त को फोन किया।''

''और तेरी यही गलती आज तुझे यहाँ तक लेके आई।'' एवढे बोलून साहेब तिथून बाहेर पडले.

पोलिसांनी संपादित केलेला सर्व मुद्देमाल वैद्यकीय तपासणीसाठी न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवला. तसेच आरोपित सलमानची ओळख परेड करण्यात आली. सर्व महत्त्वाच्या साक्षीदारांचे सीआरपीसी ६४ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आले. पोलिसांनी उपलब्ध पुराव्याच्या आधारे न्यायालयात सलमान विरोधात दोषारोपपत्र दाखल केले. समोर आलेल्या सर्व पुरावे लक्षात घेतल्यानंतर मा. न्यायालयाने आरोपित सलमानला दोषी ठरवून भादंवि कलम ३०२ अन्वये फाशीची शिक्षा सुनावली.

सदर प्रकरणाचा तपास पंचवटी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विजय ढमाळ, कैलास वाघ, वाल्मीक शार्दुल, सहा. पोलीस निरीक्षक मधुकर पिंगळे व पोलीस अंमलदार यतीन कुमार पवार यांनी अतिशय तत्परतेने आणि कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



एम रमेश
पोलीस अधीक्षक
गडचिरोली

### समाजहित, जनजागृती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची वाटचाल:

# जून महिन्यातील जागतिक दिनांच्या निमित्ताने गडचिरोली पोलीस दलाचे लोकाभिमुख उपक्रम



महाराष्ट्र पोलीस दलाचे 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य केवळ कायदा व सुव्यवस्थेच्या पालनापुरते मर्यादित नसून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पोलीस दलाने स्वीकारलेल्या व्यापक सामाजिक जबाबदारीचे प्रतीक आहे. पोलीस दल हे गुन्हे प्रतिबंध, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या जीवित–मालमत्तेचे संरक्षण करणे ही आपली मूलभूत जबाबदारी पार पाडत असतानाच सामाजिक परिवर्तन, लोकजागृती, आरोग्य संवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठीही सातत्याने कार्यरत आहे.

विशेषतः माओवादग्रस्त, दुर्गम आणि आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यात पोलीस दलाची भूमिका केवळ सुरक्षा





यंत्रणेपुरती मर्यादित न राहता समाजाशी विश्वासाचे नाते निर्माण करणाऱ्या लोकाभिमुख संस्थेची बनली आहे. नागरिकांच्या सहभागातून समाजोपयोगी उपक्रम राबविणे, सकारात्मक सामाजिक संदेश देणे आणि जून महिन्यातील प्रत्येक जागतिक दिनाला कृतीशील स्वरूप देणे ही गडचिरोली पोलीस दलाची कार्यसंस्कृती बनली आहे.

जून महिना हा येणाऱ्या विविध जागतिक दिनांच्या माध्यमातून आरोग्य, पर्यावरण, मानवी मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारा महिना आहे. याच पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने जागतिक सायकल दिन, जागतिक पर्यावरण दिन, जागतिक रक्तदाता दिन आणि जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन या चारही दिवसांचे औचित्य साधून जिल्हाभर व्यापक जनसहभागातून विविध उपक्रम राबविले. या उपक्रमांमधून नागरिकांना केवळ संदेश देण्यापेक्षा तो प्रत्यक्ष कृतीतून अनुभवण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली. हीच या उपक्रमांची खरी वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे.

**जून महिना हा येणाऱ्या विविध जागतिक दिनांच्या माध्यमातून आरोग्य, पर्यावरण, मानवी मूल्ये आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव करून देणारा महिना आहे. याच पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलीस दलाने जागतिक सायकल दिन, जागतिक पर्यावरण दिन, जागतिक रक्तदाता दिन आणि जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन या चारही दिवसांचे औचित्य साधून जिल्हाभर व्यापक जनसहभागातून विविध उपक्रम राबविले.**

### आरोग्यदायी जीवनशैली आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा जागतिक सायकल दिन-

संयुक्त राष्ट्रसंघाने सन २०१८ पासून ३ जून हा दिवस 'जागतिक सायकल दिन' म्हणून घोषित केला. वाढते प्रदूषण, बदलती जीवनशैली आणि शारीरिक हालचालींचा अभाव या पार्श्वभूमीवर सायकल हे आरोग्य, पर्यावरण आणि शाश्वत विकासाचे प्रभावी माध्यम म्हणून जगभर स्वीकारले जात आहे. या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देत गडचिरोली पोलीस दलाने ३ जून २०२६ रोजी भव्य सायकल रॅलीचे आयोजन केले. पोलीस मुख्यालयातील शहीद पांडू आलाम सभागृह येथून सकाळी प्रारंभ झालेली ही रॅली शासकीय विश्रामगृह, आयटीआय चौक, इंदिरा गांधी चौक या मार्गाने पुन्हा पोलीस मुख्यालयात परत आली. या रॅलीत पोलीस अधिकारी, अंमलदार, विशेष अभियान पथक, विविध विभागांचे अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती आणि सायकलप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या उपक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आठवड्यातून किमान एक दिवस सायकलचा वापर करून स्वतःचे आरोग्य जपावे, इंधनाची बचत करावी, प्रदूषण कमी करण्यासाठी हातभार लावावा आणि पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारावी, असा प्रभावी संदेश






यद्वारे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. सहभागी सर्वांना प्रमाणपत्र प्रदान करून त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा गौरव करण्यात आला.

**वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करणारा जागतिक पर्यावरण दिन-**

पर्यावरण संरक्षण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. हवामानातील बदल, सातत्याने वाढते तापमान, जंगलतोड, पाण्याची टंचाई आणि प्रदूषण या जागतिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने सक्रिय भूमिका घेणे आवश्यक झाले आहे. याच भावनेतून ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त गडचिरोली पोलीस दलाने 'एक अधिकारी/अंमलदार – एक वृक्ष' ही अभिनव संकल्पना राबविली. स्थानिक एमआयडीसी मैदानावर विविध फळझाडे व सावलीची झाडे मिळून २५० रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. त्याचबरोबर जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशन्स, उपपोलीस स्टेशन्स आणि पोलीस मदत केंद्र स्तरावर २००० हून अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली.

या उपक्रमाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे केवळ वृक्षारोपणावर न थांबता प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याचा सामूहिक संकल्प करण्यात आला. पर्यावरण संरक्षणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता असल्याचा संदेश या उपक्रमातून समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला.

**जीवनदानाची प्रेरणा देणारा जागतिक रक्तदाता दिन -**

रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा मानली जाते. अपघातग्रस्त, शस्त्रक्रिया होणारे रुग्ण, सिकलसेल, थॅलेसेमिया आणि इतर गंभीर आजारांवरील उपचारांसाठी सुरक्षित रक्ताची सतत आवश्यकता असते. याची जाणीव समाजात निर्माण व्हावी यासाठी दरवर्षी १४ जून हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो.

१४ जून २०२६ रोजी गडचिरोली पोलीस दलाने जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तकेंद्र, उपजिल्हा रुग्णालय रक्तकेंद्र, अहेरी आणि शालिनीताई मेघे रक्तकेंद्र, नागपूर यांच्या संयुक्त सहकार्याने गडचिरोली, अहेरी आणि सिरोंचा येथे एकाच वेळी भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले. या उपक्रमात पोलीस अधिकारी






व अंमलदार, सीआरपीएफ, एसआरपीएफ, विविध शासकीय विभागांचे अधिकारी तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. 'रक्तदान हेच श्रेष्ठदान' या भावनेतून तब्बल ५०३ रक्तदात्यांनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

गडचिरोली पोलीस दलाने आजपर्यंत आयोजित केलेल्या सहा रक्तदान शिबिरांमधून ४८६४ युनिट रक्त संकलित करून समाजोपयोगी कार्याचा एक उल्लेखनीय आदर्श निर्माण केला आहे. नियमित रक्तदान ही सामाजिक जबाबदारी असून प्रत्येक निरोगी नागरिकाने दर तीन महिन्यांनी रक्तदान करावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा निर्धार: 'ड्रग फ्री गडचिरोली' मॅरेथॉन -

अंमली पदार्थांचे व्यसन हे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक असून राष्ट्राच्या भविष्यावर त्याचा दूरगामी परिणाम होत असतो. विशेषतः युवकांना या विळख्यापासून दूर ठेवण्यासाठी जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि सामाजिक सहभाग आवश्यक आहे. याच उद्देशाने २६ जून जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने 'ड्रग फ्री गडचिरोली' या पाच किलोमीटर मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. पोलीस मुख्यालयातून प्रारंभ झालेली ही मॅरेथॉन शहरातील प्रमुख मार्गांवरून पुन्हा पोलीस मुख्यालयात दाखल झाली.

**गडचिरोली पोलीस दलाने आजपर्यंत आयोजित केलेल्या सहा रक्तदान शिबिरांमधून ४८६४ युनिट रक्त संकलित करून समाजोपयोगी कार्याचा एक उल्लेखनीय आदर्श निर्माण केला आहे. नियमित रक्तदान ही सामाजिक जबाबदारी असून प्रत्येक निरोगी नागरिकाने दर तीन महिन्यांनी रक्तदान करावे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.**

या मॅरेथॉनमध्ये पोलीस अधिकारी-अंमलदार, युवक-युवती आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सहभागी सर्वांना प्रमाणपत्र प्रदान करून व्यसनमुक्त समाजनिर्मितीच्या या अभियानात त्यांचा सहभाग गौरविण्यात आला.

या उपक्रमाच्या माध्यमातून अंमली पदार्थांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याबरोबरच जनजागृती करणे, प्रतिबंधात्मक उपक्रम आणि समाजाच्या सक्रिय



सहभागातून गडचिरोलीला 'ड्रग फ्री गडचिरोली' बनविण्याचा दृढ संकल्प व्यक्त करण्यात आला.

जून महिन्यात आयोजित करण्यात आलेले हे सर्व उपक्रम केवळ औपचारिक कार्यक्रम नसून गडचिरोली पोलीस दलाच्या समाजाभिमुख कार्यपद्धतीचे प्रभावी उदाहरण आहेत. नागरिकांच्या आरोग्याची काळजी, पर्यावरण संरक्षणाची जाणीव, रक्तदानातून मानवतेची सेवा आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संदेश या सर्व उपक्रमांमधून प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. पोलीस दल आणि नागरिक यांच्यातील विश्वास, सहभाग आणि सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी होत राहील, हा गडचिरोली पोलीस दलाचा दृढ विश्वास आहे.

सदर सर्व कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा परिषद गडचिरोलीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुहास गाडे, अपर पोलीस अधीक्षक (अभियान) श्री.

**नागरिकांच्या आरोग्याची काळजी, पर्यावरण संरक्षणाची जाणीव, रक्तदानातून मानवतेची सेवा आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संदेश या सर्व उपक्रमांमधून प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. पोलीस दल आणि नागरिक यांच्यातील विश्वास, सहभाग आणि सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने अंमलबजावणी होत राहील...**

कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) श्री. गोकुल राज जी., अपर पोलीस अधीक्षक अहेरी श्री. हर्षवर्धन बी. जे., सहा. पोलीस अधीक्षक, गडचिरोली श्री. अनिकेत हिरडे, तत्का. पोलीस उपअधीक्षक (अभियान) श्री. विशाल नागरगोजे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. माधुरी किलनाके, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. छाया उईके, मुख्य वैद्यकीय अधिकारी श्री. सुनिल मडावी, ट्रायबल वेलफेअर कमिटी इंटरनॅशनल, नागपूरचे डिस्ट्रिक्ट चेअरमन श्री. राजीव वरभे, शालिनीताई मेघे रक्तपेढी, नागपूरचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री. अश्विन रडके यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशन्स, उपपोलीस स्टेशन्स व पोलीस मदत केंद्रांचे प्रभारी अधिकारी, पोलीस मुख्यालय, गडचिरोली, पोलीस उपमुख्यालय प्राणहिता, पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत असलेले विविध शाखांचे अधिकारी व अंमलदार, नागरी कृती शाखा, पोलीस कल्याण शाखा, जनसंपर्क शाखा तसेच जिल्हा सामान्य रुणालय गडचिरोली, उपजिल्हा रुग्णालय, अहेरी आणि शालिनीताई मेघे रक्तकेंद्र, नागपूर येथील वैद्यकीय पथकांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे हे सर्व उपक्रम यशस्वीपणे पार पडले आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा एक आदर्श निर्माण झाला. ■

लेख



जयंत नाईकनवरे
आयपीएस (सेवानिवृत्त)

# पोलीस प्रतिमा

**चित्रपट हे जनमानसावर व्यापक परिणाम घडवून आणणारे माध्यम. मात्र यात पोलिसांची प्रतिमा अनेकदा अतिरंजित रंगवली जाते. कधी त्यांची व्यक्तिरेखा अयोग्य, चुकीचीही वाटू शकते. त्याच वेळी क्वचित एखादी व्यक्तिरेखा उत्तम वठवली जाऊन छाप पाडून जाते. प्रत्यक्षातलं पोलिसिंग मात्र अगदी थोडा फरक सोडला तर सगळीकडे एकसारखंच असतं...**



जॉनरनुसार चित्रपटांची विभागणी ॲक्शनपट (ॲव्हेंजर्स, टायगर), विनोदी (३ इडियट्स, हाऊसफुल), नाट्यमय (आनंद, दृश्यम), भयपट (द कॉन्जूरिंग, तुंबाड), सायन्स फिक्शन (अवतार, कोई मिल गया), प्रणय (दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे, टायटॅनिक), रहस्यपट (अ वेनस्डे), साहसी प्रवास, शोध मोहीम (पायरेट्स ऑफ द कॅरिबियन), ॲनिमेशन ( द

लायन किंग, कोको), ऐतिहासिक / पौराणिक (बाहुबली, तानाजी) याप्रमाणे केली जाते. ज्यावेळी चित्रपटाची कथा लिहिली जाते त्यावेळी तो चित्रपट कोणत्या जॉनरमध्ये लिहावा हे ठरवलं जातं. एकापेक्षा जास्त जॉनर असू शकतात, परंतु प्रेक्षकांच्या चटकन लक्षात येण्यासाठी चित्रपट कोणत्या मुख्य प्रकारात मोडेल हे ठरवलं जातं. प्रत्येक प्रकाराच्या कथा लिहिण्याचे काही ठोकताळे अनुभवानुसार ठरले गेले आहेत. विनोदी चित्रपटात कितीही अचाट साहस आणि परिस्थिती आली तरी शक्यतो मृत्यू झालेला दाखवण्यात येत नाही. भयपटात विनोद वर्ज्य असतो वगैरे. कथासूत्र (थीम), नायक आणि खलनायक ही चित्रपटाची प्रमुख पात्रं असतात.

पोलीस अधिकारी हा चित्रपटात नायक, खलनायक, विनोदी पात्र, सहायक अभिनेता वा इतर कोणत्या भूमिकेमध्ये आहे यावरून त्याची प्रतिमा कशी असेल याचा आपण अंदाज बांधू शकतो. जिथे चित्रपटाचा नायक पोलीस अधिकारी आहे तिथे तो सुपरकॉप दाखवला जातो. खलनायक असेल तर भ्रष्ट, मारकुटा आणि अर्वाच्य बोलणारा असतो. विनोदी पात्र म्हणून असेल तर भोळसट, सहज फसवला जाऊ शकणारा असतो. नायकाला सगळं श्रेय देता यावं म्हणून क्लायमॅक्सनंतर कायदेशीर सोपस्कार पूर्ण करण्यासाठी पोलीस आल्याचं दाखवलं जातं. सिनेमा हे करमणुकीचं साधन असल्यामुळे या प्रकारचं पोलिसांना स्टिरीओटाईप करताना सिनेमॅटिक लिबर्टीज घेतल्या जातात. साधारणपणे सुजाण प्रेक्षक या नकारात्मक गोष्टींकडे करमणुकीचा भाग मानून दुर्लक्ष करतात.

जंजीर (१९७३) चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी प्रामाणिक पोलीस उपनिरीक्षकाची केलेली भूमिका प्रेक्षकांना जितकी भावली, तितकीच दीवार (१९७५) मधली स्मगलरचीही आवडली. 'अँग्री यंग मॅन' ही त्यांची प्रतिमा या दोन चित्रपटांमुळे तयार झाली. एकीकडे वर्दीच्या माध्यमातून गुन्हेगारीवर वचक बसवणारा नायक, तर दुसरीकडे प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध कायदेभंग करून गुन्हेगार बनलेला नायक त्यांनी साकारला. एकीकडे ''ये पुलिस स्टेशन है, तुम्हारे बाप का घर नहीं'' हा सुप्रसिद्ध डायलॉग शेरखान (प्राण) ला ऐकवणारा ठाणेदार तर दुसरीकडे ''जाओ, पहले उससे साईन लेकर आओ जिसने मेरे हाथ पे ये लिखा था' असं आपला पोलीस उपनिरीक्षक भाऊ रवि (शशी कपूर) याला ठणकावून सांगणारा गुन्हेगार विजय या दोन विरोधाभासी भूमिका अमिताभ बच्चन यांनी केल्या. पोलीस विभागापुरतं सांगायचं झालं तर सलीम–जावेद या जोडगोळीने आपल्या लेखनातून अतिशय सकारात्मक पोलीस अधिकारी उभे केले. एका चित्रपटात जॉनी लिव्हर पोलीस निरीक्षक असतो आणि आपल्याच पोलीस स्टेशनमध्ये खलनायकाला इतका घाबरतो, की भीतीने त्याची पँट ओली होते असा सिनेमॅटीक लिबर्टीच्या नावाखाली अतिरंजित प्रसंग चित्रित केला होता. तत्कालीन पोलीस आयुक्त श्री. एम. एन. सिंह यांनी दिग्दर्शकाला फोन करून त्याची चांगलीच कानउघाडणी केली होती.

> **पोलीस अधिकारी हा चित्रपटात नायक, खलनायक, विनोदी पात्र, सहायक अभिनेता वा इतर कोणत्या भूमिकेमध्ये आहे यावरून त्याची प्रतिमा कशी असेल याचा आपण अंदाज बांधू शकतो.**

ज्यावेळी सकारात्मक भूमिकेत नायक हा पोलिसांच्या वर्दीत दाखवला जातो त्यावेळी तो सुपरकॉप असतो. अमर, अकबर, अँथनी (१९७७) मधला पोलीस निरीक्षक अमर (विनोद खन्ना) टपोरी अँथनी (अमिताभ बच्चन) याचं, 'वर्दीत आहेस म्हणून काही करत नाही,' हे आव्हान युनिफॉर्मचा शर्ट काढून ठेवून स्विकारतो आणि अँथनीची धुलाई करतो. सिंघम (२०११) मधला

पोलीस निरीक्षक बाजीराव (अजय देवगण) हा पोलीस मॅन्युअलमध्ये कुठेही न बसणाऱ्या कार्यपद्धतीने गुन्हेगारांना, मग तो मंत्री का असेना, मारहाण करतो. याउलट ओमकारा (२००६) मधल्या बाहुबलींच्या 'जुबांपे लागा नमक इश्क का' ह्या तवायफच्या गाण्यात पोलीस शिपाई वर्दीत बेधुंद नाचताना चित्रित केले आहेत. यातून बाहुबलींची ताकद इतकी, की सगळं पोलीस दल भ्रष्ट होऊन त्यांना सामील झालं आहे असा चुकीचा संदेश प्रेक्षकांना दिला गेला.

ज्यांनी पोलीस विभागात काम केलं आहे त्यांना जर विचारलं की पुन्हा कोणत्या प्रकारचं काम करायला आवडेल तर त्यातले बहुतेकजण पुन्हा पोलीसच व्हायला आवडेल असं सांगतील इतकी ही नोकरी अंगामध्ये संचारते. इंग्रजीमधलं एक वाक्य वाचण्यात आलं होतं 'ऑल मेन आर नॉट बॉर्न इक्वल ओन्ली द फाईनेस्ट बिकम पोलीस.' त्याचा मराठीत ढोबळ अनुवाद असा, की सगळी माणसं समान जन्माला येत नाहीत; केवळ सर्वोत्तमच पोलीस होतात. जरी अतिशयोक्ती असली तरी पोलीस दलाचं मनोबल वाढवण्यासाठी अशा उक्तींचा उपयोग जगभरात केला जातो. 'कामावरचा प्रत्येक दिवस निरनिराळी आव्हानं घेऊन येतो...' हे पोलीस विभागाला जितकं लागू होतं तितकं इतर कोणत्याही विभागाला क्वचितच लागू होत असेल.

गुन्हे प्रकटीकरण हे अजब रसायन आहे. गुन्हा कुणी केला हे शोधून काढणं म्हणजे गूढ उकलणं.. गुन्हेगार आपण पकडले जाऊ नये म्हणून वेगवेगळ्या क्लृप्त्या लढवतात, पुरावे नष्ट करतात, दिशाभूल होईल अशी माहिती देतात. डिटेक्टिव्ह हा अनुभवाने मानसशास्त्र जाणतो आणि त्यामुळे परिस्थितीजन्य पुरावे, गुन्ह्याचा हेतू, लाभार्थी, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साक्षीदार आणि फॉरेन्सिक तंत्रज्ञानाचा वापर करून आरोपी शोधून काढतो. ही प्रक्रिया लोकांसाठी कुतुहलाचा विषय असते. प्रसारमाध्यमं गुन्हे प्रकटीकरणाच्या प्रक्रियेबाबतची माहिती लोकांपर्यंत पोहोचवताना ती अधिक रंजक कशी होईल हे धोरण ठेवतात. गुन्हेतपास आणि पोलिसांच्या कामाचा भाग असलेल्या इतर बाबींतून नाट्यमय घडामोडी समोर येतात. गुन्हेगारांच्या शातीर मेंदूतून गुन्हे लपवण्याच्या वेगवेगळ्या पद्धती आणि पोलिसांनी त्यांच्यावर मात करून त्यांचा केलेला पर्दाफाश हा जनसामान्यांच्या चर्चेचा विषय होऊन जातो. गंभीर गुन्ह्यांमुळे सामान्यांचं जीवन लगेच प्रभावित होतं. भीतीचं वातावरण, अन्याय झाल्याची भावना, कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाल्याने विस्कळीत झालेलं जनजीवन या सगळ्यांची तात्काळ दखल घेऊन कारवाई करण्याच्या बाबी पोलीस विभागाच्या दैनंदिन कामकाजाचा भाग असतात. चित्रपटाच्या कथानकांत हे 'प्लॉट' फार महत्त्वाचे असतात. त्यामुळे पोलिसांच्या कामकाजाकडे चित्रपट लेखकांचे प्लॉट पॉईंट शोधण्यासाठी लक्ष असतं. गुन्हेगारांचा पाठलाग, गुन्हे प्रकटीकरण, गुन्हे करण्याच्या विविध पद्धती (मोडस ऑपरेंडी), कायद्याच्या प्रक्रियेशी निगडीत प्रसंग दाखवताना पोलिसांच्या कार्यपद्धतीला तिखटमीठ लावून चित्रित केल्या जातात.

> **जिवाची बाजी लावून काम करण्याचे प्रसंग पोलीस जीवनात नेहमीचेच असतात. कोविडदरम्यान नागरिकांना याचा अनुभव आला आहे.**

जिवाची बाजी लावून काम करण्याचे प्रसंग पोलीस जीवनात नेहमीचेच असतात. कोविडदरम्यान नागरिकांना याचा अनुभव आला आहे. जातीय दंगली, नैसर्गिक आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, अतिरेकी हल्ले आणि समाजजीवन बाधित करणाऱ्या सगळ्या प्रसंगांना तोंड देण्यासाठी पोलीस सदैव तत्पर असतो. चित्रपट आणि माध्यमातून पोलीस विभागाची



नकारात्मक प्रतिमा तयार करून तिला बढावा देणं हे समाजहिताचं नाही. या माध्यमांवर नियंत्रण असणाऱ्या सरकारी यंत्रणांनी या गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पोलीस विभागाची अवास्तवी नकारात्मक प्रतिमा तयार करून ती मनोरंजनाच्या नावाखाली लोकांच्या गळी उतरवण्याने समाजाचीही हानी होते. सेन्सॉर बोर्डाकडे चित्रपट प्रदर्शनायोग्य आहे का याची पडताळणी करण्यासाठी येतो तेव्हा धोरणाचा भाग म्हणून युनिफॉर्म सर्व्हिसेसवर मनोरंजनाच्या नावाखाली विनाकारण शिंतोडे उडवले जाणार नाहीत याची खबरदारी घेण्याची गरज वाटते. पोलिसांचा एखादा प्रतिनिधी अशा नियामक मंडळावर असावा किंवा आवश्यकतेनुसार संलग्न करण्यात यावा.

**सेन्सॉर बोर्डाकडे चित्रपट प्रदर्शनायोग्य आहे का याची पडताळणी करण्यासाठी येतो तेव्हा धोरणाचा भाग म्हणून युनिफॉर्म सर्व्हिसेसवर मनोरंजनाच्या नावाखाली विनाकारण शिंतोडे उडवले जाणार नाहीत याची खबरदारी घेण्याची गरज वाटते.**

पोलीस विभागाचं मनोबल उत्तम राहिलं तर त्यांच्याकडून चांगलं काम करून घेता येतं हे पोलीस प्रशासनात रुजवलं गेलेलं तत्त्व आहे. जगभरातलं पोलिसिंग हे थोड्याफार फरकाने सारखंच असतं. त्यामुळे ते युनिव्हर्सल आहे. संयुक्त राष्ट्रसेनेच्या शांतिसेनेत काम करताना जगभरातले पोलीस अधिकारी ज्यावेळी एकत्र येतात त्यावेळी ही गोष्ट प्रकर्षाने जाणवते. जगभरात पोलिसांच्या कामाचे अनियंत्रित तास, मनुष्यबळाची वानवा, वेळी–अवेळी कर्तव्यासाठी पाचारण केलं जाणं, कौटुंबिक आयुष्याकडे दुर्लक्ष, तरीही समाजात नकारात्मक प्रतिमा या गोष्टी सारख्याच असल्याचं जाणवतं. हा जगभरात असलेला जणू एक धर्म आहे. न्याय हा या धर्माचा देव, सुव्यवस्था ही देवी तर बंदोबस्त ही त्याची आरती आहे. त्याच्या टेन कमांडमेंट्स राज्यघटनेकडून आल्या. दंड संहिता, प्रक्रिया संहिता आणि पुरावा कायदा हे त्याचे श्रुती ग्रंथ, रेजिमेंटेशन ही वर्णव्यवस्था, तर स्वातंत्र्य–समता–बंधुभाव ही त्याची त्रिपिटिका आहे. घर–गृहस्थी, ऐषोआराम, सुख समाधान त्यागलेले कित्येक वेडे पीर हे धर्मगुरु आणि आदेशपालनाचे टाळ–मृदंग वाजवत नाचणारे लाखो वैष्णवभाई या धर्मात आहेत. या धर्माची तत्त्वं आणि निष्ठा आत घेतल्यावर शिकवल्या जातात. एकदा या धर्मात प्रवेश झाला, की यातून सहजासहजी सुटका नाही. हा अस्तित्वाचा भागच बनून जातो. याच्या वस्त्रांमागं हजार हत्तींचं बळ आहे. चोवीस तास भक्ती करायला लावणारा हा धर्म एकदा का साधकांच्या अंगवळणी पडला की सदैव अंगात संचारत राहतो. अगदी रिंगटोन बंद करून ठेवलेला मोबाईल थरथरावा तसा. यातल्या मेंबरशिपला एक्सपायरी डेट आहे आणि अनुवांशिक नसल्यानं कवचकुंडलं आणि सरंजामातलं नेटवर्क बंद केलं जातं. हत्तींचं बळ गेलं तरी त्यातलं स्पिरीट काही जात नाही. पोलीस माझे नाव, भारत माझे गाव... ■



प्रकाश जाधव
पोलीस अधीक्षक
छत्रपती संभाजीनगर
(ग्रामीण)

### ऑपरेशन शोध-४ अंतर्गत १७ लेकरं सुखरूप कुटुंबात परतली.

# पोलिसांच्या अथक प्रयत्नांनी

## १७ कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा फुलला आनंद..

घरातून गेलेल्या प्रत्येक मुलामागे एका आईची तगमग, एका वडिलांची असहायता आणि एका कुटुंबाचे उद्ध्वस्त झालेले विश्व असते. त्या विश्वाला पुन्हा उभे करण्याचे काम 'ऑपरेशन शोध-४'च्या माध्यमातून छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) पोलिसांनी तब्बल १७ कुटुंबांच्या आयुष्यात केले आहे.

घरातील रिकामी खोली, जेवणाच्या ताटाकडे लागलेली नजर, प्रत्येक फोनच्या रिंगबरोबर वाढणारी धडधड आणि घर सोडून गेलेल्या लेकराच्या प्रतीक्षेत जागून काढलेल्या रात्री.. 'ऑपरेशन शोध-४' मुळे अशा १७ कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा आनंदाचा सूर्य उगवला आहे.

महाराष्ट्र राज्यात अपहृत बालकांचा शोध घेण्यासाठी दि. ०८ ते २३ जून २०२६ या कालावधीत 'ऑपरेशन शोध - ४' ही मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) पोलिसांनी उल्लेखनीय यश संपादन करत १३ मुली व ०४ मुले अशा एकूण १७ बालकांचा शोध घेऊन त्यांना सुखरूपपणे त्यांच्या कुटुंबियांच्या स्वाधीन केले आहे.

ही मोहीम केवळ अपहृत मुले मुली यांचा शोध घेण्यापुरती मर्यादित नव्हती, तर तुटलेली कुटुंबे पुन्हा एकत्र आणणे, पालकांच्या डोळ्यांमधील अश्रूंना आनंदाश्रूंमध्ये बदलणे आणि हरवलेला विश्वास पुन्हा निर्माण करणे या संवेदनशील गोष्टींची जबाबदारीदेखील या पोलिसांवर होती.

या मोहिमेच्या दरम्यान पोलिसांनी गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण, इतर जिल्ह्यांमधील पोलीस दलांशी असलेला समन्वय आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा, रेल्वे स्टेशन्स, बसस्थानके, गर्दीची ठिकाणे, तसेच सोशल मीडिया अकाऊंट्स यांचा वापर करून प्रत्येक धागा तपासला तेव्हा ही मुले सुखरूप शोधण्यात पोलिसांना यश आले.

या १७ बालकांपैकी ११ मुली या प्रेमसंबधांच्या प्रभावामुळे, तर ०२ मुली रागाच्या भरात घर सोडून निघून गेलेल्या होत्या. ०३ मुले मोठे शहर पाहण्याच्या आकर्षणातून

घराबाहेर पडली होती, तर ०१ मुलगा हा आई–वडिलांमधील सततच्या वादांमुळे मानसिकदृष्ट्या त्रस्त होऊन घर सोडून गेला होता.

ऑपरेशन शोध – ४ दरम्यान अनेक प्रकरणात पोलिसांना आढळून आले, की क्षणिक आकर्षण आणि आभासी जगातील खोट्या स्वप्नांचा प्रभाव यांमुळे भूलथापांना बळी पडून यापैकी बहुतेक मुलांनी घर सोडले होते.

या मोहिमेदरम्यान प्रेमाच्या नावाखाली भूलथापांना बळी पडणाऱ्या ११ मुली निष्पन्न झाल्या आहेत. सोशल मीडिया, मोबाईलवरील सतत संपर्क, भावनिक आधाराचे आश्वासन आणि वास्तवापासून दूर असलेली आभासी नाती यांमुळे अनेक अल्पवयीन मुली भावनिकदृष्ट्या प्रभावित होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने सुरुवातीला प्रेम, काळजी आणि साथ देण्याची गोड आश्वासने दिली गेली.

याखेरीज या प्रकरणामध्ये पोलिसांनी संवेदनशीलतेचे दर्शन घडवत खालील प्रकरणे प्रकर्षाने समोर आणली आहेत.

### १) इन्स्टाग्रामच्या आभासी दुनियेत हरवलेली मुलगी पुण्यातून शोधली

पोलीस ठाणे चिकलठाणा हद्दीतील १७ वर्षीय मुलगी सोशल मीडियावर विशेषतः इन्स्टाग्राम वर सक्रिय होती. आभासी जगातील आकर्षण आणि वास्तव आयुष्याविषयी निर्माण झालेल्या चुकीच्या समजुती, उच्चभ्रू राहणीमानाचे अधिक आकर्षण तसेच घरातील शिस्त यांच्यामुळे रागाच्या भरात तिने २९ मे २०२६ रोजी घर सोडले. मुलगी अचानक बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयामध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी तिच्या सोशल मीडिया अकाऊंट्सची तपासणी केली. तिच्या संपर्कातील व्यक्तींची कसोशीने चौकशी केली असता एका सूक्ष्म धाग्याने तपासाला दिशा मिळाली आणि ती पुण्यातील एका मैत्रिणीकडे असल्याची माहिती मिळाली. तिला सुरक्षित ताब्यात घेण्यात आल्यानंतर समुपदेशनादरम्यान तिला डिजिटल जग आणि वास्तव आयुष्य यातील फरक समजावून सांगण्यात आला व तिला सुखरूपपणे कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले.

**मोहिमेदरम्यान प्रेमाच्या नावाखाली भूलथापांना बळी पडणाऱ्या ११ मुली निष्पन्न झाल्या आहेत. सोशल मीडिया, मोबाईलवरील सतत संपर्क, भावनिक आधाराचे आश्वासन आणि वास्तवापासून दूर असलेली आभासी नाती यांमुळे अनेक अल्पवयीन मुली भावनिकदृष्ट्या प्रभावित होत आहेत.**

### २) आई- वडिलांच्या सततच्या भांडणांना कंटाळून घर सोडलेला मुलगा

करमाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १४ वर्षीय मुलगा घरातील सततच्या कौटुंबिक वादामुळे मानसिकदृष्ट्या त्रस्त झाला होता. आई आणि वडील यांच्या सततच्या भांडणांना कंटाळून त्याने कोणालाही न सांगता १७ जून २६ रोजी घर सोडले होते.

पोलिसांनी सातत्याने शोध घेत विविध बसस्थानके, रेल्वे स्टेशन्स आणि सार्वजनिक ठिकाणी तपास केला. अखेर २१ जून २६ रोजी तो मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन परिसरात अनवाणी फिरताना आढळून आला. याप्रंसगी त्याच्या आई वडिलांचे मतपरिवर्तन करण्यात आले, तसेच मुलांचे समुपदेशन करून त्याला कुटुंबाच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

### ३) अभ्यासाच्या तणावातून घर सोडलेली मुलगी

शिऊर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १७ वर्षीय मुलगी

अभ्यासाच्या कारणावरून आईसोबत झालेल्या वादानंतर २१ मे २०२६ रोजी घरातून निघून गेली होती. मुलगी बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयाची चिंता शिगेला पोहोचली होती. पोलिसांनी विविध ठिकाणी शोध मोहीम राबवून नातेवाईक, मित्रपरिवार आणि संपर्कातील व्यक्तींची चौकशी केली, तेव्हा ती तिच्या नातेवाईकांकडे सुखरूप असल्याचे निष्पन्न झाले. समुपदेशनानंतर तिला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने अभ्यासाच्या तणावातून तिने घर सोडल्याचे निष्पन्न झाले आहे.

### ४)मुंबई पाहायची होती आणि तीन मित्र घरातून निघाले

शिऊर हद्दीतील १५ ते १६ वयोगटातील तीन मुले मुंबई शहर पाहण्याच्या उत्सुकतेतून घरातून निघून गेली होती. त्यांच्यासाठी हा साहसाचा प्रवास होता, मात्र त्यांच्या कुटुंबीयांसाठी तो काळजाचा ठोका चुकवणारा प्रसंग होता.

पोलिसांनी तत्काळ शोध मोहीम सुरू करून रेल्वेमार्ग स्थानके, अनेक सी. सी. टी. व्ही. फुटेजेस तपासली आणि अखेर दादर रेल्वे स्थानक परिसरातून या तिघांचा शोध घेण्यात आला. त्यांना सुरक्षित ताब्यात घेऊन त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

याप्रसंगी प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक यांनी सांगितले, की घरातून गेलेले प्रत्येक मूल हे पुन्हा आई–वडिलांच्या कुशीत परत आणणे हा आमच्यासाठी सर्वात मोठा आनंद असतो. 'ऑपरेशन शोध ४' मध्ये मिळालेले यश म्हणजे १७ कुटुंबांच्या आयुष्यात पुन्हा आनंद, विश्वास आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करण्याचे काम आहे. पालकांनी

**शिऊर हद्दीतील १५ ते १६ वयोगटातील तीन मुले मुंबई शहर पाहण्याच्या उत्सुकतेतून घरातून निघून गेली होती. त्यांच्यासाठी हा साहसाचा प्रवास होता, मात्र त्यांच्या कुटुंबीयांसाठी तो काळजाचा ठोका चुकवणारा प्रसंग होता.**

मुलांशी नियमित संवाद साधवा, त्यांच्या भावनिक बदलांकडे लक्ष द्यावे, मित्रपरिवार व सोशल मीडिया वापराबाबत जागरूक राहावे आणि कोणतीही घटना घडल्यास तत्परतेने पोलिसांशी संपर्क साधावा.

नमूद कारवाई ही छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) येथील प्रकाश जाधव, पोलीस अधीक्षक, प्रशांत स्वामी, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक सरला गाडेकर, वैभव रणखांब, समाधान पवार, पोलीस उपनिरीक्षक गणेश काळे, मनोज पाटील, सचिन क्षिरसागर, विश्वजित फरताडे, ज्ञानेश्वर कांयदे, दगडू तडवी, दीपक पारधे, विनोद भालेराव, स्वप्निल नरवडे, गणेश वाघ, मनेश जाधव, पोलीस अंमलदार शरद पवार, जाकेर शेख, कपिल बनकर, भाग्यश्री चव्हाण यांनी पूर्ण केली आहे. ■


**S.B.Collect**

छापील/ई-मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी भेट द्या:

**https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php**

अथवा

खालील क्युआर कोड मोबाईलमध्ये स्कॅन करा





सुनील भाबड
पोलीस निरीक्षक,
नंदुरबार तालुका पोलीस ठाणे,
नंदुरबार

# लांडगा

**लांडगा हे क्रौर्याचे प्रतीक. असेच क्रौर्य नंदुरबार तालुका पोलीस ठाण्याच्या तपासपथकाला 'याचि देही याचि डोळा' बघायला मिळाले. प्रकरण होते एका चिमुरडीवरील शारीरिक अत्याचाराचे. त्या लहानगीला कोणत्या चुकीची ही शिक्षा मिळाली होती? हा लांडगा कोण होता, ज्याने तिच्या अब्रूचे असे लचके तोडले होते?**



लपाछपी. सगळ्या लहान मुलांचा आवडता खेळ. त्यात खेड्यापाड्यांमध्ये तर मुलांना फारशी आधुनिक खेळणी उपलब्ध नसतातच कधी! त्यामुळे लपंडाव, पकडापकडी, काचापाणी अशा खेळांवरच मुलांना अवलंबून राहावे लागते. नाही म्हणायला मोबाईल, स्मार्टफोन अशा साधनांनी खेडेगावात प्रवेश केलेला असला तरीही अजूनही दहा–बारा वर्षांच्या आत वय असलेली मुले मुक्तपणे अंगणात हे खेळ खेळत बागडत असतात. हे खरे तर सुखावणारे चित्र आहे. त्या छोट्याशा गावातही हेच चित्र होते. पण त्या



राजेंद्र धनगर
पोलीस अंमलदार,
नंदुरबार तालुका पोलीस ठाणे,
नंदुरबार

दिवशी मात्र त्या चित्राला कुणाची तरी नजर लागायची होती.

जेमतेम सात वर्षाची पिंकी आपल्या सवंगड्यांबरोबर खेळत होती. लपंडावाचा खेळ अगदी रंगात आला होता आणि त्या डावाला पिंकीवरच राज्य आले होते. एका पडक्या घरापाशी असलेल्या खांबाला टेकून तिने डोळे झाकून घेतले आणि १ ते १० अशी अंकगणती केली. दरम्यानच्या काळात तिचे सवंगडी इतस्ततः पांगले. प्रत्येकाने लपण्यासाठी आपल्याला हव्या तशा जागा शोधल्या. त्या सवंगड्यांमध्ये तिचा मोठा भाऊ आणि मामेभाऊ हेही होते. तेही एका आडोशाला लपून बसले होते. त्याचवेळी पिंकी वयाने लहान म्हणून तिच्याकडे लक्ष ठेवून होते. जेमतेम दहा अंक म्हणून पिंकी डोळे उघडून पाठीमागे वळली आणि तेवढ्यात तिला समोरून येणारा रतन काका दिसला. रतन काका हा तिच्या साधारण ओळखीचा होता. तिची आई ज्या शेतात मजुरी करत असे तिथेच हा रतन काकाही यायचा. दोन्ही कुटुंबांची जुजबी ओळख होती. रतन काकाला पिंकीपेक्षा थोडी मोठी मुलगी होती.

पिंकीला रतन काकाला आपल्याकडे येताना बघून काहीसे आश्चर्य वाटले. तेवढ्यात रतन काकाने तोंडावर बोट ठेवून तिला गप्प राहण्याची खूण केली आणि तिच्या अगदी जवळ येऊन



**प्रत्येकाने लपण्यासाठी आपल्याला हव्या तशा जागा शोधल्या. त्या सवंगड्यांमध्ये तिचा मोठा भाऊ आणि मामेभाऊ हेही होते. तेही एका आडोशाला लपून बसले होते.**

कुजबुजत्या आवाजात म्हणाला,

''तू त्या दिवशी तुझ्या आईला बोलत होतीस ना तुला धरण बघायला जायचंय म्हणून?''

''होऽऽ'' पिंकीने डोळे मोठे करत उत्तर दिले.

''चल माझ्याबरोबर. मी दावतो तुला धरण. लय मजा असती तिथं. मस्त पाणीच पाणी असतंय,''

''पण आत्ता आम्ही खेळून राहिलोय...''

''अगं तीच तर मजा हाय.. आता कसं, तुझ्यावर राज्य आलंय की नाय? आता तूच जर गायब झाली तर तुझ्या सवंगड्यांची कशी मज्ञा येईल! त्यांनाच तुला शोधत बसावं लागेल, पिंकी कुठे गेली? पिंकी कुठे गेली? म्हणून. म्हणजे राज्य आलंय तुझ्यावर, पर ते त्यांच्यावर आल्यासारखंच होईल की नाय? आन मंग बसू देत शोधत त्यांना! मंग आपन मजा बघायची...''

ही कल्पना पिंकीला आवडली. असले काहीतरी तिने स्वप्नातही कल्पिले नव्हते.

''चल!'' ती उड्या मारत त्याच्याबरोबर निघाली.

धरण तिथून फार लांब नव्हते. पण पिंकी धरणापर्यंतही जाणार नव्हती. याचे कारण मध्ये असणाऱ्या एका शेतात रतन तिला घेऊन गेला.

''या बाजूने चल. इथून शार्टकट हाय. आपण पटकन जाऊ तिथं.''

पिंकी भाबडेपणाने त्याच्या मागून गेली.

इकडे पिंकीवर नजर ठेवून असणाऱ्या तिच्या दोन मोठ्या भावांना काहीतरी वेगळे घडत असल्याची शंका आली. पिंकी रतनबरोबर कशासाठी गेली, हे त्यांना समजेना. ते तसेच बाहेर आले आणि तिच्या मागोमाग जाऊ लागले. साधारण ज्या शेतात त्यांनी तिला जाताना बघितले होते त्या शेतापाशी जाऊन ते थांबले, तोच त्यांना पिंकीच्या रडण्याचा, ओरडण्याचा आवाज आला. काहीतरी भयानक घडले असावे हे त्या दोघांनाही जाणवले. दोघांचेही चेहरे पांढरेफटक पडले. ते एकमेकांकडे बघू लागले. तेवढ्यात तिथून जाणाऱ्या एका मध्यमवयीन माणसाने पण पिंकीचा आरडाओरडा ऐकला आणि या मुलांचे भेदरलेले चेहरे पाहिले. त्यांनी थांबून त्यांच्याकडे चौकशी केली. तेव्हा दोघांनी आपण जे काही बघितले ते त्याला सांगितले.

त्या माणसाने ताबडतोब आपला फोन काढला आणि एक नंबर फिरवला. महाराष्ट्र पोलिसांतर्फे राबविण्यात आलेली अनोखी जीव रक्षक प्रणाली म्हणजे डायल ११२. आत्ताचा फोन हा याच नंबरवर केला गेला होता. या प्रणालीच्या माध्यमातून तक्रारीची तत्काळ दखल घेतली गेली व त्वरित प्रतिसाद देत नंदुरबार तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले.

पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे गुन्हेगाराला पळून जायला वाव मिळाला नाही. तो घटनास्थळीच आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

त्यानंतर पिंकी अल्पवयीन असल्याने तिच्या आईची फिर्याद पोलिसांनी दाखल करून घेत



**त्या माणसाने ताबडतोब आपला फोन काढला आणि एक नंबर फिरवला. महाराष्ट्र पोलिसांतर्फे राबविण्यात आलेली अनोखी जीव रक्षक प्रणाली म्हणजे डायल ११२. आत्ताचा फोन हा याच नंबरवर केला गेला होता.**

आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवला. त्याचप्रमाणे पीडितेच्या वयाचा दाखला प्राप्त करण्यात आला. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. आरोपीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तसेच पीडितेचीही वैद्यकीय तपासणी करून आरोपी आणि पीडिता यांच्या शरीरावर घटनेच्या वेळी परिधान असलेले कपडे जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमाल सीए तपासणीकरिता पाठवण्यात आला.

तसेच अल्पवयीन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि इतर महत्त्वाचे साक्षीदार यांचे बीएनएस १८३ नुसार न्यायालयासमोर जबाब नोंदवण्यात आले. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून आरोपीविरोधात मा. न्यायालयात पाच दिवसात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

मा. न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत भान्यासं (६५)(२) अन्वये वीस वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड, भान्यासं (१३७)(२) अन्वये दोन वर्षे सक्षम कारावास व १००० रुपये दंड, पोक्सो कलम ४ अन्वये वीस वर्षे सक्षम कारावास व पाच हजार रुपये दंड, पोक्सो कलम ६ अन्वये वीस वर्षे सक्षम कारावास व पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

नंदुरबार तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील भाबड व पोलीस अंमलदार राजेंद्र धनगर यांनी सदर प्रकरणाचा तपास जलदगतीने आणि उत्तम प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



सुरेश वांदिले
मुंबई

# इन्फ्ल्युअन्सर्स आणि क्रिएटर इकॉनॉमीचा उदय

**जगात सगळ्यात जास्त शाश्वत गोष्ट म्हणजे बदल! आज पारंपरिक जाहिरात आणि मार्केटिंगच्या क्षेत्रातही अनेक बदल होत असून इन्फ्ल्युअन्सर्स आणि क्रिएटर इकॉनॉमीचा उदय हा याचाच एक पैलू आहे. या सगळ्याचा आढावा आणि या क्षेत्रातील रोजगार संधी यावर भाष्य करणारा लेख.**




समाजमाध्यमे चांगली की वाईट? याची सर्वत्र चर्चा होत असतानाच, आपल्याकडे वेगवेगळ्या इन्फ्ल्युअन्सर्सची (समाजमनावर प्रभाव पाडणाऱ्या व्यक्ती) सतत भर पडताना दिसते. स्वत:च्या स्मार्टफोनला एका स्टुडियोमध्ये रूपांतरीत करण्यात ही मंडळी यशस्वी झाली आहेत.

या मंडळींनी स्मार्टफोनमधील विविध टूल्सच्या वापरावर हुकूमत मिळवली आहे. स्वत:च्या सर्जनशील गुणवत्तेचा उपयोग करुन ही मंडळी असंख्य विषयांवर रील्स तयार करताहेत. शेकडो, हजारो किंवा अगदी लाखो दर्शक या रील्सच्या प्रेमात पडताहेत.

## 'क्रिएटर इकॉनॉमी'ची पायाभरणी

या आकडेवारीत अनेक कंपन्यांनी व्यवसाय संधी शोधायला सुरुवात केली आहे. या मंडळींमुळे 'क्रिएटर इकॉनॉमी'ची पायाभरणी झाली आहे. स्वत:चे म्हणणे एखाद्या कथनाच्या स्वरूपात सांगण्याची, त्याला आपली संस्कृती, परंपरा, धार्मिक मान्यता आदींची जोड देण्याची कलाही या मंडळींनी अवगत केल्याने ते सर्वसामान्यांना आकर्षित करण्यात यशस्वी होताना दिसतात.

## भविष्यातील वाढ

आपल्या देशात एकत्रितपणे हजारो तास वेगवेगळ्या प्रकारचे आशय असलेले रील्स बघितले जातात. त्यामुळे या मंडळींच्या माध्यमातून अनेक गोष्टींचा प्रभाव दर्शकांवर पडतो. एका अधिकृत आकडेवारीचा विचार करता जगातील सर्वात तरुण इंटरनेट लोकसंख्या भारतीयांची असल्याचे दिसून आले आहे. आपल्या देशात चहा किंवा कॉफीच्या एका कपापेक्षा स्वस्त असे डेटा प्लॅन्स मोबाईल कंपन्यांनी उपलब्ध करून दिले आहेत. याचाही हा परिणाम आहे.

अनेक सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांना हे इन्फ्ल्युअन्सर्स व्यवसायवृद्धीसाठी चांगला हातभार लावू शकतात याची खात्री पटली आहे. या मंडळींमुळे व्हिडिओ एडिटर्स, कम्युनिटी मॅनेजर्स, फिनटेक स्टार्टअप्स यांच्या संख्येत चांगलीच वाढ झालीय. या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या अंदाजानुसार २०२५ मध्ये देशातील क्रिएटर अर्थव्यवस्थेतील वार्षिक उलाढाल १२,००० कोटीच्या आसपास झाली. दरवर्षी ही वाढ २२ टक्के होऊन २०३२ पर्यंत ही उलाढाल जवळपास ४९,००० कोटीपर्यंत पोहोचेल, असा अंदाज तज्ज्ञांनी वर्तवला आहे.

> **इन्स्टाग्राम, यूट्यूब अशा व्यासपीठांवर डॅशबोर्ड असतात. त्यावर दर्शकांची/ व्ह्यूजची संख्या आपोआप नोंदवली जाते. त्याचा संबंध महसुलाशी जोडला जात असल्याने इन्फ्ल्युअन्सर्सना चांगले उत्पन्न मिळू लागते.**

## जाहिरात क्षेत्रातील बदल

इन्फ्ल्युअन्सर्सचा प्रभाव लक्षात घेऊन कंपन्या/कॉर्पोरेट्स जाहिरातीतील निधींचा मोठा वाटा त्यांच्याकडे वळवत आहेत. एका संस्थेच्या ग्राहक सर्वेक्षणानुसार, ३९ टक्के भारतीय ग्राहक हे पारंपरिक जाहिरातींपेक्षा इन्फ्ल्युअन्सर्सवर जास्त विश्वास ठेवतात. या मंडळींचा सल्ला ग्राहकांना विश्वासू मित्रासारखा वाटतो.

इन्स्टाग्राम, यूट्यूब अशा व्यासपीठांवर डॅशबोर्ड असतात. त्यावर दर्शकांची/ व्ह्यूजची संख्या आपोआप नोंदवली जाते. त्याचा थेट संबंध महसुलाशी जोडला जात असल्याने इन्फ्ल्युअन्सर्सना चांगले उत्पन्न मिळू लागते. मोठे ब्रँड्स आता कल्पकतेने या इन्फ्ल्युअन्सर्सचा वापर करून घेतात. सणासुदीच्या काळात ही मंडळी वेगवेगळी उत्पादने कौशल्याने ग्राहकांपर्यंत पोहोचवतात.

लहान आणि मध्यम उद्योग तसेच प्रादेशिक ब्रँड्स सूक्ष्म इन्फ्ल्युअन्सर्सचे स्लॉट्स खरेदी करतात. २५,००० रुपयांत तयार झालेली रील प्रादेशिक टीव्ही वरील जाहिरातीपेक्षा कितीतरी कमी खर्चात अधिक ग्राहकांपर्यंत पोहोचते.

## रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी

भारताच्या लोकसंख्येपैकी ४० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या २५ वर्षाखालील असून फक्त २८ टक्के मध्यवयीन आहेत. याचा अर्थ दरवर्षी लाखो नवीन पदवीधर




**भारताची पहिली इन्स्टाग्राम 'एआय मॉडेल' : कायरा**

तयार होत आहेत. पारंपरिक पद्धतीच्या नोकऱ्या मिळवण्यासाठी त्यांना बराच संघर्ष करावा लागतो. स्पर्धा परीक्षेसाठी तीन-चार वर्षे जातात. मात्र, चित्रीकरण (शूटिंग व व्हिडिओग्राफी), तसेच संपादन (एडिटिंग), कोडिंग अशा टूल्सवर प्रभुत्व मिळवल्यास, यूट्यूबवरील थंबनेल्स, एआय कॅप्शन्सची निर्मिती आदींच्या माध्यमातून ते तुलनेने लवकर उत्पन्न मिळवू लागतात.

## तंत्रज्ञान आणि एआयची भूमिका

देशी, जनरेटिव्ह एआय टूल्स आता हिंदी, तमिळ, मराठी आणि आठ अन्य भाषांमध्ये संहिता लिहून देतात. काही मिनिटात थंबनेल्स तयार करतात. कायरा (Kyra)सारख्या आभासी मॉडेलची निर्मिती यातून झालीय. 'कायरा' ही भारताची पहिली इन्स्टाग्राम 'एआय मॉडेल' असून तिचे अडीच लाखांहून अधिक फॉलोअर्स आहेत. क्रुटिम या देशी एलएलएम्स (लार्ज लँग्वेज मॉडेल) प्रारूपावर आधारित ॲप्स तयार केली जातात. त्याद्वारे प्रत्येक दिवशी अत्यल्प खर्चात चांगल्या दर्जाचे कॉन्टेन्ट देणे शक्य होते.

## व्यावसायिक आणि संघटित विकास

कॉन्टेन्ट क्रिएटर्सच्या अर्थकारणात वाढ झाल्याने ते आता जीएसटीसाठी अर्ज करत आहेत. इनव्हॉइस देत आहेत. इतर स्टार्टअपप्रमाणे स्वत:ची टीमही तयार करताहेत.

भारतात 'क्रिएटर इकॉनॉमी' हे एक सक्षम व्यावसायिक क्षेत्र म्हणून उदयास आले आहे. या बदलामुळे देशात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. पूर्वी विखुरलेल्या स्वरूपातील हे क्षेत्र आता अधिक संघटित झाले आहे. ब्रँड्ससोबतचे करार, करप्रणाली आणि कायदेशीर चौकटी यामुळे या क्षेत्राला आता 'उद्योग' म्हणून मान्यता मिळत आहे.

केवळ व्हिडिओ बनवणारे क्रिएटर्सच नव्हे, तर त्यांच्या मागे काम करणारी एक मोठी फळी तयार झालीय. यामध्ये खालील व्यावसायिकांचा समावेश होतो-

**(१)** व्हिडिओ एडिटर्स आणि ग्राफिक डिझाइनर्स,



**जाहिरात क्षेत्रातले बदलाचे वारे म्हणजे ई-कॉमर्स व 'सोशल कॉमर्स'ची लाट. जाहिराती पाहून वस्तू खरेदी करणे या प्रकाराला सोडचिठ्ठी देत ग्राहकवर्ग आता आपल्या आवडत्या क्रिएटरच्या शिफारसीवर विश्वास ठेवताना दिसतो.**

**(२)** कॉन्टेन्ट स्ट्रॅटेजिस्ट आणि स्क्रिप्ट रायटर्स,

**(३)** सोशल मीडिया मॅनेजर्स आणि टॅलेंट एजन्सीज,

**(४)** डेटा ॲनालिस्ट्स (माहिती विश्लेषक).

भारतीय क्रिएटर्स जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवत आहेत. यामुळे जाहिरात क्षेत्र, ई-कॉमर्स आणि स्थानिक पर्यटनालाही मोठी चालना मिळाली आहे.

सरकारने या क्षेत्रातील कौशल्य विकासाला दिलेली साथ आणि वाढते डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर यामुळे 'क्रिएटर इकॉनॉमी' हा भारताच्या भविष्यातील आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा पैलू ठरेल, यात शंका नाही.

**सरकारने या क्षेत्रातील कौशल्य विकासाला दिलेली साथ आणि वाढते डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर यामुळे 'क्रिएटर इकॉनॉमी' हा भारताच्या भविष्यातील आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा पैलू ठरेल.**

## अर्थव्यवस्थेवरील पडसाद

'क्रिएटर इकॉनॉमी' ही आता केवळ एका क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. तिचे पडसाद अर्थव्यवस्थेच्या अनेक स्तरांवर उमटताना दिसतात.

### (१) ई-कॉमर्स व 'सोशल कॉमर्स'ची लाट

पूर्वी लोक जाहिराती पाहून वस्तू खरेदी करत, पण आता ते आपल्या आवडत्या क्रिएटरच्या शिफारसीवर विश्वास ठेवतात. यामुळे 'इन्फ्ल्युअन्सर मार्केटिंग'चा मोठा विस्तार झाला असून थेट सोशल मीडियावरून खरेदी करण्याच्या प्रमाणात प्रचंड वाढ झाली आहे.

### (२) पर्यटन आणि स्थानिक आदरातिथ्य

ट्रॅव्हल व्लॉगर्स दुर्गम आणि अपरिचित ठिकाणांचे व्हिडिओ बनवून त्या ठिकाणांना पर्यटन नकाशावर आणतात. यामुळे स्थानिक होम स्टे, हॉटेल्स आणि गाईड्सच्या व्यवसायात चांगलीच वाढ होताना दिसते.

### (३) शिक्षण आणि एडटेक

कठीण अशा वैज्ञानिक संकल्पना किंवा कोडिंगसारखे

विषय सोप्या भाषेत सांगणाऱ्या एज्युकेशनल कॉन्टेंटमुळे शिक्षणाचे लोकशाहीकरण झाले आहे. यामुळे औपचारिक शिक्षण देणाऱ्या संस्थांच्या पलीकडे जाऊन शिकण्याची एक नवीन व्यवस्था उपलब्ध झाली आहे.

### (४) प्रादेशिक भाषांमधील क्रांती

मराठी, तमिळ, बंगाली अशा स्थानिक भाषांमधील क्रिएटर्सना प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने, स्थानिक ब्रँड्सना त्यांच्या ग्राहकांपर्यंत पोहोचणे सोपे झाले आहे.

### (५) तंत्रज्ञान आणि उपकरणे

क्रिएटर्सच्या वाढत्या संख्येमुळे कॅमेरे, मायक्रोफोन्स, लायटिंग गियर, हाय-एंड लॅपटॉप्स आणि व्हिडिओ एडिटिंग सॉफ्टवेअरच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. यामुळे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर कंपन्यांच्या महसुलातही भर पडली आहे.

### (६) फिनटेक

क्रिएटर्स आता मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार करत असल्याने त्यांच्यासाठी विशेष पेमेंट गेटवे, इन्व्हॉइसिंग टूल्स आणि परकीय चलन व्यवस्थापनासाठीची नवीन आर्थिक उत्पादने फिनटेक कंपन्यांनी विकसित करायला सुरुवात केली आहे. क्रिएटर्सना सुलभ कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी क्रिएटर-सेंट्रिक बँकिंग प्रारूपे (मॉडेल्स) उभी राहत आहेत.

### (७) एआय स्टार्ट-अप्स

क्रिएटर्सना त्यांच्या डेटाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी, व्हिडिओ संपादित करण्यासाठी आणि प्रेक्षकांचे विश्लेषण करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअरची गरज भासते. यामुळे भारतातील अनेक स्टार्ट-अप्स क्रिएटर्ससाठी साधने तयार करत आहेत. तसेच, एआय स्टार्ट-अप्स हे स्क्रिप्ट लेखन, आवाज बदलणे आणि मजकुराचे इतर भाषांत भाषांतर करण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान विकसित करत आहेत.

> **सरकार आता आपली धोरणे आणि योजना सर्वसामान्यांपर्यंत, विशेषतः ग्रामीण भागातल्या लोकांपर्यंत पोहोचावीत यासाठी क्रिएटर्सची मदत घेत आहे.**

### (८) रीटेल

रीटेल क्षेत्रात आता थेट ग्राहकांपर्यंत पोहोचता येण्यासाठी क्रिएटर्सचा वापर केला जातो. अनेक क्रिएटर्स स्वतःचे ब्रँड्स (उदा. फॅशन, सौंदर्य प्रसाधने किंवा खाद्यपदार्थ) मार्केटमध्ये आणत आहेत. यामुळे पारंपरिक रीटेल साखळीत मोठी क्रांती घडताना दिसत आहे.

### (९) स्किलिंग इंडस्ट्री

क्रिएटर इकॉनॉमीमुळे कौशल्य विकासाची एक नवी बाजारपेठ तयार झाली आहे. केवळ व्हिडिओ बनवणेच नव्हे, तर डिजिटल मार्केटिंग, एडिटिंग, स्टोरीटेलिंग आणि कम्युनिटी मॅनेजमेंट शिकवणाऱ्या संस्थांना मोठी मागणी आहे. हे क्षेत्र तरुणांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम तर करतेच, शिवाय स्वयंरोजगाराच्या विपुल संधीही मिळवून देते.

### (१०) प्रशासन

सरकार आता आपली धोरणे आणि योजना सर्वसामान्यांपर्यंत, विशेषतः ग्रामीण भागातल्या लोकांपर्यंत पोहोचावीत यासाठी क्रिएटर्सची मदत घेत आहे. सरकारी उपक्रम प्रभावीपणे लोकांपर्यंत नेण्यासाठी आणि लोकसहभाग वाढवण्यासाठी 'इन्फ्ल्युअन्सर मार्केटिंग'चा वापर प्रशासकीय स्तरावरही केला जात आहे. ■

लेख

# आई–बाप म्हणून तुम्ही जिंकलातच...!



बाबर शेख
मुख्य लिपिक
पोलीस महासंचालक कार्यालय
मुंबई



जून २०१८ चा तो महिना. नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटलच्या कॉरीडॉरमध्ये कमालीची शांतता पसरली होती, पण तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या मनात मात्र विचारांचे वादळ घोंगावत होते. एका बाजूला दोन वेगवेगळ्या आयसीयूच्या खोल्या आणि दुसऱ्या बाजूला समोरच्या सोफ्यावर सुन्न होऊन बसलेले डॉक्टर नागेश देशमुख.

या दिवशी हॉस्पिटलमध्ये एकाच वेळी दोन शस्त्रक्रिया सुरू होत्या. डॉ. नागेश यांची अवघ्या ४ वर्षांची गोड मुलगी, निधी, जी लिव्हरच्या गंभीर आजाराशी झुंजत होती, तिच्यावर लिव्हर ट्रान्सप्लांट (यकृत प्रत्यारोपण) शस्त्रक्रिया होत होती. आणि तिला हे यकृत देणारी दुसरी कोणी नसून तिची स्वतःची आई, पूजा वहिनी होत्या. एक आई आपल्या काळजाच्या

तुकड्यासाठी स्वतःच्या प्राणाची बाजी लावून ऑपरेशन थिएटरमध्ये झोपली होती.

समाजात जिथे आजही काही विकृत मानिसकतेचे लोक मुलांना पोटात मारतात किंवा कचऱ्याच्या डब्यात फेकतात, तिथे डॉ. नागेश आणि पूजा वहिनींनी आपल्या ४ वर्षांच्या मुलीला वाचवण्यासाठी आपले सर्वस्व पणाला लावले होते. मी जेव्हा डॉ. नागेश यांना विचारले, ''डॉक्टर, या ट्रान्सप्लांटचा सक्सेस रेट काय आहे?''

तेव्हा डोळ्यांमध्ये अश्रू आणि आवाजात प्रचंड आत्मविश्वास आणून डॉ. नागेश म्हणाले होते ''बाबर, यश मिळण्याची शक्यता ९९% नसेल आणि फक्त १% जरी असेल, तरी मला हे करायचं आहे. देवाच्या कृपेने ती जमली आहे. ४ वर्षांची ती गोड पोर आहे, तिला जगण्याचा हक्क नाही का? आपल्या हातात जेवढं आहे, तेवढं आपण करायचंच!''

अशा पद्धतीने डॉ. नागेश आणि पूजा वहिनी यांनी लिव्हर ट्रांसप्लांटच्या निर्णयाचे एक आदर्श उदाहरण समाजापुढे ठेवले. प्रत्येक आई–वडील आपापल्या मुलांवर जिवापाड प्रेम करत असतात यात तिळमात्र शंका नाही. पण, आई बाप होण्याचे यापेक्षा कुठलेच मोठे उदाहरण असू शकत नाही.

ऑपरेशन झाले. निधीची जीवनाशी झुंज सुरू झाली. ती अतिशय लाघवी आणि हुशार मुलगी होती. अगदी मोठ्या माणसांसारखी बोलायची. बाबांची कॉपी करत यांचा स्टेथोस्कोप घेऊन घरातल्या सगळ्यांना तपासायची. ऑपरेशनच्या दिवशीही ती तिचे काका दीपक यांना म्हणाली होती, ''दीपक अंकल, माझं छोटंसं ऑपरेशन आहे, मी जाऊन येते, मग आपण खेळायला जाऊ...'' हॉस्पिटलमध्ये दीपक, गजू मडके, नरू सर, शिवा सर, शंकर भाऊ, श्याम लाकडे, अवि भाऊ, कपिल, गजू गजरे, सचिन होणराव, पांडू महाजन, माधव बिडवे अशा मित्रांची सतत गर्दी असायची. यावेळी एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, डॉक्टर आणि औषधांपेक्षा या मित्रांची सोबत देशमुख कुटुंबाला बळ देत होती.

दिवसांमागून दिवस जात होते. कधी निधीची तब्येत सुधारायची, तर कधी खालावायची असे

> प्रत्येक आई–वडील आपापल्या मुलांवर जिवापाड प्रेम करत असतात यात तिळमात्र शंका नाही. पण, आई बाप होण्याचे यापेक्षा कुठलेच मोठे उदाहरण असू शकत नाही. ऑपरेशन झाले. निधीची जीवनाशी झुंज सुरू झाली. ती अतिशय लाघवी आणि हुशार मुलगी होती. अगदी मोठ्या माणसांसारखी बोलायची. बाबांची कॉपी करत यांचा स्टेथोस्कोप घेऊन घरातल्या सगळ्यांना तपासायची.

तबल ३७ दिवस निधीने, तिच्या आई–बाबांनी आणि डॉक्टरांनी मृत्यूशी झुंज दिली. त्याग, बलिदान, कर्तव्य आणि संघर्ष हे पुस्तकी शब्द डॉ. नागेश आणि पूजा वहिनी जगत होते. पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. शेवटी दि.१६ जुलै २०१८ या दिवशी ती चिमुकली निधी सर्वांना सोडून देवाघरी निघून गेली. देशमुख कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. संपूर्ण परिसर हळहळला. पण माझ्या मनात कुठेतरी एक आशा होती, आणि त्याच वेळी माझ्याकडून एक वाक्य लिहिले गेले होते: 'देवाकडे काहीतरी वेगळीच स्टोरी लिहिली जातेय...!'

काही वर्षे निघून गेली. दुःखाच्या सावटातून कुटुंब हळूहळू बाहेर पडत होते. २ जानेवारी २०२१ रोजी डॉ. नागेश यांच्या घरी पुत्ररत्नाचा जन्म झाला. घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले, दुःखाची तीव्रता थोडी कमी झाली. पण तरीही प्रत्येकाच्या मनात, निधीची ती पोकळी तशीच होती. सर्वांना वाटत होते की मुलगी व्हायला हवी होती. पण देवाच्या घरचे नियम वेगळे होते. निसर्गाचा न्याय अचूक असतो. त्याची वेळ ठरलेली असते. म्हणतात ना, 'उसके घर देर है, अंधेर नही!''

आणि अखेर तो चमत्कार घडला, ज्याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते. देशमुख यांच्या घरी पुन्हा एकदा पाळणा हलला. पूजा वहिनींनी एका गोंडस कन्येला

जन्म दिला! आणि काय तो अद्भुत योगायोग! या १६ तारखेला (१६ जुलै २०१८) निधी ३७ दिवसांची झुंज देऊन देवाघरी गेली होती, अगदी याच १६ तारखेला (१६ ऑटोबर २०२३) या नवीन छोट्या प्रिन्सेसने देशमुख कुटुंबात जन्म घेतला होता! असे वाटले, की कोणतीतरी मोठी सुट्टी घेऊन, निधीच देशमुखांच्या घरात छोटूस्से बाळ बनून बागडायला आली की काय?

ज्या आईने आपल्या पोटच्या गोळ्यासाठी स्वतःच्या लिव्हरचा तुकडा दिला, आणि त्या वडिलांनी तिच्या जगण्यासाठी स्वतःचे सर्वस्व पणाला लावले, अशा पवित्र आणि खऱ्याखुऱ्या आई वडिलांची प्रार्थना तो विधाता कशी नाकारणार?

देवाने १६ ऑटोबर या दिवशी नवीन परीच्या रूपाने त्यांची तीच गोंडस निधी त्यांना परत आणून दिली होती. चांगल्या माणसांसोबत शेवटी चांगलेच घडते, हा निसर्गाचा नियम पुन्हा एकदा सिद्ध झाला.

आज डॉ. नागेश आणि पूजा वहिनींकडे पाहून संपूर्ण समाज अभिमानाने एकच गोष्ट म्हणतोय: ‘‘आई-बाप म्हणून तुम्ही जिंकलातच...! सलाम तुमच्या या त्यागाला आणि वात्सल्याला!‘‘ ■

# कविता



# वेळही आली होती...



रामदास वाकोडे
पोलीस निरीक्षक
रावेर पोलीस स्टेशन,
जळगाव

'काळ आला होता, पण वेळ आली नव्हती' हा वाक्प्रचार संकटातून थोडक्यात बचावलेल्या सुदैवी जिवांच्या संबंधाने वापरला जातो. पण सर्वचजण इतके नशिबवान नसतात. काहींच्या बाबतीत काळ येतो तेव्हा वेळही येते. अशा वेळी संकटातून त्यांना कुणीही तारू शकत नाही. तेरा वर्षाची बसंती आणि तिची तीन लहान भावंडे यांच्या बाबतीत दैवाचा फेरा असाच उलटा पडला...



दिनांक १५ ऑगस्ट २०२०. आता कुठे कोरोना काळातले निर्बंध थोडेसे शिथिल व्हायला सुरुवात झाली होती, तरी संकटाचे सावट मात्र कायम होते. गर्दीचे नियम पाळूनच सर्वत्र स्वातंत्र्यदिन साजरा होत होता. जोडीला गणपतीचे आगमन तोंडावर आले होते. त्याचीही सगळीकडे जय्यत तयारी सुरू होती. यावर्षी लोकांच्या एकत्र येण्यावर निर्बंध असले तरी उत्साह मात्र तसूभरही कमी झाला नव्हता. गणपतीचा सण जवळ आलेला असल्यामुळे गावोगावी मंडप उभारण्याची कामे सुरू होती.



**प्रताप दिघावकर**
विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र



**प्रवीण मुंडे**
पोलीस अधीक्षक, जळगाव



**कुमार चिंता**
तत्का. पोलीस उपअधीक्षक, जळगाव



**शीतलकुमार नाईक**
सहा. पोलीस निरीक्षक, रावेर पोलीस स्टेशन, जळगाव



**विजू जावरे**
पोलीस अंमलदार, रावेर पोलीस स्टेशन, जळगाव



**तुषार मोरे**
पोलीस अंमलदार, रावेर पोलीस स्टेशन, जळगाव



**मनोज म्हस्के**
पोलीस अंमलदार, रावेर पोलीस स्टेशन, जळगाव

जळगाव जिल्ह्यातील रावेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या बोरखेडा येथे अशाच एका रस्त्यावर काही कारागीर गणपतीचा मंडप उभारण्यात व्यस्त होते. काम करता करता त्यांच्यात गप्पा सुरू होत्या. एका बाजूला टेबलखुर्च्या ठेवून त्या खुर्च्यांवर बसून दोन तीन कार्यकर्ते हिशेब आणि आकडेमोड करण्यात व्यस्त होते. मध्येच कोणीतरी उठून त्यांना चहा आणून देत होता. त्या अर्धा कप चहानेदेखील त्यांना तरतरी येत होती. नेमून दिल्याप्रमाणे त्यांची कामे सुरू होती.

एवढ्यात त्यांच्यातल्या एकाचे लक्ष समोरच्या सार्वजनिक नळाकडे गेले. नळाकडे म्हणण्यापेक्षा तिथे असलेल्या एका तरुणाकडे. इकडे तिकडे बघत, आपल्याला कोणी पाहत नसल्याची खात्री करून घेत तो तरुण सावधपणे आपले हात त्या नळावर धुवत होता. तो हात धुवत असताना हातातून गळणाऱ्या पाण्याचा लालभडक रंग वेगळीच कहाणी सांगू पाहात होता.

''आरंऽऽ हा तर बजरंग दिसतोय. व्हय ना रं? शेजारच्या वाडीतला...''

''व्हय की! हा आनि आत्ता



**एवढ्यात त्यांच्यातल्या एकाचे लक्ष समोरच्या सार्वजनिक नळाकडे गेले. नळाकडे म्हणण्यापेक्षा तिथे असलेल्या एका तरुणाकडे. इकडे तिकडे बघत, आपल्याला कोणी पाहत नसल्याची खात्री करून घेत तो तरुण सावधपणे आपले हात त्या नळावर धुवत होता.**

इकडं कुटं आला? येवड्या सकाळच्या वक्ताला त्ये पन? आनि हाताला काय जालं याच्या? रगत कशापाई वाहतंय? रगतच वाटतंय ना रं?''

''हां रे!'' पहिल्याने दुजोरा दिला.

पण ते बजरंगला काही विचारणार, त्याच्याशी काही बोलणार एवढ्यात बजरंग तिथून तीरासारखा निघाला आणि दिसेनासा झाला. इकडे हे दोघे त्याच्या या वागण्याचे नवल करत बसले.

त्यांना जे दिसले होते ते केवळ हिमनगाचे टोक होते. त्याखाली एक अतिशय क्रूर, भयावह सत्य दडपण्यात आले होते. ते रक्ताळलेले पाणी म्हणजे फक्त लाल रंगाचे पाणी नव्हते. त्यात एकाच घरातल्या चार निष्पाप कोवळ्या मुलांच्या जिवाच्या आकांताने फोडलेल्या किंकाळ्या होत्या, त्यांच्या शेवटच्या श्वासाची आर्त स्पंदने होती, धारदार शस्त्राने घाव घातल्यावर उमटलेल्या वेदनांची ठसठस होती, आणि १२-१३ वर्षाच्या मुलीच्या चारित्र्याचे धिंडवडे काढल्याने झालेली लक्तरेदेखील होती.

***

नातेवाईकांच्या दहाव्याला मध्यप्रदेशातल्या आपल्या गावी जायचे म्हणून देवीसिंगच्या घरी लगबग सुरू होती. तो आणि त्याची बायको फुलारीबाई पाचसहा

दिवसांसाठी गावाबाहेर असणार होते. आपल्या चार लहानग्यांना ते मोठी मुलगी बसंती हिच्या निगराणीत सोडणार होते. बसंती तरी काय जेमतेम तेराचौदा वर्षाची! पण त्यांच्यात जाणती तीच होती. आईवडिलांच्या गैरहजेरीत ती अनेकदा आपल्या भावंडांना सांभाळत असे.

थोडेबहुत सामान पिशवीत भरून आणि दोनतीन दिवसांची खाण्यापिण्याची सोय करून देवीसिंग, फुलारीबाई आणि त्यांचा सगळ्यात मोठा मुलगा भीमा गावाला निघाले तेव्हा आपल्या पुढ्यात काय संकट वाढून ठेवले आहे याची त्यांना पुसटशीही कल्पना नव्हती.

***

''अब्बा, आज शेळी दिसत नाहीये बाहेर बांधलेली,'' नजमाने आपल्या वडिलांना– शमीमला सांगितले तेव्हा त्याला जरा आश्चर्यच वाटले. असे कधी होत नसे. देवीसिंगचे कुटुंब त्यांच्या शेतात सालगडी म्हणून राहत होते त्यालाही आता सहा सात वर्षे होऊन गेली होती. तेव्हापासूनचा त्यांचा हा रोजचा शिरस्ता होता. सकाळी उठल्या उठल्या शेळीला बाहेर बांधण्याच्या त्यांच्या दिनक्रमात कधीही खंड पडत नसे. शिवाय देवीसिंग जरी बायको आणि मोठ्या मुलासह बाहेरगावी गेलेला असला तरी त्याची मोठी मुलगी आणि इतर तीन लहानगी घरी आहेत हे शमीमला माहिती होते. त्यामुळे स्वतःशीच नवल करत तो त्यांच्या खोपटापाशी आला.

''बसंती, कहा पर हो? दरवाजा खोलो. दुपारपर्यंत शेतातलं तण साफ करायचं आहे ना? आणि आज बकरीला पण बाहेर नाही काढलं...'' त्याने त्या पत्र्याच्या दारावर जोरजोरात थाप मारत आत झोपलेल्या बसंतीला आणि तिच्या भावंडांना जागे करण्याचा प्रयत्न केला. पण आतून शून्य प्रतिसाद! काही वेळ थांबून त्याने परत दार वाजवले. तरी तीच तऱ्हा.



**आता मात्र त्याला जरा शंका येऊ लागली. काही काळेबेरे तर झाले नसेल ना? अखेरीस मनाचा हिय्या करून त्याने अजून एकदोघांच्या मदतीने दरवाजा तोडला.**

आता मात्र त्याला जरा शंका येऊ लागली. काही काळेबेरे तर झाले नसेल ना? अखेरीस मनाचा हिय्या करून त्याने अजून एकदोघांच्या मदतीने दरवाजा तोडला. त्यानंतर आतले दृश्य बघून त्याची दातखीळच बसली!

आतमध्ये चारही भावंडे रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. बहुतेक कोणीही जिवंत नसावेत, हे त्यांची निपचित पडलेली शरीरे सांगत होती. अजून वाईट म्हणजे दोन लहानग्यांचे हातपाय तोडण्यात आले होते.

शमीमचे डोळे विस्फारले. धक्का बसून तो दोन पावले मागे सरकला. प्रयत्नपूर्वक त्याने कसेबसे स्वतःला भानावर आणले. त्याच्याबरोबरच्या दोघांची पण जवळपास तशीच अवस्था झाली होती. कसेतरी करून स्वतःवर ताबा मिळवल्यानंतर त्यांनी लगोलग नजीकच्या पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती दिली.

रावेर पोलीस स्टेशन मध्ये त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस निरीक्षक रामदास वाकोडे यांनी सदर प्रकरणाची खबर मिळताच त्वरित हालचाली सुरू केल्या. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासी अधिकाऱ्यांनी तातडीने तपासाची सूत्रे हाती घेतली आणि पोलीस पथक तयार करून सर्वप्रथम घटनास्थळाला भेट दिली. कुणाही संवेदनशील माणसाच्या डोळ्यात अश्रू उभे करेल अशाच प्रकारचे समोरचे दृश्य होते. अक्षरशः दहा वर्षाच्या आत वय असलेली तीन कोवळी बालके गळा चिरलेल्या अवस्थेत मृत होऊन जमिनीवर पडलेली होती. बाजूलाच त्यांची मोठी बहीण बसंती हिचाही मृतदेह



**महेश मोगरे**
पोलीस अंमलदार,
रावेर पोलीस स्टेशन,
जळगाव



**सुरेश मेढे**
पोलीस अंमलदार,
रावेर पोलीस स्टेशन,
जळगाव



**महेंद्र सुरवाडे**
पोलीस अंमलदार,
रावेर पोलीस स्टेशन,
जळगाव

पडलेला होता. तिच्या मृतदेहाची एकंदरीत अवस्था बघता तिने मरण्याआधी बरेच काही सहन केले असावे असे दिसत होते. झटापटीच्या सर्वत्र खुणा होत्या.

पोलिसांनी फॉरेन्सिक पथकासह सर्व मृतदेहांचा कायदेशीर इनक्वेस्ट पंचनामा करून घटनास्थळाचा शास्त्रोक्त पद्धतीने सूक्ष्म घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळावरून रक्तमिश्रित माती, पीडितांचे कपडे, तसेच गुन्ह्यात वापरलेली रक्ताने माखलेली आणि लाकडी दांडा असलेली लोखंडी कुऱ्हाड जप्त केली. घटनास्थळ आणि जप्त केलेल्या पुराव्यांचे कायदेशीर पावित्र्य आणि अचूक साखळी राखण्यासाठी पोलीस पथकाने तज्ज्ञांकडून सविस्तर फोटोग्राफी करून घेतली.

''भयानक आहे हे! बघा लोकांशी बोलून काही लीड मिळतोय का... आणि कुठे सीसीटीव्ही वगैरे असतील तर त्याचा फूटेज मिळतोय का तेही चेक करा,'' साहेबांनी आपल्या सहकाऱ्यांना सूचना दिल्या.

''आणि हो बॉडी पोस्टमॉर्टेमसाठी पाठवून द्या. लवकरात लवकर रिपोर्ट हवाय आपल्याला.''



**सुदैवाने घटनास्थळाच्या परिसरात एका ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फूटेज पोलिसांना प्राप्त झाले. त्यांनी त्या फूटेजचे विश्लेषण करायला सुरुवात केली.**

''होय साहेब,'' असे म्हणत सहकारी अंमलदार तिथून निघून गेले.

सुदैवाने घटनास्थळाच्या परिसरात एका ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फूटेज पोलिसांना प्राप्त झाले. त्यांनी त्या फूटेजचे विश्लेषण करायला सुरुवात केली. दरम्यानच्या काळात इतर काही पोलिसांनी आजूबाजूच्या नागरिकांकडे कसून चौकशी केली असता, त्यातल्या एकदोघांनी त्यांना एका संशयिताचे नाव सांगितले. त्यांनी त्याला त्या परिसरात वावरताना बघितले होते.

''साहेब, हा बघा... हा मनुष्य यांच्या घराजवळ दिसत आहे आणि या मुलांबरोबरही तो दिसतोय.''

पोलीस अंमलदार दाखवत होते त्या फूटेजकडे साहेब निरखून बघत होते.

''एक काम करा. फूटेज वरून या माणसाचा फोटो घ्या आणि आपल्याला ज्यांनी संशयित म्हणून एक नाव सांगितलं आहे त्या लोकांना हा फोटो दाखवा. बघा ते काय म्हणतात ते.''

पोलिसांनी त्याप्रमाणे केले असता त्या लोकांनी संशयित इसम हा फूटेजमधला इसम असल्याचेच ठामपणे सांगितले. त्याचबरोबर घटनास्थळाच्या परिसरातील मोबाईल टॉवरचा डम्पडेटा घेऊन त्या वेळी त्या परिसरात ॲक्टिव्ह असलेल्या सर्व नंबर्सचा तपशील पोलिसांना मिळाला.

''साहेब, अजून एक. याच्यातली जी मोठी मुलगी आहे तिच्याबरोबर, हा बघा, हा तोच माणूस दिसतोय.''

''तोच दिसतोय खरं. हाच आपला मुख्य आरोपी आहे. याला लवकरात लवकर ताब्यात घ्यायला पाहिजे, तो कुठे फरार व्हायच्या

आत.''

त्यादरम्यान अजून एका तपासी अंमलदारांनी तेथे येत साहेबांना सॅल्यूट ठोकला.

''बोला. काय खबर?''

''साहेब, हा जो आपला संशयित आहे त्याचं नाव बजरंग. आणि घटना घडल्यानंतर त्याला इथल्या एका नळावर हात धुताना काही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी पण बघितलं आहे.''

तपासी अधिकाऱ्यांनी नळाची तोटी आणि पाण्याचे अंश याचा कायदेशीर पंचनामा देखील केला. दरम्यान पीडितांचा शवविच्छेदन अहवालही प्राप्त झाला. त्यानुसार बसंतीवर शारीरिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले. वैज्ञानिक व न्यायवैज्ञानिक पुरावा गोळा करताना साहेबांनी पीडितेच्या शरीरावरील डीएनएचे नमुने जप्त केले.

पोलिसांनी नंतर आपला मोर्चा त्या मंडपवाल्या कारागिरांकडे वळवला.

''साहेब, हा बजरंग शेजारच्या वाडीत राहतो. आम्ही त्याला त्या दिवशी सकाळी नळावर हात धुताना बघितलं होतं आणि बहुतेक तो रक्ताळलेले हात साफ करत होता. आम्ही त्याच्याकडे हात केला तर आम्हाला ओळखही न दाखवता तिथून तरातरा निघून गेला. तेव्हाच आम्हाला जरा विचित्र वाटलं. पण कोणाला माहीत की त्यानी एवढं मोठं कांड करून ठेवलंय...''

''तो कुठे राहतो? पत्ता बोल त्याचा. आणि त्याचा काही कॉन्टॅक्ट नंबर असला तर तोही दे.''

त्या माणसाने तो कुठे राहतो त्याबद्दल पोलिसांना सांगितले. पोलिसांना त्याचा नंबरही मिळाला.

आता पोलिसांकडे मेहनतपूर्वक जमा केलेला बराच तपशील होता. अर्थात त्यात अजून काही गोष्टींची भर घातल्यावरच केस भक्कम उभी राहणार होती.



**तपासी अधिकाऱ्यांनी नळाची तोटी आणि पाण्याचे अंश याचा कायदेशीर पंचनामा देखील केला. दरम्यान पीडितांचा शवविच्छेदन अहवालही प्राप्त झाला. त्यानुसार बसंतीवर शारीरिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झाले.**

मिळालेल्या सर्व तपशिलाच्या आधारे संशयित आरोपी बजरंग हा प्रमुख आरोपी बनला. पोलिसांनी आता त्याच्या अटकेसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू केले. श्वानपथकातील श्वानाने काढलेला माग, त्याचप्रमाणे इतर तांत्रिक पुरावे यांच्या आधारे पोलिसांनी बजरंग याला गुन्हा घडल्यापासूनच्या सहा दिवसांच्या आत ताब्यात घेतले.

आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर डीएनए तपासणीसाठी त्याच्या रक्ताचे नमुने घेऊन सर्व नमुने फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी, नाशिक येथे पाठवण्यात आले. रासायनिक विश्लेषकांच्या सीए अहवालानुसार आरोपीचा डीएनए आणि वीर्याचे नमुने पीडितेच्या शरीरावरील नमुन्यांशी पूर्णपणे जुळत असल्याचे निष्पन्न झाले. त्याचप्रमाणे घटनास्थळावरील माती आणि जप्त कपड्यांवरील मानवी रक्त हेही पीडितांच्या रक्त नमुन्यांशी जुळत असल्याचे स्पष्ट झाले. या आधारे आरोपीचा गुन्ह्यातील थेट व पाशवी सहभाग वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झाला.

''बोल आता. सगळं नीट सांग. का बरं केलंस तू असं? आणि कसं केलंस?''

भेटल्यापासून पहिल्यांदाच बजरंगच्या डोळ्यात साहेबांना भीती दिसली. जणू काही त्याचा अंत जवळ आला आहे, अशा प्रकारची भीती. तो थरथर कापत होता. गुन्हा करून पळून जाण्याचा त्याचा बेत होता, आणि त्यात आपण यशस्वी ठरू अशी त्याची खात्री होती. प्रत्यक्षात मात्र उलटेच घडले होते आणि तो पोलिसांच्या ताब्यात सापडला होता. त्याने बोलायला सुरुवात केली.

''साब या पोरांचा मोठा भाऊ

आहे– सूरज. तो दोस्त आहे माझा. त्यामुळे यांची फॅमिली मला ओळखायची. मला माहीत होतं सूरज त्याच्या आई–वडिलांना घेऊन मध्यप्रदेशमधल्या त्यांच्या गावी जाणार आहे आणि तीन चार दिवस येणार नाहीये. बसंती मला आवडायची. पण सूरजच्या समोर तिच्याशी बोलायची हिंमत नव्हती माझी. पण ती घरी असणार आहे हे कळलं आणि मग मी ठरवलं आता मोका आहे तर चौका मारायचा! म्हणून रातीला मी त्यांच्या घरी गेलो. बसंती मला ओळखते. त्यामुळे तिने दार उघडलं. मी सांगितलं, 'माझं पाकीट बहुतेक सूरजकडे राहिलं आहे ते घ्यायला आलोय.' म्हणून तिने मला घरात घेतलं. मी पाणी मागितलं. तेही तिने दिलं. मग थोडा वेळ असंच इकडे तिकडे बोलत बसलो. त्याच्यानंतर बसंती मी निघून जावं असं सुचवायला लागली. मी वरवर तिला धीर दिला, थोड्या वेळात निघतो म्हणालो, पण माझ्या डोक्यात वेगळाच प्लॅन होता. मी तिच्या जवळ गेलो. तिला हात लावला. तर तिने माझा हात झटकला. आरडाओरडा करायला सुरुवात केली. मग आपलं पण डोकं सटकलं. मला जे करायचं होतं ते करून मोकळा झालो. पण त्यांची लहान भावंडं ते पाहत होती. बसंती आणि ती पोरं सगळेच आरडाओरडा करायला लागले. बाहेर कोणाला ऐकू गेलं असतं तर माझं काम तिथेच तमाम केलं असतं लोकांनी! म्हणून ठरवलं, यांचा आवाजच बंद करायचा...''

''आणि म्हणून तू कुऱ्हाडीने सगळ्यांच्या गळ्यावर वार करून त्यांना संपवलंस. वा रे वा बहाद्दर!



**बसंती मला आवडायची. पण सूरजच्या समोर तिच्याशी बोलायची हिंमत नव्हती माझी. पण ती घरी असणार आहे हे कळलं आणि मग मी ठरवलं आता मोका आहे तर चौका मारायचा! म्हणून रातीला मी त्यांच्या घरी गेलो.**

तू आता बाहेर येत नाहीस हे नक्की... चांगलं जगायचे सगळे मार्ग तू तुझ्या हाताने बंद करून टाकलेस,'' असे म्हणत काहीशा विषण्ण मन:स्थितीत साहेब तिथून बाहेर पडले.

आरोपीने गुन्ह्यावरील कबुली दिली. त्याआधारे भापुका कलम २७ मधील तरतुदीनुसार मेमोरंडम पंचनामा करण्यात आला व त्याद्वारे गुन्ह्याशी संबंधित महत्त्वपूर्ण पुराव्यांची साखळी जोडण्यात आली. पोलिसांनी अत्यंत चिकाटीने आणि व्यावसायिक चातुर्याने गोळा केलेल्या सर्व ढोबळ तांत्रिक, वैज्ञानिक आणि जबाबांचे तोंडी पुरावे तसेच परिस्थितीजन्य पुरावे यांच्या अभेद्य साखळीच्या आधारे मा. न्यायालयात भादंवि कलम ३०२, ३७६ (अ), ४५२, २०१, आणि पोक्सो कायदा कलम ६, ८, १०, १२ अन्वये विहित मुदतीत त्रुटीरहित दोषारोपपत्र दाखल केले.

विशेष सत्र न्यायालय, भुसावळ यांनी सर्व पुराव्यांची साखळी वैध व निर्विवाद मानून या खटल्याला दुर्मिळातील दुर्मिळ खटला घोषित करून आरोपीला भादंवि कलम ३०२, ३७६ (३) व कलम ६ पोक्सो अन्वये फाशीची शिक्षा सुनावली आहे.

नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक प्रताप दिघावकर, जळगावचे पोलीस अधीक्षक प्रवीण मुंडे तसेच तत्कालीन पोलीस उपअधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामदास वाकोडे, सहायक पोलीस निरीक्षक शीतलकुमार नाईक, तसेच पोलीस अंमलदार विजू जावरे, तुषार मोरे, मनोज म्हस्के, महेश मोगरे, सूरजश मेढे आणि महेंद्र सुरवाडे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

कथा

# लाडका मोत्या



मीना म्हसे
हवेली, पुणे



परीचे आई आणि बाबा बाहेर कामाला जायचे. दिवसभर परी आजोबांकडे एकटीच राहत असे.

परीला कुत्र्याचा फार लळा होता. त्यामुळे आजोबांनी तिच्या हट्टापायी एक लहान कुत्र्याचं पिल्लू घरात आणलं. परीनं त्याचं नाव मोत्या ठेवलं. परीचं मोत्यावर अतिशय प्रेम होतं आणि मोत्याचंही तिच्यावर. मोत्या परीच्या घरातल्या प्रत्येक व्यक्तीचं कोणतं ना कोणतं काम करत असे. बाबा, आई, आजोबा सगळेच मोत्यावर खूप प्रेम करायचे.

आजोबा देखील मोत्या जेवल्याशिवाय जेवायचे नाहीत. परी सोबत मोत्या दररोज

खेळायचा.

बाबा कामावर जाताना नुसतं मोत्या म्हटले, तरी मोत्या कुठेही असला तरी पळत बाबांच्या पायाजवळ यायचा. मोत्याला फिरण्याचा भारी नाद होता. आजोबा रोज मोत्याला फिरायला घेऊन जायचे. त्यामुळे त्याला घराजवळचा सगळा परीसर माहीत झाला होता. कुठेही गेला तरी तो चुकत नसे.

एके दिवशी आई, बाबा, परी बाहेर फिरायला गेले. आजोबांच्या जोडीला मात्र मोत्या होता. आजोबांनी मोत्याला जेवण वाढलं आणि स्वतःही जेवण केलं. जेवण करून मोत्या मात्र आपल्या नेहमीच्या जागेवर बाहेर येऊन बसला.

आजोबांनी गेट लावलं आणि दरवाजे बंद करून ते झोपायला गेले. रात्रीचे दोन वाजले होते अचानक कसला तरी आवाज आला. दरवाज्याजवळ बसलेला मोत्या अचानक उठून उभा राहिला. मोत्यानं समोर अनोळखी लोकांना पाहिलं. ते गेटच कुलूप तोडत होते.

मोत्या तसा जोरजोराने भुंकायला लागला. काहीही केलं तरी ते चोरच. ते मोत्याच्या भुंकण्याला काही दाद देईना. मोत्याच्या भुंकण्याचा आवाज आजोबांपर्यंत गेला आणि आजोबा जागे झाले. काहीतरी घडतंय  हे आजोबांच्या लक्षात आलं. आणि सावधगिरीने ते इकडे –तिकडे पाहू लागले.

चोर कुलूप तोडण्यात यशस्वी झाले आणि आत प्रवेश  करणारा तोच मोत्यानं त्यांच्या अंगावर झेप घेतली.  एका चोराला मोत्यानं कडकडून चावा घेतला. आजोबांनी तो सर्व प्रकार पाहिला.

मोत्याचा हा अवतार पाहून बाकीचे चोर मात्र घाबरले. त्यांच्या एका साथीदाराला मोत्यानं  रक्तबंबाळ केलं होतं. बाकीच्यांनी तिथून लगेच धूम ठोकली. आजूबाजूचे सगळे शेजारी मोत्याचा आवाज ऐकून बाहेर आले. आजोबाही तेवढ्यात दार उघडून पटकन बाहेर आले

चोर मात्र पळून जाण्यात यशस्वी झाले. आजोबांनी मोत्याला जवळ घेतलं. आजोबा शेजाऱ्यांना  म्हणाले,

''आज मोत्यामुळे आमच्या घरावरचं मोठं संकट टळलं.'' त्यांनी मोत्याचे मनोमन आभार मानले. तेवढ्यात फिरायला गेलेले परी, बाबा आणि आई घरी परतले. घडलेल्या सगळा प्रकार आजोबांनी परीच्या बाबांना सांगितला.

बाबांनी मोत्याच्या डोक्यावरून मायेने हात  फिरवला. त्यांना मोत्याचा हेवा वाटला. परी मात्र मोत्याकडे बघतच राहिली. ■

# कविता

## पंढरपूर वारी आणि पोलिसांचे योगदान

विठ्ठल नामाच्या गजरात दुमदुमते पंढरी सारी,
सेवेसाठी सज्ज उभे असतात महाराष्ट्र पोलीस अधिकारी

उन्हा–पावसाची त्यांना कधीच नसते तमा,
कर्तव्यपूर्तीतच त्यांना मिळते खरी महिमा.

वारकऱ्यांच्या सुरक्षिततेचा घेतात ते ध्यास,
दिवस–रात्र अखंड सुरू असतो सेवेचा प्रवास.

वाहतूक, बंदोबस्त सांभाळतात हसतमुखाने,
अडचणीत धावून येतात माणुसकीच्या भावनेने.

हरवलेल्यांना मिळवून देतात त्यांच्या परिवाराशी,
सेवेचा संदेश देतात प्रत्येक वारकऱ्याशी.

शिस्त, संयम आणि सेवाभाव असतो त्यांच्या ठायी, म्हणूनच वारी निर्विघ्न पार पडते सुखरूप पायी.

विठुरायाच्या सेवेत त्यांचाही असतो मान,
त्याग आणि कर्तव्याला असतो जनतेचा सन्मान.

अशा कर्तव्यदक्ष पोलिसांना करूया वंदन,
त्यांच्या सेवेमुळेच सुरक्षित होते पंढरीचे दर्शन



**अमोल फटांगरे**
पोलीस अंमलदार,
अहिल्यानगर

कथा



रामकृष्ण अघोर
सोलापूर

# संधीचे सोने



वेळ सकाळची होती. सर्वसाधारणपणे साडेनऊ दहाची असावी. संपूर्ण राधाकृष्ण कॉलनीत व्यवहाराला सुरुवात झाली होती. तरुण-तरुणी स्वतःला नोकरीसाठी कार्यालयात पोहोचवण्यासाठी जेवणाचा डबा, पाण्याची बाटली घेऊन वरच्या मजल्यावरून खाली दुचाकी वाहन तळावरून आपली आपली दुचाकी काढून घेऊन कार्यालयात कामकाजासाठी निघाले होते. मध्येच एखादा भाजीवाला आपल्या भाजीचा गाडा घेऊन 'भाजी घ्या भाजीऽऽऽ' अशा आरोळ्या ठोकत होता. अनेक महिलांनी खरेदी करण्यासाठी भाजीच्या गाड्याभोवती एकच गर्दी केली होती. काही मुले तेथेच मोकळ्या जागेत क्रिकेट खेळण्यात गुंतली होती. इंग्रजी माध्यमाच्या बसेस शाळेत घेऊन जाण्यासाठी येऊन थांबल्या होत्या. मुलांना बोलावण्यासाठी हॉर्नचा आवाजदेखील देत होत्या.

एवढ्यात पोलिसांची मोटार राधाकृष्ण कॉलनीत घुसली. पोलिसांची मोटार बघताच काहीजण घाबरले, तर काहींना

आश्चर्याचा धक्काच बसला. ज्येष्ठ नागरिकदेखील आपल्या जागेवर उभे राहून साशंक नजरेने पोलिसांच्या मोटारीकडे पाहात होते. याचे कारण असे, की यापूर्वी त्या कॉलनीत पोलिसांची मोटार आली नव्हती. ही प्रथमच वेळ होती. काय घडले आहे याची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. त्या गाडीतून पोलिसांच्या पोशाख केलेली एक महिला इन्स्पेक्टर खाली उतरली. तिच्याबरोबर एक हवालदार पिशवी घेऊन मोटारीतून उतरला. ती महिला इन्स्पेक्टर जे निघाली ते थेट तिसऱ्या मजल्यावरच्या सेवानिवृत्त प्राध्यापक देशपांडे यांच्या घरीच गेली.

श्री. देशपांडे हे काही महिन्यांपूर्वी एका मराठी हायस्कूलच्या मुख्याध्यापक पदावरून निवृत्त झाले होते. मॉर्निंग वॉक करून येऊन अंघोळ, नाष्टा करून पेपर वाचत बसले होते. महिला इन्स्पेक्टर घरी येताच त्यांनी नमस्कार केला आणि आपण कोण व कशासाठी आला आहात? असे धाडसाने विचारले. देशपांडे हे शुद्ध चारित्र्याचे होते. आयुष्यात त्यांनी प्रामाणिकपणे शाळेची सेवा केली होती. 'कर नाही तर डर कशाला' या उक्तीप्रमाणे ते थोडेदेखील कचरले नाहीत. एवढ्यात त्या महिला इन्स्पेक्टरने हवालदाराच्या हातातून पिशवी घेतली. त्यातून एक शाल काढून सरांच्या खांद्यांवरून पांघरली आणि पेढ्याचा पुडा देऊन त्यांच्या पायावर डोके ठेवून नमस्कार केला. तेव्हा देशपांडे सर म्हणाले, ''बाळ तू कोण आहेस? मी तुम्हाला ओळखलं नाही.'' तेव्हा ती म्हणाली ''सर, मी तुमची विद्यार्थिनी आहे. तुम्ही मला ओळखत नाही हे बरोबर आहे. याला बरीच वर्षं झाली.'' असे सांगून मागची आठवण काढण्यास सुरुवात केली.

देशपांडे सरांप्रमाणेच त्यांच्या पत्नी यादेखील एका हायस्कूलमध्ये शिक्षिका होत्या. त्यामुळे त्यांनी स्वयंपाकाला एक स्वयंपाकीण कामास ठेवली होती. रोज सरांच्या घरी येताना ती स्वयंपाकीण म्हणजेच पार्वतीबाई आपली मुलगी

**आपली पत्नी व पार्वतीबाई यांचे संभाषण देशपांडे सरांच्या कानावर पडले आणि त्यांनी पार्वती बाईंच्या नवऱ्याला बोलावून घेतले. त्यांची चांगलीच कानउघडणी केली आणि त्यांच्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून काढण्याची आज्ञा केली.**

माधवी हिला बरोबर घेऊन येत असे. एकदा मॅडमनी पार्वतीबाईला विचारले, ''तू असे रोज येते मुलीला का घेऊन येतेस? शाळेत का पाठवत नाहीस?''

त्यावर पार्वतीबाई म्हणाल्या ''हिच्या भावाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातला आहे. त्याचं पूर्ण शिक्षण इंग्रजी माध्यमातूनच करायचं असल्याने तिच्या शिक्षणासाठी पैसे शिल्लक नाहीत. माझा नवरा म्हणतो, मुलगी परक्याचं धन आहे. तिला शिकवून आपल्याला काही उपयोग नाही.''

आपली पत्नी व पार्वतीबाई यांचे संभाषण देशपांडे सरांच्या कानावर पडले आणि त्यांनी पार्वती बाईंच्या नवऱ्याला बोलावून घेतले. त्यांची चांगलीच कानउघडणी केली आणि त्यांच्या मुलाला इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून काढण्याची आज्ञा केली. मुलगी माधवी आणि मुलगा संतोष दोघांनाही आपल्या मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश दिला. मुलीला मोफत शिक्षण दिले. इयत्ता दहावी पर्यंत त्यांनी लक्ष दिले. पुढे दोघांनीही महाविद्यालयीन आणि उच्च महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. मुलीने पुढे पोलीस भरतीचे प्रशिक्षण घेतले आणि पोलीस खात्यात भरती झाली. पुढे परीक्षा देत देत नुकतेच तिला पोलीस इन्स्पेक्टर म्हणून आज्ञापत्र मिळाले. यामागचे सर्व श्रेय तिने देशपांडे सरांना दिले. म्हणून तिने देशपांडे सरांचा सत्कार करून पेढ्यांचा बॉक्स दिला. देशपांडे सरांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या मुलाला अफाट खर्चापासून वाचवले व तो खर्च समसमान करून दोघांनाही मोठ्या हुद्द्यावर पोहोचवले.

संतोष जिल्हाधिकारी झाला. माधवीदेखील इन्स्पेक्टर झाली. देशपांडे सरांनी केलेल्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले. त्यांनी दिलेल्या संधीचे सोने केले. शेवटी माधवीच म्हणाली, ''तुम्ही दिलेल्या संधीचे सोने केले.'' देशपांडे सरांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ■



रविकिरण नरवडे
पोलीस निरीक्षक,
चिखलठाणा पोलीस ठाणे,
छ. संभाजीनगर (ग्रा.)

# छत्रपती संभाजीनगर (ग्रा.) पोलिसांची तांत्रिक झेप : 'ई साक्ष'ची न्यायालयाने प्रथमच घेतली दखल

एका महिलेवरील अमानुष अत्याचारांच्या केसच्या संदर्भात छत्रपती संभाजीनगर (ग्रा.) पोलिसांनी पीडितेचा जबाब नोंदवून घेताना प्रथमच 'ई साक्ष' प्रणालीचा वापर केला. याची न्यायालयानेही दखल घेत पीडितेला न्याय मिळवून दिला. काय होते ते प्रकरण?



शून्यात नजर लावून सविता खिडकीपाशी बसली होती. तिचे चित्त थाऱ्यावर नाही हे तिच्याकडे बघून लगेच लक्षात येत होते. तिचा धाकटा मुलगा चंदू तिच्याजवळ येऊन काहीतरी बोलत होता. पण त्याकडेही तिचे लक्ष नव्हते. तिने एकदा त्याच्याकडे बघून फक्त त्याच्या केसांवरून हात फिरवला आणि परत मान वळवून घेतली. कुठल्यातरी गहन विचारात ती गढून गेली होती. जसजसा जास्त विचार करावा तसतसे तिच्या डोळ्यांत संतापाने जणू ठिणग्या उडत होत्या



**सतीश पंडित**
पोलीस उपनिरीक्षक,
चिखलठाणा पोलीस
ठाणे,
छ. संभाजीनगर (ग्रा.)



**सचिन रत्नपारखे**
पोलीस अंमलदार ,
चिखलठाणा पोलीस
ठाणे,
छ. संभाजीनगर (ग्रा.)



**सुनील ढेरे**
पोलीस अंमलदार ,
चिखलठाणा पोलीस
ठाणे,
छ. संभाजीनगर (ग्रा.)

आणि हाताच्या मुठी आवळल्या जात होत्या. नात्याने चुलत दीर असणाऱ्या रमेशला कशी अद्दल घडवावी, याचा ती विचार करत होती.

तासाभरापूर्वी झालेले भांडण आठवून तिचे डोके ठणकायला लागले होते. रमेश हा तिच्या नवऱ्याचा सख्खा चुलतभाऊ, तिच्यापेक्षा जवळपास १५-१६ वर्षांनी लहान, पण चारित्र्याने जरा सैलच! त्याची ती वखवखलेली नजर पाहून सविताचा संताप होत असे. पण नात्यातलाच पडत असल्याने त्याला फार बोलता येत नसे. ती गावातल्या, गल्लीतल्या इतर पुरुष माणसांशी मैत्री असल्यासारख्या गप्पा मारायची. त्याला तिच्या घरून कोणाची हरकतही नव्हती. पण हा रमेश मात्र तिला नजरेसमोरही नको असे.

''वहिनी, सगळ्या गावभर तू लोकांशी बोलतेस. माझ्या वयाच्या पोरांशी फ्रेंडशिप करतेस. फक्त माझ्याशी नाही...'' हा त्याचा कायमचा हट्ट असे. पण त्या हट्टालाही वासनेची किनार होती आणि झुरळ झटकावे तसे तिला त्याच्याशी मैत्री करण्याचा तर सोडाच साधे बोलण्याचाही विचार



**तासाभरापूर्वी झालेले भांडण आठवून तिचे डोके ठणकायला लागले होते. रमेश हा तिच्या नवऱ्याचा सख्खा चुलतभाऊ, तिच्यापेक्षा जवळपास १५-१६ वर्षांनी लहान, पण चारित्र्याने जरा सैलच!**

झटकून टाकावासा वाटत असे.

रमेशचा एवढा रागराग करण्याचे अजून एक कारण होते. ते म्हणजे त्याची केवळ महिलांच्या बाबतीतच नव्हे तर लहान मुलांच्या बाबतीतली ही नजर अशीच दूषित होती. किंबहुना आत्ताच्या त्यांच्यातल्या भांडणाचे तेच कारण होते. लहानग्या चंदूच्या बाबतीत त्याने गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला होता. पण चंदूने थेट आपल्या आईकडे येऊन काकाने केलेला गैरप्रकार तिच्या कानावर घातला. ते ऐकून सविताच्या मस्तकाची शीर ताडताड उडायला लागली. ती तडक घरातून बाहेर पडली आणि रमेशच्या घरी आली. रमेश बाहेरच्या ओट्यावरच आपल्या चार रिकामटेकड्या मित्रांबरोबर गप्पा मारत बसला होता. वहिनी आपणहून आपल्याकडे आल्याचा त्याला चांगलाच आनंद झाला. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले.

पण प्रत्यक्षात वहिनीचा पवित्रा काही वेगळाच होता. तिने आल्या आल्या तोंडाचा पट्टा सोडला आणि त्याला वाटेल तशा शिव्या देऊ लागली. त्याचे मित्र अवाक होऊन त्याच्याकडे बघायला लागले. चंदूच्या बाबतीत जो भलता प्रकार करण्याचा त्याचा बेत होता, ज्या प्रकारे त्याने त्याचे आक्षेपार्ह फोटो काढले होते, त्याचा उल्लेख करून तिने त्याच्यावर चांगलेच तोंडसुख घेतले. रमेशला मेल्याहून मेल्यासारखे झाले. आपल्या मित्रांच्या समोर वहिनीने आपला पापांचा पाढा वाचावा आणि इज्जत धुळीला मिळवावी हे त्याला सहन होईना. तोही काहीतरी बोलला. शब्दाने शब्द वाढत गेला. शेवटी पार त्याच्या आईबहिणीचा उद्धार

करून तशीच तणतण करत सविता घरी आली. चांगला लोटाभर पाणी पिऊन बाहेरच्या खोलीतल्या खिडकीपाशी बाहेरचा देखावा बघत बसली. पण बाहेर बघूनदेखील तिच्या जिवाला बरे वाटेना. डोक्यात फक्त एकच विचार, रमेशचे काय करायचे? काय केले म्हणजे तो आपला पिच्छा सोडेल?

त्यानंतर एक दोन आठवडे सरले. या काळात रमेश जास्तच चेकाळल्यासारखा करू लागला. तिला वेळीअवेळी फोन करणे, अश्लील भाषेत बोलणे, बळेच लगट साधण्याचा प्रयत्न करणे असले प्रकार सुरू होते. सविता त्याला भीक घालत नव्हती, पण येणारा प्रत्येक कॉल तिची अस्वस्थता कणाकणाने वाढवत होता.

अशातच 'तो' दिवस उजाडला. सकाळी ती नेहमीप्रमाणे शेतावर गेली. शेतीची नेहमीची कामे करून साधारण दुपारी दोन अडीच वाजता ती एका झाडाच्या आडोशाला जेवायला बसली, तेव्हा परत एकदा रमेशचा फोन आला.

''काय आहे? तुझं डोस्कंबिस्कं फिरलं हाय की काय? एकदा सांगून समजत नाही होय तुला? मला परत फोन करू नकोस, नायतर फार वाईट परिणाम होतील.'' ती एका दमात बोलली.

''तू काय करनार मला? चल करूनच दाखव! बघूच कोणामध्ये किती दम आहे ते.''

''जास्त शानपना करू नकोस. बघून घेईन मी पन.''

''भेट तर खरी... मीच बघून घेतो तुला...'' असे म्हणून त्याने फोन ठेवून दिला.

नंतर कामाच्या धबडग्यात सविता काही काळ त्या फोनबद्दल विसरून गेली. संध्याकाळी सगळी कामे आटोपल्यावर ती घरी जायला



**हातातल्या कटरने तो तिच्या शरीरावर दिसेल तिथे वार करत होता. ती जोरजोरात ओरडत होती. तिला जायबंदी केल्यावर रमेशने थेट तिच्यावर हात टाकण्याचा प्रयत्न केला, पण तशाही स्थितीत ती त्याच्याशी झटापट करत राहिली.**

निघाली. शेतातल्या वाटेवरून जात असताना तिला रस्त्यात रमेशची मोटरसायकल दिसली. काळजात चर्र झाले, भीतीने घाम फुटला. पण कसाबसा स्वत:वर ताबा ठेवत त्या मोटरसायकलकडे दुर्लक्ष करून ती तशीच पुढे निघाली.

पुढच्याच क्षणाला मानेवर बसलेल्या घावाने ती कळवळली. रमेशने तिच्यावर मागून येऊन हल्ला चढवला होता. हातातल्या कटरने तो तिच्या शरीरावर दिसेल तिथे वार करत होता. ती जोरजोरात ओरडत होती. तिला जायबंदी केल्यावर रमेशने थेट तिच्यावर हात टाकण्याचा प्रयत्न केला, पण तशाही स्थितीत ती त्याच्याशी झटापट करत राहिली. मात्र काही वेळात तिची शुद्ध हरपली. ती मेली असे समजून रमेश तिथून पसार झाला.

***

''किसन्याऽऽ, आरं ही बघ.. ही सविताच न्हवं?'' सुदाम्याने घाबरून आपल्या दोस्ताला विचारले.

किसनने त्या महिलेकडे नीट बघितले.

''व्हय की रं.. तीच दिसतेय.'' किसनने दुजोरा दिला.

समोर सविता काहीही हालचाल न करता निपचित पडलेली होती. तिच्या शरीरावर जागोजागी जखमा होत्या. तिची अवस्था अत्यंत वाईट होती.

''बिबटं तर नसेल ना आलं?''

''नाय रे! इकडे कुठला बिबट्या यायला?''

''काय सांगता येत नाही. परवा पलीकडच्या गावातल्या शेतात असाच हल्ला करून चार सहा गुरं

मारली की त्याने...''

त्यांच्या त्या गप्पा सुरू असताना अजून दोघेतिघेजण तिथे आले. त्यांनीही समोर जखमी अवस्थेत पडलेल्या सविताला ओळखले. मग त्यांच्यातल्याच एकाने चिखलठाणा पोलीस स्टेशनमध्ये या घटनेची माहिती दिली.

घटनेची खबर मिळताच चिखलठाणा पोलीस स्टेशनमध्ये कर्तव्यावर असलेले पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे हे पोलीस पथक घेऊन त्वरित घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी सर्वप्रथम जखमी महिलेला रुग्णालयात पाठवण्याची व्यवस्था केली. तसेच चिखलठाणा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित यांना दरवडे साहेबांनी घटनास्थळ सील करण्यास व घटनास्थळी असलेले पुरावे हस्तगत करण्यास सांगितले. गुन्ह्याच्या घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावरून फॉरेन्सिक टीमच्या साहाय्याने साधी माती व रक्तमिश्रित माती, तुटलेल्या बांगड्या, मंगळसूत्र, ब्लेड कटर, चप्पल, केस इत्यादी गोष्टी जप्त करण्यात आल्या. तसेच घटनास्थळाचे व्हिडिओ शूटिंग करण्यात आले. आजूबाजूला जमलेल्या लोकांकडे पोलिसांनी चौकशी केली असता जखमी महिलेचे नाव सविता असल्याचे त्यांना समजले.

दरम्यान दरवडे साहेबांनी सदर घटनेची माहिती त्वरित पोलीस अधीक्षकांना तसेच पोलीस नियंत्रण कक्षाला दिली. तसेच फिंगर प्रिंट एक्स्पर्ट, डॉग स्क्वॉड यांना पाचारण करण्यात आले.



**त्यांच्या त्या गप्पा सुरू असताना अजून दोघेतिघेजण तिथे आले. त्यांनीही समोर जखमी अवस्थेत पडलेल्या सविताला ओळखले. मग त्यांच्यातल्याच एकाने चिखलठाणा पोलीस स्टेशनमध्ये या घटनेची माहिती दिली.**

पोलीस उपनिरीक्षक पंडित यांनी चौकशीला सुरुवात केली. ''तुम्ही कोणाला बघितलं का तिच्यावर हल्ला करताना किंवा असं काही?''

''नाही साहेब. आम्ही या रस्त्याने जात होतो तेव्हा हिला पाहिलं. पण एवढ्या जखमा, एवढी वाईट हालत होती तिची... असं वाटलं जनावराने हल्लाबिल्ला केलाय की काय...''

''ठीक आहे.''

त्यानंतर साहेब एका बाजूला जाऊन आपल्या सहकाऱ्यांना म्हणाले, ''जनावराचा हल्ला नक्कीच नाही कारण आपल्याला वेपन मिळालं आहे. गुन्हेगार वेपन मागे सोडून गेलाय. आता त्याला शोधण्याच्या बाबतीत आपल्याला डॉगचीच मदत होऊ शकेल.''

त्यानंतर श्वानाला कटरचा वास देऊन त्याच्या मदतीने पोलिसांनी गुन्हेगाराचा माग काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हा काही अंतर जाऊन श्वान एका घरापाशी घुटमळत राहिला.

***

''कशी कंडिशन आहे डॉक्टर त्या बाईंची?''

''फार ब्रूटल ॲटॅक आहे. तिला शुद्धीवर यायला वेळ लागेल.''

''साधारण किती वेळ?''

''नक्की सांगू शकत नाही, पण निदान दोन-तीन दिवस तरी लागतील. त्याच्यानंतर तुम्ही स्टेटमेंट रेकॉर्ड करू शकता. पण ते करतानाही खूप काळजी घ्यावी लागेल, ती बाई प्रचंड ट्रॉमामधून जात आहे. वुई कान्ट इमॅजिन द अमाऊंट ऑफ पेन शी इज गोईंग थ्रू... सो, जस्ट बी केअरफुल!'' डॉक्टरांनी आपले मत व्यक्त केले

नंतर दोन दिवस पोलीस सविताच्या शुद्धीवर येण्याची वाट बघत होते. अखेरीस ती शुद्धीवर आली. त्यानंतर ई साक्ष प्रणालीद्वारे तिचा जबाब नोंदवण्यात आला. यात

तिच्या जबाबाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले. हे रेकॉर्डिंग पुढे मा. न्यायालयात सादर केले गेले. तिने दिलेल्या जबानीनुसार तसेच श्वानाने काढलेला माग विचारात घेऊन आरोपी म्हणून रमेश याचे नाव निष्पन्न करण्यात आले.

''या माणसाला आता लवकरात लवकर शोधून काढायचंय आपल्याला. हा नक्की पळून जाण्याचा प्रयत्न करणार. जरा याच्याबद्दल माहिती काढा. आपल्या खबरींना अलर्ट करा, आणि जोरदार सर्च ऑपरेशन राबवा. मी स्वतः एक टीम लीड करतो. याला लवकरात लवकर ताब्यात घ्यायला पाहिजे.'' दरवडे साहेबांनी आपल्या सहकारी अंमलदारांना सूचना दिल्या आणि लगोलग पोलिसांच्या टीम्स तयार केल्या. त्यानंतर पोलिसांच्या पथकांनी रमेशचा शोध घेण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले. गुप्त बातमीदारांनाही त्याची माहिती काढायला सांगितले गेले.

लवकरच पोलिसांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची माहिती हाती लागली. साहेबांचा फोन वाजला.

''दरवडे साहेब, जयहिंद. मी भिला बोलतोय.''

''बोल भिला. काय खबर?''

''एवढं मोठं कांड करून आता तोंड काळं करत पलीकडच्या गावातल्या वेतोबाच्या डोंगरावर लपून बसलाय.''

''आणखी काही खबर?''

''साहेब, गावातच त्याचा मामा राहतो. मला माहिती नाही की ही इन्फर्मेशन तुम्हाला कोणी दिली आहे की नाही... पण या मामाकडे नक्कीच काहीतरी खबर असणार असं वाटतं.''

''ठीक आहे. पाहतो आम्ही. आधी तर या लांडग्याला ताब्यात घ्यायला हवं. अजून काही माहिती मिळाली तर कळव.''



**रमेश आणि त्याचा मामा सखा यांच्या पोलिसी चौकशीदरम्यान बऱ्याच गोष्टी समोर आल्या. रमेश सवितावर एकतर्फी प्रेम करत होता. पण त्याला ती प्रतिसाद देत नव्हती. त्यावरून त्याचा तिच्यावर राग होता.**

''नक्की साहेब! जय हिंद!!''

''जय हिंद...''

पोलीस निरीक्षक दरवडे साहेबांनी तत्काळ चलाख व हुशार अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित यांना आरोपीला ताब्यात घेण्यासाठी सूचना दिल्या. त्याप्रमाणे पंडित यांनी चलाखीने आरोपीस ताब्यात घेतले.

वेतोबाचा डोंगर म्हणजे चारी बाजूंनी गर्द रान असलेली एक टेकडी होती. टेकडीवर एक देऊळ होते आणि असंख्य छोट्या छोट्या गुहा तयार झाल्या होत्या. रमेश अशाच कुठेतरी कपारीत आडोशाला लपून बसलेला असण्याची शक्यता होती. पोलीस पथकांनी जोरदार शोधमोहीम सुरू केली. आणि लवकरच रमेश यांच्या ताब्यात आला.

रमेशला घेऊन पोलीस पथक चिखलठाणा पोलीस स्टेशनच्या दिशेला रवाना झाले. त्याच वेळी ड्युटीवरील एका अंमलदारांचा साहेबांना फोन आला.

''साहेब त्या मामाला ताब्यात घेतलंय चौकशीसाठी.''

''ठीक आहे. आता मेन कल्प्रिटपण आपल्या हाती लागला आहे. त्याच्याकडूनही कळेल सगळं. आम्ही निघालोच आहोत. तुम्ही तोपर्यंत मामांचा पाहुणचार करा.''

''येस सर!''

***

रमेश आणि त्याचा मामा सखा यांच्या पोलिसी चौकशीदरम्यान बऱ्याच गोष्टी समोर आल्या. रमेश सवितावर एकतर्फी प्रेम करत होता. पण त्याला ती प्रतिसाद देत नव्हती. त्यावरून त्याचा तिच्यावर राग होता. सविताच्या म्हणण्याप्रमाणे रमेशची नजर आणि नियतदेखील चांगली

नव्हती. त्याच्यावरून तिने अनेकदा रमेशला टोकलेदेखील होते. पण त्याला काडीमात्र फरक पडत नव्हता. चंदूच्या बाबतीत घडलेल्या 'त्या' प्रकारानंतर मात्र सविता चांगलीच संतापली होती आणि त्यातूनच चार मित्रांच्या देखत तिने रमेशला चांगलेच फैलावर घेत पार आईबहिणींचा उद्धार करण्यापर्यंत मजल मारली होती. तेव्हाच तिला धडा शिकवण्याचा रमेशने निश्चय केला होता. त्याप्रमाणे तिला ठार मारण्याच्या हेतूनेच त्याने तिच्यावर हल्ला केला होता. तब्बल साडेतीनशेपेक्षा जास्त टाके पडलेल्या गंभीर जखमा सविताच्या शरीरावर होत्या. मनावरच्या जखमा तर अजून खोल होत्या आणि त्या भरून यायला कित्येक दिवस कदाचित महिनेही लागणार होते.

रमेशने हल्ला करून पळ काढल्यानंतर तो आधी घरी गेला होता आणि आपले रक्ताळलेले कपडे त्याने जाळून टाकले होते. त्यामुळेच श्वानाला कटरचा वास दिल्यानंतर श्वान त्याच्या घराभोवती घुटमळत राहिला होता. आपला मोबाईल त्याने आधीच मामाकडे नेऊन ठेवला होता.

पोलिसांनी रमेश याला कपडे जाळून टाकलेली जागा दाखवण्यास सांगितले. त्यानंतर त्या ठिकाणावरून कपड्यांची राख जप्त करण्यात आली. तसेच त्याने गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटरसायकलही ताब्यात घेण्यात आली. सर्व जप्त मुद्देमाल सीए तपासणीसाठी पाठवण्यात आला. कटरचा क्युरी रिपोर्ट घेण्यात आला. फिर्यादी व आरोपीचे ब्लड सॅम्पल्स, फिर्यादीच्या नखांचे



**रमेशने हल्ला करून पळ काढल्यानंतर तो आधी घरी गेला होता आणि आपले रक्ताळलेले कपडे त्याने जाळून टाकले होते. त्यामुळेच श्वानाला कटरचा वास दिल्यानंतर श्वान त्याच्या घराभोवती घुटमळत राहिला होता.**

सॅम्पल्स, डीएनए प्रोफाइलिंग जतन करून रासायनिक विश्लेषणाकरिता पाठवण्यात आले. त्याचप्रमाणे आरोपीच्या व फिर्यादीच्या मोबाईल नंबरचे सीडीआर व एसडीआर घेण्यात आले. सीए तपासणीचा अहवाल प्राप्त करून घेण्यात आला. गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा. न्यायालयात विहित मुदतीच्या आत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

आता वेळ आली होती पीडितेला न्याय देण्याची आणि पोलीस निरीक्षक दरवडे साहेब, पोलीस उपनिरीक्षक पंडित, आणि पोलीस अंमलदार रत्नपारखी, झेरे यांच्या कष्टाची. मा. सत्र न्यायालय, छ. संभाजीनगर येथे केस बोर्डावर आली व सदर केसच्या सुनावणीदरम्यान दरवडे साहेब आणि पंडित यांनी वेळोवेळी कोर्ट कामकाजाचा आढावा घेतला, तसेच छ. संभाजीनगर (ग्रा.) पोलीस अधीक्षक कार्यालयातील कन्व्हिक्शन सेल यांनी केसच्या तारखांवर वेळोवेळी नियंत्रण ठेवले. अखेरीस ई साक्ष हा तांत्रिक पुरावा कामाला आला व पीडितेला तिच्या जखमांचा न्याय मिळाला.

आरोपी रमेश याला मा. न्यायालयाने भान्यासं १०९ (१) अन्वये १० वर्षे सश्रम कारावास, भान्यासं ७६ अन्वये ३ वर्षे सश्रम कारावास, आणि भान्यासं ६२ अन्वये ५ वर्षे सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावलेली आहे.

छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) पोलीस घटकातील चिखलठाणा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविकिरण दरवडे, सहा. पोलीस निरीक्षक प्रफुल्ल साबळे, पोलीस उपनिरीक्षक सतीश पंडित, तसेच पोलीस अंमलदार सचिन रत्नपारखे व सुनील ढेरे यांनी सदर प्रकरणाचा तपास उत्कृष्ट प्रकारे पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***



एस वाय संदे
छत्रपती संभाजीनगर

# एमपीएससी पूर्व परीक्षा यशासाठी आवश्यक वाचनसूची




राज्यसेवा पूर्व परीक्षा ही महाराष्ट्रातील गट–अ व गट–ब पदांसाठीची स्पर्धा परीक्षा आहे. या परीक्षेत यश मिळवण्यासाठी केवळ अभ्यास पुरेसा

नसून योग्य पुस्तकांची निवड (Booklist Selection) अत्यंत महत्त्वाची ठरते. राज्यसेवा पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम व्यापक आहे. इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, विज्ञान-तंत्रज्ञान, पर्यावरण, चालू घडामोडी आणि CSAT असे अनेक विषय यात समाविष्ट आहेत. त्यामुळे उमेदवाराने मर्यादित पण प्रमाणित (standard) पुस्तके निवडून त्यांचे सखोल अध्ययन करणे आवश्यक असते. खूप पुस्तके बदलत राहणे किंवा विविध स्रोतांमधून विखुरलेला अभ्यास करणे टाळावे.

## सामान्य विज्ञान (General Science)

सामान्य विज्ञानासाठी संकल्पना स्पष्ट असणे अत्यावश्यक आहे. मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता ८ वी ते १० वी च्या राज्य मंडळाच्या पुस्तकांपासून भक्कम पाया तयार करावा. संदर्भासाठी डॉ. सचिन भस्के किंवा कोलते सरांचे पुस्तक उपयुक्त ठरते. इंग्रजी माध्यमासाठी इयत्ता ६ वी ते १० वीच्या NCERT पुस्तकांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

तसेच Lucent & General Science हे पुस्तक वस्तुनिष्ठ तयारीसाठी प्रभावी आहे. दोन्ही माध्यमांसाठी Lucent & GK मधील विज्ञान विभाग हा फॅक्ट्सची तयारी करण्यासाठी उपयुक्त आहे. विज्ञान या विषयावर राज्यसेवा पूर्व परीक्षेत २० प्रश्न विचारले जातात. यातून या विषयाचे महत्त्व अधोरेखित होते. हा विषय समजून घेत असताना मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करणे अत्यंत गरजेचे आहे. मागील किमान १० वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून महत्त्वाचे टॉपिक्स तयार करावेत.

## इतिहास (History)

इतिहास विषयात महाराष्ट्राचा इतिहास, समाजसुधारक आणि आधुनिक भारत यांचा सखोल अभ्यास आवश्यक आहे. महाराष्ट्र इतिहासासाठी इयत्ता ११ वी चे जुने राज्य मंडळाचे (पिवळे) पुस्तक अनिवार्य मानले जाते. समाजसुधारकांसाठी विपुल थोरमोटे (लोकसेवा प्रकाशन) किंवा अमित देशमुख (सिम्प्लीफाईड प्रकाशन) यांची पुस्तके उपयुक्त आहेत.

**विज्ञान या विषयावर राज्यसेवा पूर्व परीक्षेत २० प्रश्न विचारले जातात. यातून या विषयाचे महत्त्व अधोरेखित होते. हा विषय समजून घेत असताना मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करणे अत्यंत गरजेचे आहे.**

आधुनिक भारताच्या इतिहासासाठी मराठीत समाधान महाजन किंवा रंजन कोळंबे यांची पुस्तके चांगली मानली जातात, तर इंग्रजी माध्यमासाठी Spectrum चे पुस्तक सर्वोत्तम पर्याय आहे. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासासाठी Lucent GK किंवा राज्य मंडळाची पुस्तके पुरेशी ठरतात. इतिहास हा विषय अभ्यासत असताना मागील प्रश्नपत्रिकांचे विश्लेषण करून त्यातील ठोकताळे समजून घेणे गरजेचे ठरते.

## भूगोल (Geography)

भूगोल विषयात महाराष्ट्र, भारत व जगाचा भूगोल स्वतंत्रपणे अभ्यासणे आवश्यक आहे. मराठी माध्यमासाठी दीपस्तंभ प्रकाशन किंवा ए. बी. सवदी (निराली प्रकाशन) यांची पुस्तके उपयुक्त आहेत. भारत व जगाच्या भूगोलासाठी इयत्ता ११ वी व १२ वीची NCERT किंवा इयत्ता ८ वी ते १० वीची राज्य मंडळाची पुस्तके अभ्यासावीत. भूगोल विषय अभ्यासत असताना नकाशाचे स्वतंत्र अध्ययन महत्त्वपूर्ण ठरते.

## भारतीय राज्यघटना (Polity)

भारतीय राज्यघटनेसाठी एम. लक्ष्मीकांत यांचे पुस्तक दोन्ही माध्यमांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते आणि त्याचा मराठी अनुवादही उपलब्ध



आहे. पंचायत राजसाठी मराठीत मनोज राऊत किंवा किशोर लवटे यांची पुस्तके उपयुक्त आहेत. सुरुवातीच्या टप्प्यावर मराठी माध्यमासाठी रंजन कोळंबे यांचे पुस्तक विषयाची सोपी ओळख करून देते. महत्त्वाच्या संकल्पना आणि मूलभूत तयारीसाठी स्टेट बोर्डची पॉलिटीची पुस्तके वाचून घ्यावीत.

भारतीय राज्यव्यवस्था एम लक्ष्मीकांत या पुस्तकातील तक्ते, विशेष संदर्भ, पुस्तकाच्या शेवटी असणारे चार्ट्स अत्यंत महत्त्वाचे आहेत.

## अर्थव्यवस्था (Economy)

राज्यसेवा पूर्व परीक्षा (MPSC Prelims) अर्थशास्त्र विषयासाठी बेसिक पुस्तके अशी असावीत ज्यात मूलभूत संकल्पना, भारतीय अर्थव्यवस्था, विकास, दारिद्र्य, आर्थिक सुधारणा, नियोजन यांचा अभ्यास सोपा आणि परीक्षाभिमुख पद्धतीने करता येतो. मूलभूत तयारी आणि संकल्पना समजून घेण्यासाठी महाराष्ट्र स्टेट बोर्ड ची अर्थशास्त्राची अकरावी व बारावीची पुस्तके मुख्य आहेत. याशिवाय इंग्रजी माध्यमातून एनसीईआरटी इकॉनॉमिक्स दहावी, अकरावी आणि बारावी ही पुस्तके वाचावीत.

## पर्यावरण (Environment)

पर्यावरण विषयासाठी मराठी माध्यमात तुषार घोरपडे (सह्याद्री प्रकाशन) यांचे पुस्तक उपयुक्त मानले जाते. इंग्रजी माध्यमासाठी PMF IAS किंवा Shankar IAS यांची पुस्तके संदर्भासाठी वापरली जाऊ शकतात.

**चालू घडामोडींसाठी नियमित वाचन अत्यावश्यक आहे. मराठी माध्यमाच्या उमेदवारांसाठी परिक्रमा, सिम्प्लीफाईड किंवा अभिनव ही मासिके उपयुक्त आहेत.**

## चालू घडामोडी (Current Affairs)

चालू घडामोडींसाठी नियमित वाचन अत्यावश्यक आहे. मराठी माध्यमाच्या उमेदवारांसाठी परिक्रमा, सिम्प्लीफाईड किंवा अभिनव ही मासिके उपयुक्त आहेत. इंग्रजी माध्यमासाठी PW MPSC Walla चे मॅगझिन वापरता येते. वृत्तपत्रांमध्ये मराठीसाठी लोकसत्ता किंवा महाराष्ट्र टाइम्स, तर इंग्रजीसाठी The Hindu किंवा Indian Express नियमित वाचणे आवश्यक आहे.

एमपीएससी परीक्षेत यश मिळवण्यासाठी योग्य पुस्तकांची निवड, सातत्यपूर्ण अभ्यास आणि वारंवार उजळणी हे तीन घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. प्रत्येक विषयासाठी एक दर्जेदार पुस्तक निवडून त्यावर प्रभुत्व मिळवणे आणि नियमित सराव करणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. ▪



अनिल जावकर

# ‘नि’चे निर्मल, निर्व्याज निवेदन

निटनेटके जीवन जगता यावे या कारणास्तव प्रत्येक जण अहर्निश प्रयत्न करत असतो. या प्रयत्नांमध्ये सुसूत्रता आली असता निश्चितच त्याचे फळ आपल्याला मिळू शकते. जीवन सुफल संपन्न होण्याकरिता निम्नलिखित दहा तत्त्वांचा आपल्या दैनंदिन आयुष्यात समावेश केला पाहिजे व नित्यनियमाने त्यांना आचरणात आणले पाहिजे. त्यांचे पालन केले पाहिजे.

## १ निस्सिम निष्ठा:

आपल्या जीवनात जे श्रद्धास्थान असते त्यावर आपली निस्सीम निष्ठा असते. त्याचबरोबर आपली स्वत:वर निष्ठा असली पाहिजे. लोक काय म्हणतील हे गौण आहे. आपले अंतर्मन काय सांगते हे ऐकणे महत्त्वाचे आहे.

‘व्यक्ति तितक्या प्रकृती’ ह्या उक्तीनुसार प्रत्येकजण यथाशक्ति मार्गक्रमण करीत असतो. आपण कुणाचे अनुकरण न करता जे आपल्याला धार्जिणे आहे ते अंगीकारले पाहिजे. अपयश आल्यास खचून न जाता त्यापासून शिकून घेतले पाहिजे.

संकटाशी दोन हात केले पाहिजेत. संकट हे प्रगतीचा जोडीदार आहे. चुका झाल्या तर त्या निस्तरून आपले ध्येय साधण्याच्या दृष्टीने आगेकूच केली पाहिजे. थांबला तो संपला. काळ कुणासाठी थांबत नाही. उद्या आज काय होणार आहे? काळ काळ आहे. तेव्हा आपल्या वाट्याला आलेला काळाचा सदुपयोग करा. गेलेली वेळ परत येत नाही.

## २ निर्धार पक्का करा:

आपण कोण आहोत, काय करत आहोत कुठे चाललो आहोत, आपले इप्सित काय? असे हृदयाचा ठाव घेणारे प्रश्न आपण स्वत:ला विचारले पाहिजेत. मनाची जडणघडण जशी असते तसे आपले आचरण असते. ‘यत् भावो तत् भवति’. मानवी मनाचे सतरा घटक असतात. पंचप्राण –प्राण, अपान, व्यान, समान, उदान, पंचद्रिये –डोळे, नाक,

कान, जीभ, त्वचा', पंच कर्मेंद्रिये –हात, पाय, लिंग, गुदा, वाणी', मन व मती. दहिहंडी हस्तगत करण्यासाठी एकावर एक थर रचले जातात, तद्वत आपल्या मनामध्ये सतरा घटक चढत्या भाजणीमध्ये मांडलेले असतात. मती सर्वात वर असते. मतीच्या आज्ञेबरहुकूम अन्य सोळा घटक कार्यान्वित होतात. मतीचे आधिपत्य स्विकारून माणूस सकारात्मक वागतो अथवा नकारात्मक, संविधानिक कार्य करतो अथवा संहारक, महान बनतो अथवा लहान तेव्हा साधकबाधक विचार करून आपण स्वत: ठरवायचे आहे, की आपण कोण होणार आहोत? वाल्या कोळी की ऋषी वाल्मिकी?

मानवजन्म एकदाच मिळतो. तो सत्कारणी लावणे केव्हाही श्रेयस्कर. निर्धार पक्का झाला, की मग आपले वांच्छित मिळविण्याच्या दृष्टीने मोर्चेबांधणी करा. हातपाय हलवा आणि कुठल्याही परिस्थितीत हार मानू नका. असाध्य ते साध्य करिता सायास कारण अभ्यास तुका म्हणे

## ३ नियोजन:

संकल्पापासून कार्यसिद्धीपर्यंत प्रत्येक स्तरावर काटेकोर नियोजन असणे गरजेचे आहे. ध्येयसिद्धीचा मार्ग खडतर आहे. अडचणींवर मात करून पुढे कूच करणे आवश्यक आहे. कुठून या फंदात पडलो असा विचार मनात आल्याशिवाय राहात नाही. सर्वसंगपरित्याग करून संन्यास घ्यावा असा विचार मनात आला तर त्यात काही नवल नाही. आपले स्वप्न धुळीस मिळणार, आर्थिक फटका बसणार, समाजात हसे होणार असे नकारात्मक विचार उद्भवणे साहजीक आहे. चहुबाजुंनी कोंडी झाली असता, 'न ते श्रातंस्य सख्याय देवा' या उक्तीनुसार अनपेक्षितरित्या मदतीचा हात पुढे येतो. आपला गजेंद्र मोक्ष होतो. आपल्या कष्टाचे फळ आपल्याला मिळते. इतके दिवस काटकसर केली, कोंड्याचा मांडा केला, मन मारून राहिलो त्याचे चीज झाले. नियोजनाने वेळ निभावून नेली.

**मानवजन्म एकदाच मिळतो. तो सत्कारणी लावणे केव्हाही श्रेयस्कर. निर्धार पक्का झाला, की मग आपले वांच्छित मिळविण्याच्या दृष्टीने मोर्चेबांधणी करा. हातपाय हलवा आणि कुठल्याही परिस्थितीत हार मानू नका.**

## ४ नियंत्रण:

अडचणींचे निवारण निराकारण करण्यासाठी नियंत्रण निकडीचे आहे. आचरणात अगोचरपणा नसावा, जिभेला हाड असावे, व्यसने टाळावीत. 'विनाशकाले विपरीत बुद्धी' असा प्रकार असल्याने मती चळू देऊ नका. मायावी सुवर्ण मृग प्रलोभन दाखवितो. त्याला बळी पडू नका. क्रीप्टो करन्सी, सट्टाबाजार, पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष, गुप्त धन, सायबर चोर असे अनेक सापळे मार्गात असतात. स्वत:वर नियंत्रण ठेवा, अंकुश लावा. लक्ष्मण रेषा ओलांडण्याचे साहस करू नका.

आहारात सत्व, वागण्यात तत्त्व, वाचेत ममत्व असल्यास जीवनाला महत्त्व येते. जीवन सार्थकी लागते.वाहनाला ब्रेक तद्वत जीवनाला नियंत्रण.

## ५ निर्बंध:

दैनंदिन व्यवहारात निर्बंध असावेत. उदाहरणार्थ दररोज सकाळी चार अथवा पाच वाजता उठावे. रविवार अथवा सुट्टीचा वार असला तरी आपली आन्हिके उरकून व्यायाम करावा. त्यासाठी महागड्या जिममध्ये जाण्याची जरूरी नाही.

गच्चीवर सूर्यनमस्कार, योगाभ्यास, उठाबशा काढाव्यात. बागेत पाणी घालावे. फिरायला जावे. आरंभशूर असू नये. घेतला वसा टाकू नये. आहारात सात्विकता असावी. जंक फूड टाळावे.

मादक पदार्थांचे सेवन करू नये. दोन घास कमी खाणे केव्हाही उत्तम. हे सारे स्वेच्छेने स्वहितासाठी अवलंबावे. भिडस्तपणा सोडावा. निर्भिड व्हावे. लाजेकाजेस्तव, लोक काय म्हणतील असा बोटचेपेपणा करू नये. स्पष्ट नकार देण्यास शिकावे. तोंडदेखलेपणा करू नये. धरबंद ठेवावा. बेबंद होऊ नये.

## ६ नियमित निवेष:

अनाहूत अतिथीसाठी बेगमी करणे आवश्यक आहे. वेळ कधी सांगून येत नाही. प्रभू तेरी माया, कभी धूप कभी साया या वचनाप्रमाणे आयुष्यात उतारचढाव, सुख दु:ख, जीवन मरण अटळ आहे. कधी आपण सुपात असतो, कधी जात्यात. 'नलिनी दल गतजलम् तितरलम्, तद्वत जीवीत अती चपलम्.' अर्थात आयुष्य अळवावरचे पाणी आहे. 'न कलका भरोसा, न पलका' असे संत कबीर म्हणतात. अशा वेळेस आपण आपल्या प्रियजनांसाठी आयुष्याची शिदेरी बांधून ठेवणे जरूरीचे आहे. आपल्या कमाईतला एक ठरावीक हिस्सा सातत्याने बाजूला करून कुठेतरी गुंतवला पाहिजे. पोस्ट ऑफिस, बँक, म्युच्युअल फंड असे अनेक विकल्प उपलब्ध आहेत. जमीन घेणे, घर बांधणे, जुन्या घराचा पुनर्विकास करणे केव्हाही फायदेशीर असते. मुलीसाठी सुकन्या योजना आहे. मुलासाठी शिक्षण विमा आहे. स्वत:साठी व पत्नीसाठी आयुर्विमा आहे. आयुष्यभर काबाडकष्ट केले शेवटचे चार दिवस सुखाचे जावोत या दृष्टीने योग्य ती तरतूद आता विनाविलंब करा. मृत्युपश्चात करा. ते रितसर रजिष्टर करा. मात्र कुणाला सांगू नका.

## ७ निर्मिती:

**श्रीकृष्णावर स्यमंतक हिरा अपहरण केल्याचा आळ आला होता. कुणावर कसा कधी कशामुळे प्रसंग येईल हे समजून घेण्याकरिता शनिमाहात्म्य पठण करावे. गंडांतर आपल्या पाचवीला पुजलेले आहे.**

मेंदू दुपाखी असतो.उजव्या बाजूचे वर्चस्व असल्यास माणूस रसीक असतो. डाव्या बाजूचे वर्चस्व असल्यास माणूस व्यावहारिक असतो. संतुलित मेंदू दुर्लभ. माणूस एकतर व्यापार क्षेत्रात रस घेतो अथवा कला क्षेत्रात. त्या अनुषंगाने त्याच्या हातून काही ना काही निर्मिती होत असते.निर्मिती मूर्त असते अथवा अमूर्त. मूर्त निर्मिती दृग्घोचर होते? अमूर्त निर्मिती दृष्टीस पडत नाही, परंतु गात्रांना जाणवते. निर्मिती दुधारी असते.

संहारक अथवा संवर्धक असते. मेंदूमध्ये विचारांची निर्मिती होते. हे विचार कार्यान्वित होतात. बाळसं धरतात व सिंदबादच्या कथेमधील संमंधाप्रमाणे मानगुटीवर बसतात. विचारांनी पछाडलेली व्यक्ती जिवाचे रान करते व त्यांना मूर्त स्वरूपात आणते. त्यानुसार कुठे विध्वंसक कृत्ये घडतात तर कुठे विधायक कार्ये. उत्पत्ती–स्थिती–क्षती अशा तीन अवस्थांमधून निर्मितीचे स्थित्यंतर होते व पुढे ती लयास जाते. कालस्य कुटीला गती

## ८ निष्कलंक:

निष्कपट निरव्खळ निपज निव्वळ मृगजळ आहे. सितेने अग्नी प्रवेश करून आपले चारित्र्य अबाधित आहे हे सिद्ध केले? आपण मर्त्य मानव? आपण जेव्हा संकल्प सोडतो तेव्हा प्रथम आपण टिकेला सामोरे जातो. महात्मा फुले व सावित्रीबाई ह्यांच्यावर किटाळ उडविले गेले, परंतु त्या दोघांनी हाती घेतलेले कार्य तडीस नेले. श्रीकृष्णावर स्यमंतक हिरा अपहरण केल्याचा आळ आला होता. कुणावर कसा कधी कशामुळे प्रसंग येईल हे समजून घेण्याकरिता शनिमाहात्म्य पठण करावे. गंडांतर आपल्या पाचवीला पुजलेले आहे. ते क्रमप्राप्त आहे. कठीण समय येता कोण कामास येतो? 'सुख मे सब साथी, दुखमे न कोय' ह्याची अनुभुती येते. संकटातून आपण तावूनसलाखून बाहेर पडतो. आपला

आत्मविश्वास वाढतो.आत्मसन्मान वाढतो. आपण आत्मनिर्भर होतो? ‘रंग लाती है हीना पत्थरसे पिसने के बाद’ असे शायर म्हणतात. तेव्हा चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न होतच असतो. जया अंगी मोठेपण तया यातना कठीण. कुणाची भरभराट असते, कुणाचा असतो जळफळाट. संकट महामेरू नसून गुरू आहे.

## ९ निर्विवाद:

‘पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना’ अर्थात प्रत्येक व्यक्तीची क्षमता, वैचारिक बैठक, आवडनिवड, जडणघडण, आकलन वेगळे असते. तुटे वाद तो संवाद ह्या वचनानुसार वादविवाद, मतभेद, निषेध आदी टाळावे. शाब्दिक चकमक मुळात सुरू न करणे अधिक श्रेयस्कर. जिभेला हाड असणे उत्तम. आपण भावनाप्रधान भाषा वापरतो. भावना हृदयातून उगम पावतात.

हृदयामध्ये चार खण असतात. मी बरा, तुम्ही बरे असा पहिला खण असतो. इथून उमटणारी भावना मृदू असते. भाषा प्रेमळ असते. दुसऱ्या खणात मी चांगला, तुम्ही वाईट. अशी अहंभावना असते. भाषेत दर्पोक्ती असते. तिसऱ्या खणात तुम्ही चांगले, मी वाईट असा न्यूनगंड असतो. भाषा लाळघोटी असते.

चौथ्या खणात, मी भले वाईट पण तुम्ही अधिक वाईट असा कडेलोट असतो भाषा जहाल असते. प्रसंगानुरूप भाषा बदलते. वर्तन बदलते व काट्याचा नायटा होतो. ‘शब्द सम्हारे बोलिये, शब्द के हाथ न पाव, एक शब्द औषधी करे, एक करे घाव’ असा उपदेश संत कबीर करतात. आपण जे बोलतो ते शब्द असतात. जे बोलत नाही, ते अव्यक्त विचार असतात. बोलायचे टाळतो तो सुज्ञपणा असतो. भाषेवर

हृदयामध्ये चार खण असतात. मी बरा, तुम्ही बरे असा पहिला खण असतो. इथून उमटणारी भावना मृदू असते. भाषा प्रेमळ असते. दुसऱ्या खणात मी चांगला, तुम्ही वाईट. अशी अहंभावना असते.

निर्बंध असल्यास आयुष्य निरायम होते हे सत्य निर्विवाद आहे.

## १० निरवा निरव:

जगातले सर्वात मोठे आश्चर्य कोणते असा प्रश्न यक्षाने केला तेव्हा, मर्त्य मानव स्वत:ला अमर समजतो हे जगातले सर्वात मोठे आश्चर्य आहे असे धर्मराजाने उत्तर दिले. संध्या छाया भिववीती हृदया हा टप्पा आपण गाठतो तेव्हा ब्रम्हांड आठवते. सिंहावलोकन केले असता केवळ वाळवंट दिसते. तप्त फुपाटा तुडविला, पदरी काय पडले?

ज्यांच्यासाठी खस्ता खाल्ल्या ते आपल्याला बाहेरचा रस्ता दाखवीत आहेत. काय फळ मम तापाला अन्नासाठी दाही दिशा फिरवीशी जगदिशा अशा रितीने आयुष्याची वाट तुडविली. अंत:काळी नाही कुणी कुणाचा हेच खरे. ‘पुनरपी जननम्, पुनरपी मरणम्, पुनरपी जननी जठरे शयनम्’ असे हे रहाटगाडगे आहे. शेवटची निरवानिरव करीत असताना वाटते देवाने मनुष्य जन्म एकदाच दिला हे खरोखर बरे केले. ▪

S.B.Collect

छापील/ई-मासिकाची ऑनलाईन वर्गणी भरण्यासाठी भेट द्या:

https://www.mahapolice.gov.in/daksha-pay.php

अथवा

खालील क्युआर कोड मोबाईलमध्ये स्कॅन करा





राष्ट्रपाल लोखंडे
पोलीस उपनिरीक्षक
एमआयडीसी पोलीस ठाणे
लातूर

# उलगडा

माणसाचे मन ही जगातली एक अतिशय गूढ बाब आहे. माणसाच्या मनात कधी काय येईल आणि मनातले पूर्ण करण्यासाठी तो काय करेल हे कोणालाही पटकन ओळखणे अवघड असते. थोड्या वेळापूर्वी हसणारी बोलणारी शलाका ही महिला ही पुढच्याच क्षणी कायमची बोलायची थांबली. का घडले असे? तिच्या नवरा-रोहितच्या मनात आलेल्या गोष्टीमुळे तिच्यावर ही वेळ आली का? पोलिसांना शलाकाच्या घरात रोहितची नेमकी कोणती गोष्ट मिळाली?



लातूरमधील अवंतीनगर व त्याच्या बाजूचा परिसर हा तसा फारसा रहदारीचा नव्हता. हा भाग एमआयडीसीच्या जवळ असल्याने ठरावीक वेळेलाच इथले रस्ते माणसांनी भरून जात असत. ते म्हणजे औद्योगिक वसाहतीतले कारखाने, उद्योगधंदे यांची शटर्स खालती केली जायची तेव्हा. याच अवंतीनगरमध्ये शलाका आपले आईवडील व आपल्या लहानग्या अशोकबरोबर राहात असे.

''शलाकाऽऽ, ए शलाका, आम्ही जरा बाहेर जाऊन येतो गं.'' शांती साडीचा पदर सारखा करत आपल्या लेकीला म्हणाली.



**योगेश चिंचोळकर**
पोलीस अंमलदार
एमआयडीसी पोलीस ठाणे
लातूर



**ज्ञानेश्वर दत्तगिरे**
पोलीस अंमलदार
एमआयडीसी पोलीस ठाणे
लातूर



**सचिन गिरी**
पोलीस अंमलदार
एमआयडीसी पोलीस ठाणे
लातूर



**बीटी हिंगडे**
महिला पोलीस अंमलदार
एमआयडीसी पोलीस ठाणे
लातूर

आपले आईवडील बाहेर पडल्यावर तिने घराचा दरवाजा लावला. सकाळी उठल्यापासूनच तिला बेचैन वाटत होते. तिने विसरण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तिला शांतीने–ज्या हॉटेलात काम करत होती–तिथे दोन दिवसांपूर्वी घडलेला प्रसंग सांगितल्याचे आठवत होते. ते आठवले, की तिच्या अंगाचा थरकाप होत असे.

''आऽई..'' अशी बोबडी हाक मारत अशोक आईने कुशीत घ्यावे म्हणून तो तिच्याकडे झेपावला. ती खाली वाकून त्याला कडेवर घेणार तेवढ्यात दारावरची बेल वाजली. तिने त्याला नंतर कडेवर घेऊ असा विचार केला आणि ती दरवाजा उघडण्यासाठी दरवाजाच्या दिशेने गेली. तिने दरवाजा उघडला. बाहेर उभ्या असलेल्या माणसाला बघताच तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. तिने दरवाजा लावण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

''तुला किती वेळा सांगितलं आपला काही संबंध नाहीये... तुला एकदा सांगून कळत नाही?''

''असा कसा संबंध नाही? लगीन झालंय आपलं. हा अशोक आपल्या दोघांचा पोरगा आहे.''

''हो, झालं आहे ना आपलं लग्न, पण आता तुझा माझ्याशी



**शलाकाच्या दंडाला जोराने ओढत रोहित तिला स्वत:कडे ओढू लागला. तिने त्याच्या हाताला हिसका देऊन स्वत:ला सोडवण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली.**

आणि अशोकशी काही संबंध नाही. तुझी सावलीसुद्धा पडू देणार नाही मी माझ्या पोरावर.'' डोळे मोठे करून रोहितकडे बघत ती म्हणाली.

''तुझ्या पोरावर? हे बघ, मला माझ्या पोराला भेटण्यापासून कोणीही थांबवू शकत नाही. ना तू, ना दुसरं कोण. आणि तुम्हाला दोघांना आपल्या घरी घेऊन जायला आलोय मी. मुकाट्यानं घरी चल आपल्या.'' शलाकाच्या दंडाला जोराने ओढत रोहित तिला स्वत:कडे ओढू लागला. तिने त्याच्या हाताला हिसका देऊन स्वत:ला सोडवण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली. थोड्या वेळाने त्या घरातून मोठमोठाले ओरडण्याचे आवाज बाहेर ऐकू यायला लागले. पण आजूबाजूच्या लोकांसाठी ही नित्याची गोष्ट होती. काही वेळाने घराबाहेरून जाणाऱ्या माण्साने एक मोठी किंकाळी ऐकली. तिथल्या शांततेला ही किंकाळी भेदून गेली. या किंकाळीनंतर लगेच अशोक बाहेर आला. त्याच्या कपड्यांवर सगळीकडे रक्ताचे डाग होते. तिथे असलेल्या लोकांना त्याच्याकडे बघून जरा विचित्र वाटले. त्यातल्या काहींनी तिच्या घराचा लोटलेला दरवाजा उघडून बघितला, तर शलाका जमिनीवर रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. हे समोरचे हादरवून टाकणारे दृष्य बघताच काही लोकांनी तातडीने लातूरमधील एमआयडीसी पोलीस ठाण्यात फोन केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असणारे राष्ट्रपाल लोखंडे पोलीस पथकासह घटनास्थळाकडे रवाना झाले. त्यावेळी त्या रस्त्याला फारशी गर्दी नसल्याने पोलीस काही वेळातच घटनास्थळी दाखल झाले.

पोलीस घटनास्थळी पोहोचेपर्यंत

शलाकाचे आईवडील तिथे आलेले होते. शांता आपल्या लेकीच्या पायापाशी कपाळाला हात लावून बसली होती. तर शांताचा नवरा– मंगेश– तिथेच असलेल्या भिंतीला टेकून हताश नजरेने आपल्या मुलीच्या त्या निष्प्राण देहाकडे बघत बसला होता. लोखंडे साहेबांच्या वाक्यांनी ते दोघेही अचानक भानावर आल्यासारखे झाले.

पोलिसांनी तिच्या मृतदेहाचा इन्क्वेस्ट पंचनामा केला. तिच्या गळा, छाती, पोट, मांडी व देहावर अनेक ठिकाणी वार केल्याच्या खुणा होत्या. यानंतर मंगेश व शांता यांनी शलाकाच्या खुनाची फिर्याद नोंदवली. लोखंडे साहेबांनी तिचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला. दोन पंचांसमक्ष घटस्थळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. घटनास्थळावरून पोलिसांनी शलाकाने परिधान केलेले कपडे तसेच अन्य महत्त्वाचे भौतिक पुरावे हस्तगत केले. लोखंडे साहेबांनी आपले लक्ष आता शांती आणि मंगेशकडे वळवले.

''कोण करू शकतं हे सगळं? तुमचे किंवा तुमच्या मुलीचे कोणाशी वाद किंवा काही भांडण वगैरे?''

''साहेब, त्या नालायकानंच केलं असणार हे सगळं. नक्कीच.''

''हो साहेब. दुसरं कोणी हे करूच शकत नाही. त्या रोहितचंच काम असणार.'' शांतीच्या बोलण्याला दुजोरा देत मंगेश म्हणाला.

''हा रोहित कोण?''

''आमच्या शालीचा नवरा. अशोकचा बाप. हे सगळं करताना त्या हरामखोराच्या डोक्यात अशोकचा विचारही आला नाही.''

''हे बघा, काही काळजी करू नका. तुमच्या मुलीला नक्की न्याय मिळणार. गुन्हेगार सुटणार नाही.'' साहेब त्या खचलेल्या आईवडिलांना धीर देत म्हणाले. साहेबांनी आता संशयित असलेल्या रोहितचा



**एका खाजगी वैद्यकीय तज्ज्ञाच्या दारापुढे पोलिसांचे वाहन थोड्या वेळात येऊन थांबले. पोलिसांनी रिसेप्शनवर संशयिताविषयी चौकशी केली तेव्हा त्यांना तो त्या खाजगी तज्ज्ञाच्या समोर असल्याचे त्यांना समजले.**

शोध सुरू केला. पोलिसांनी केलेल्या तपासात काही लोकांनी त्याला शलाका राहत असलेल्या आईवडिलांच्या घरी येताना बघितले असल्याचे समोर आले होते. पोलिसांनी सर्व महत्त्वाचे साक्षीदार तपासून त्यांचे सीआरपीसी ६४ अन्वये जबाब नोंदवून घेतले.

या तपासादरम्यान संशयिताच्या ठावठिकाण्याबद्दल पोलिसांना माहिती मिळाली. माहितीची खातरजमा होताच पोलिसांनी आपला मोर्चा उद्‌गीरच्या दिशेने वळवला.

एका खाजगी वैद्यकीय तज्ज्ञाच्या दारापुढे पोलिसांचे वाहन थोड्या वेळात येऊन थांबले. पोलिसांनी रिसेप्शनवर संशयिताविषयी चौकशी केली तेव्हा त्यांना तो त्या खाजगी तज्ज्ञाच्या समोर असल्याचे त्यांना समजले. पोलीस त्या ठिकाणी दाखल झाले. पोलिसांना बघितल्यावर रोहितने लक्ष नसल्याचे भासवले.

''डॉक्टर, काय झालं आहे यांना?''

''वेल, ऑफिसर त्यांच्या एका ॲक्सिडेंटमध्ये हाताला जखम झाली आहे. मी बँडेज केलंय. पण तुम्ही का बरं विचारताय हे सगळं?''

लोखंडे साहेबांनी सांगितलेली माहिती कळल्यावर त्या तज्ज्ञानेही पोलिसांना सहकार्य केले. त्याला घेऊन पोलिसांचा ताफा आता उद्‌गीरच्या जिल्हा रुग्णालयाच्या आवारात दाखल झाला.

रुग्णालयातील वैद्यकीय तज्ज्ञाकडून रोहितची मेडिकल करण्यात आली. तसेच पोलिसांनी त्यांच्याकडून रोहितला झालेल्या त्या जखमांबाबतचे प्रमाणपत्रही संपादित केले. नंतर रोहितसह पोलीस पथकाचा प्रवास उद्‌गीरच्या दिशेने सुरू झाला. या पूर्ण प्रवासादरम्यान रोहित एकही अक्षर बोलला नाही. तो

पूर्ण वेळ मुका असल्याप्रमाणे बसून होता. काही वेळातच पोलिसांचा ताफा उद्‌गीर पोलीस ठाण्याच्या आवारात येऊन दाखल झाला.

''पूर्ण रस्ताभर तू एकही शब्द बोलला नाहीस. आता तुला फार काळ असं गप्प बसता येणार नाही. बोल, का मारलं शलाकाला?''

साहेबांच्या या प्रश्नावर त्याने फक्त मान वर करून एकदा त्यांच्याकडे बघितले आणि परत मान खालती घालून बसला.

''एऽऽ... साहेब काय विचारतात ते कळत नाही? असं नाटक करू नकोस. आम्ही फसणार नाही तुझ्या या नाटकांना. पटकन उत्तर दे साहेबांनी विचारलेल्या प्रश्नाचं.'' पोलीस अंमलदार म्हणून कार्यरत असणाऱ्या योगेश चिंचोळकर यांनी त्याला दरडावले.

''चिंचोळकर, सांगणार तो सगळं. एक काम करा.'' असे म्हणत त्यांनी अंमलदार चिंचोळकरांना त्याची एक महत्त्वाची गोष्ट आणण्याची सूचना केली. चिंचोळकरांनीही ती गोष्ट तातडीने साहेबांना दिली. ती गोष्ट बघितल्यावर मात्र रोहितचा चेहरा पांढराफटक झाला.

''हे बघ, तू उगाच 'मी तिथे नव्हतो, मी तर दुसरीकडे होतो,' असं सांगणार. त्यापेक्षा तू तिथे त्यावेळी होतास याचा हा पुरावा! तू तिथे नसशील तर याला काय पाय फुटले का शलाकाच्या घरी जायला?''

''मग काय करणार होतो मी अजून दुसरं? माझ्यापुढे काही पर्यायच ठेवला नव्हता त्या बाईनं.''

''म्हणून काय मारायचं?''

''अहो साहेब, मी आधी कितीदा मिनतवाऱ्या केल्या तिच्या



**सर्व हस्तगत गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवून दिल्या. पोलिसांनी शलाकाचा शवविच्छेदन अहवालही संपदित केला.**

आणि तिच्या घरच्यांच्या तिनी परत घरी यावं म्हणून, पण ते कोणी ऐकून घ्यायलाच तयार नव्हते. सारखं आपलं वेगळं व्हायच्याच गोष्टी करायच्या. शिवाय अशोकला पण भेटू देत नव्हते. त्याला मोठं होताना बघणं एक बाप म्हणून हक्क आहे माझा. तो पण मला मिळत नव्हता. तिनी यावं परत म्हणून तिची आई ज्या हॉटेलात कामाला जाते तिथे जाऊनपण मी राडा केला. म्हणजे शरमेने घाबरून जाऊन तरी ते पाठवतील. पण काही उपयोग नाही. म्हणून मग मी शेवटी सोक्षमोक्ष लावण्याचा निर्णय घेतला आणि गेलो तर ती नाही म्हणाली. भांडायला लागली माझ्याशी. मग माझंपण डोकं सटकलं. काढला चाकू बाहेर आणि सपासप मारलं तिला. तेव्हा मलाही थोडंसं लागलं. ती खालती पडली. तेव्हा हे आधार कार्ड पडलं असेल तिथे. म्हणून मग गेलो तिथून. पुढे उद्‌गीरला आलो, तर तुम्ही धरलं मला.''

पोलिसांनी निवेदन पंचनाम्याने रोहितकडून त्याने वापरलेला चाकू, त्याचे गुन्हा करताना परिधान केलेले कपडे या गोष्टी संकलित केल्या. सर्व हस्तगत गोष्टी पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेकडे पाठवून दिल्या. पोलिसांनी शलाकाचा शवविच्छेदन अहवालही संपदित केला. सर्व पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी मा. न्यायालयात रोहितविरोधात दोषारोपपत्र सादर केले. समोर आलेले सर्व साक्षीपुरावे ग्राह्य धरून रोहितला भादंवि कलम ३०२ अन्वये आजन्म सश्रम कारावास आणि १०,००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणाचा तपास एमआयडीसी पोलीस ठाणे, लातूर येथील पोलीस उपनिरीक्षक राष्ट्रपाल लोखंडे, पोलीस अंमलदार योगेश चिंचोळकर, ज्ञानेश्वर दत्तगिरे, सचिन गिरी व महिला पोलीस अंमलदार बी. टी. हिंगडे यांनी कौशल्याने पूर्ण केला आहे. ■ ***(कथा सत्यघटनेवर आधारित असून पात्रांची नावे व काही प्रसंग बदलले आहेत.)***

कथा



सचिन बेंडभर
पुणे

# प्रयत्ने वाळूचे कण रगडता...



साधारणत: पाच वर्षांपूर्वीची गोष्ट. दिवाळी पाडव्याची ती रात्र होती. आम्ही रात्रीचे जेवण उरकून पोर्चमध्ये गप्पा मारत बसलो होतो. आमच्या घरचे एक वैशिष्ट्य म्हणजे रात्रीचे जेवण सर्वजण बरोबरच करतो. त्यामुळे दिवसभरातील घडामोडी, घडणाऱ्या गमती-जमती, अनेक विनोदी किस्से आमच्या बैठकीत चांगलेच रंगतात. त्या दिवशीही जेवण उरकून आम्ही गप्पांमध्ये चांगलेच रंगलो होतो. तेवढ्यात बाहेरून 'धावाऽऽ धावाऽऽ ऊस पेटला' असा आवाज ऐकू आला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आम्ही धावतच गेलो, तर गडी माणसे

घोळक्या घोळक्याने शेताकडे धावत होते. पाठोपाठ आम्हीही तिकडे धावलो.

शेताकडे सगळा उजेडच उजेड दिसत होता. अग्नीच्या ज्वाला आकाशाकडे बेफाम होत जात होत्या. त्या ज्वाळांनी आता उग्र रूप धारण केले होते.ऊसापेक्षाही वर या ज्वाळा दिसत होत्या. आम्ही ऊसाजवळ पोहोचलो.आगीचा तो रुद्रावतार पाहून प्रत्येकाचेच अंग शहारत होते. शेतात अग्नितांडव चालू होते अन् आम्ही पाहण्यापलीकडे काही करू शकत नव्हतो.

प्रत्येकाचेच ऊस शेजारी शेजारी होते. त्यामुळे आता आगीच्या तडाख्यातून काही शिल्लक राहणार नाही हे आम्हाला कळून चुकले होते. तेवढ्यात आप्पा काठी टेकवत-टेकवत पुढे आले अन् म्हणाले,

''पोरांनो तुम्ही धीर सोडू नका. पेटलेला ऊस सोडून द्या. निदान बाकीचा तरी वाचवा.''

''कसा वाचवायचा आप्पा?'' शरद बोलला.

''आरं पोरांनो पेटत्या ऊसाचा अन् चांगल्या ऊसाचा संपर्क तोडा. हा एकच पर्याय आपल्याकडे शिल्लक हाये. बघता काय? घुसा.''

पण ऊसात घुसण्याची हिंमत कुणाचीच होईना. प्रत्येकजण एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागला. एवढ्या मोठ्या अग्नीतांडवात झोकून द्यायचे म्हणजे मृत्यूला आव्हान दिल्यासारखेच होते.प्रत्येकजण

**मागे वळून पाहतो तर काय? आप्पा बेधडक ऊसात घुसले अन् काठीने सपासप वार करत ऊस बाजूला करू लागले. ऐंशी वर्षांच्या आप्पांमध्ये तरुणालाही लाजवेल अशी अफाट शक्ती आणि चैतन्य संचारले होते. त्यांचा तो आवेश पाहून सगळे बेफाम झाले. अन् ऊसावर तुटून पडले. आम्हाला आलेले पाहून आप्पांचा उत्साह अधिकच वाढला.**

मान खाली घालून मागे फिरला. पाठोपाठ आम्हीही!

आम्ही आठ दहा फुटही गेलो नसू तेवढ्यात 'आप्पाऽऽ आप्पाऽऽ...' ओरडल्याचा आवाज आला. मागे वळून पाहतो तर काय? आप्पा बेधडक ऊसात घुसले अन् काठीने सपासप वार करत ऊस बाजूला करू लागले. ऐंशी वर्षांच्या आप्पांमध्ये तरुणालाही लाजवेल अशी अफाट शक्ती आणि चैतन्य संचारले होते. त्यांचा तो आवेश पाहून सगळे बेफाम झाले अन् ऊसावर तुटून पडले. आम्हाला आलेले पाहून आप्पांचा उत्साह अधिकच वाढला.

''शाब्बास रं पठ्यांनो, लढाऽऽ मी तुमच्याबरोबरच आहे. मुंडकी कापली तर ट्रॅक्टर भरणं एवढी ल्वाक हायेत आपली. तुम्ही घाबरू नका.व्हा म्होरं... घुसा''

आप्पा आम्हाला धीर देत होते अन् आम्ही पुढे पुढे सरकत होतो. एव्हाना ज्याला ऊस पेटल्याची बातमी समजली, तो तत्काळ घटनास्थळी पोहोचला. बघता बघता शंभर - सव्वाशे लोक जमा झाले होते. आम्ही पुढे सरकत सरकत निम्म्यापर्यंत गेलो. पुढून आग आडवी आल्याचे दिसत होते. त्यामुळे हृदयाचे ठोकेही वाढत चालले होते. कारण आगीत चहुबाजूने सापडले, तर जगण्याची गॅरंटीच नव्हती. शेवटी काळजावर दगड ठेवून पुढचा प्रवास केला अन् अखेर अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात आम्हाला यश आले. सगळे घामाघूम झाले होते.शेवटी मोकळ्या पडक्या जागेत सर्वांनीच अंगं टाकले अन् सुटकेचा नि:श्वास सोडला. खरेच, त्या दिवशी प्रयत्नाने अन् सर्वांच्या सहकार्याने अशक्य गोष्टही आम्हाला शक्य करता आली. आम्हाला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे आप्पा मात्र आता आमच्यात राहिले नाही. पण त्यांचे विचार अजूनही आम्हाला नवसंजीवनी देतात. ■

# डायल ११२ च्या तत्परतेमुळे

## अपहृत तरुणीची

# तीन तासांमध्ये सुखरूप सुटका

डायल ११२ वर ११ मे २०२४ रोजी काळजाचा ठोका चुकवणारा एक कॉल आला. कॉल करणारी व्यक्ती ही पीडिता सायरा या सतरा वर्षीय तरुणीची आई होती. तिने दिलेल्या माहितीनुसार सायरा पोलीस भरतीची तयारी करत होती आणि त्याच्या तयारीसाठी क्लासला गेली होती पण तिथून ती परत आली नाही. सायराने आपल्या आईला व्हॉट्सॲपवर तिचे अपहरण करून कुठल्यातरी गाडीवाल्याने तिला नेल्याचे सांगितले होते. कोणालातरी लवकर पाठवण्याची विनंती ही तिने यावेळी केली होती.

**पोलिसांची कारवाई-**

घटनेचे गांभीर्य ओळखून डायल ११२ येथील सुपरवायझर सहा.पोलीस निरीक्षक दिपाली राऊत यांनी सर्वप्रथम सदर माहिती गाडगे नगर पोलीस ठाण्याचे प्रभारी गोरखनाथ जाधव यांना दिली. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनासुद्धा याबाबत अवगत केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने हालचाली सुरू केल्या. राऊत मॅडम आणि त्यांच्या टीमने मुलीचा मोबाईल क्रमांक तांत्रिक विश्लेषणाकरिता सायबर पोलीस शाखेकडे दिला. मुलीच्या लोकेशनचे निरीक्षण केले असता सदर लोकेशन प्रथम धामणगाव नंतर पुलगाव आणि नंतर आर्वी असे सातत्याने बदलत होते. मिळालेल्या लोकेशनचे बारकाईने अवलोकन केले



दिपाली राऊत
**सहा. पोलीस निरीक्षक**
**डायल ११२,**
**अमरावती शहर**



विशाखा तिरमारे
**महिला पोलीस अंमलदार**
**डायल ११२,**
**अमरावती शहर**



अलका भुडके
**महिला पोलीस अंमलदार**
**डायल ११२,**
**अमरावती शहर**

असता सर्व लोकेशन्स ही रेल्वे लाईनला समांतर असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. त्यावेळेस कोणती रेल्वे त्या मार्गाने जाते का या माहितीचा मागोवा घेतला असता त्यावेळेस महाराष्ट्र एक्सप्रेस धामणगाववरून नागपूरकडे जात असल्याचे समजले.

नागपूर जीआरपी यांनी गाडी प्लॅटफॉर्मवर येण्यापूर्वीच चोख बंदोबस्त ठेवत गाडी स्टेशनवर थांबताच पोलिसांनी डब्याची झडती घेतली. त्या वेळेला त्यांना सायरा महाराष्ट्र एक्सप्रेसमध्ये मिळून आली. नागपूर जीआरपी यांनी संशयित मुलीला आपल्या ताब्यात घेऊन अधिक विचारपूस केली असता चौकशीअंती ही सायराच असल्याचे निष्पन्न झाले. मुलगी सापडल्याची माहिती नागपूर जीआरपी यांनी अमरावती शहर येथील कक्ष ११२ आणि गाडगे नगर पोलीस यांना कळवले. गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी आपली एक टीम नागपूरला रवाना करून मुलीला सुखरूप अमरावतीत आणले व तिच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले.

**निष्कर्ष**–

सध्याच्या काळात गुन्हेगार हायटेक होत असतानाच पोलीस दल देखील तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या दोन पाऊल पुढे जाऊन त्यांना शह देत आहे, याचे जिवंत उदाहरण हे अमरावती शहर पोलीस दलाच्या सतर्कतेमुळे समोर आले आहे. एका अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचा कॉल प्राप्त होताच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अवघ्या तीन तासांमध्ये नागपूर रेल्वे स्थानकावर सापळा रचून मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली.

सदर प्रकरणाचा तपास हा डायल ११२ च्या सहा. पोलीस निरीक्षक दिपाली राऊत, महिला पोलीस अंमलदार अलका भुडके व विशाखा तिरमारे यांनी केला आहे. ■

## कविता

# निसर्गगीत

दाट दाटल्या आभाळी, धरीत्रीची ओली माया,
एका एका थेंबातून बहरते हिरवी काया

वारा होऊन फितुर, जातो सुगंधा लेवून,
चिंब गवताचं पातं जातं दवात न्हाऊन.

ओल्या वेली फुलांमध्ये वारा फुलवितो रास,
संथ जळावर साजे, जलतरंगी आरास.

लाल लाली या नभाची, हिरव्या शालूत खुलते,
नव्या नवरीची जणू लाज गालात फुलते.

असा भ्रमरांचा पिंगा, कळी कळी फुलवितो,
भर तारुण्याचा असा ओघ प्रेमाचा वाहतो.

आल्या गेल्या सरींमध्ये फेर धरिती सावल्या,
रास खेळताना जणू गोपी रंगात नाहल्या.

दिव्य तपस्वी वटवृक्ष, नित्य ध्यानस्थ राहतो,
लीन विनित होऊन हा निर्झर वाहतो.

असं कोवळं हे रान, जणू हळद लेवून,
माय साजरी ही माझी, ल्याली सौभाग्याचं लेणं.

क्षितिजाच्या खांद्यावरी अशी झुकवून मान,
दिस डोंगरी फुलवी इंद्रधनुची कमान.

भिजलेला वृद्ध वृक्ष, रासक्रीडा या पाहतो,
गुंफलेल्या वेलींमध्ये भूत भविष्य वाहतो.

सरीआड सरी येती, पाठशिवण खेळती,
खिळलेलं माझं मन, कधी सांडून पळती.

भाळी केसरी हा टिळा, मोतियांच्या माळा गळा,
लावण्याच्या खाणीमध्ये फुले पाचूंचा हा मळा



**बाळकृष्ण ठाणगे**
अहिल्यानगर



कै. रामराव नारायण हाटे

# दिवंगत हाटे दांपत्याच्या स्मरणार्थ



कै. लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे

## बक्षिस योजना

श्री. रमेश रामराव हाटे (Bombay Helpline Consultancy Services India Pvt. Ltd.) व Smt. Laxmidevi Ram Narayan Hate Charitable Trust यांच्याकडून त्यांचे दिवंगत वडील रामराव नारायण हाटे, तत्कालीन पोलीस अधीक्षक, क्राईम ब्रांच २, सीआयडी आणि दिवंगत आई लक्ष्मीदेवी राम नारायण हाटे यांचे स्मरणार्थ दिलेल्या रकमेतून दक्षता मासिकातील सर्वोत्कृष्ट तपासकथा, लेख/कविता/कथा यांच्यासाठी दरमहा बक्षीस योजना सुरू करण्यात आली आहे.

सदर बक्षीस योजनेअंतर्गत माहे जुलै २०२६ मधील बक्षीसप्राप्त विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे:

| तपशील | तपासकथा/ लेख/कविता यांचे नाव | विजेत्याचे नाव | रक्कम |
|---|---|---|---|
| सर्वोत्कृष्ट तपासकथा प्रथम क्रमांक | सौदा | वैशाली गोरडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, बदलापूर (प.) पोलीस ठाणे, ठाणे शहर | रु. ७,०००/- |
| सर्वोत्कृष्ट तपासकथा व्दितीय क्रमांक | संशयात्मा | सर्जेराव सानप, पोलीस उपनिरीक्षक, सातारा पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर | रु. ५,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता प्रथम क्रमांक | मूल्याधिष्ठित शिक्षण- मानवतेच्या पुनर्निर्मितीची अत्यावश्यक दिशा | कविता पेन्शनवार, नाशिक | रु. ३,०००/- |
| सर्वोत्कृष्ट लेख/ कथा/कविता व्दितीय क्रमांक | वाटणी | उत्तम सदाकाळ | रु. २,०००/- |



# ओल्या नारळाच्या करंज्या

## ओल्या नारळाच्या करंज्या

### साहित्य:

३ कप नारळाचा चव

दीड कप गूळ

२ टेबलस्पून तूप

१ टीस्पून वेलचीपूड, जायफळ पूड

२ कप रवा

२ टेबलस्पून तेल

१ टेबलस्पून खसखस

२ टेबलस्पून काजूचे तुकडे

२ टेबलस्पून बदामाचे तुकडे

चवीनुसार मीठ

तळण्यासाठी तेल

### कृती:

१. रवा निवडून स्वच्छ करून घ्या. चवीनुसार मीठ घालून मिक्स करा.

२. दोन टेबलस्पून तेल कडकडीत गरम करून मोहन ओतून सर्व रव्याला चोळून घ्या.

३. लागेल तसे पाणी घालून सैलसर पीठ मळून घ्या.

४. झाकून एक तास बाजूला ठेवा.

५. कढईमध्ये खसखस भाजून घ्या व तूप गरम करून त्यात काजू, बदाम यांचे तुकडे तळून घ्या.

६. उरलेल्या तुपामध्ये खोबऱ्याचा चव घालून दोन मिनिटे परतून घ्या व गूळ घालून मिक्स करून मिश्रण सुके होईपर्यंत हलवत राहा.

७. काजू बदामाचे तुकडे, खसखस मिक्स करा.

८. पिठाचे भाग करून थोडे थोडे मिक्सरच्या भांड्यात घालून मिक्सरमध्ये फिरवून घ्या म्हणजे मऊसूत पीठ तयार होईल.

९. छोटे छोटे गोळे करून पारी



# नारळीभात

लाटून घ्या.

१०. त्यात सारण भरून करंज्या बनवून घ्या किंवा करंजीच्या साच्याने करंज्या करून घ्या.

११. मिडीयम गॅसवर तेल गरम करून त्यात सर्व तयार करंज्या खरपूस तळून घ्या.

१२. सर्व्हिंग प्लेटमध्ये काढून गरमगरम खायला घ्या.

## नारळीभात

### साहित्य:

१ कप आंबेमोहोर तांदूळ

१ कप खोवलेला नारळ

३/४ कप गूळ

१/४ कप साखर

१/२ कप काजू, बदाम, बेदाणे

१/२ टे. स्पून वेलची पावडर

१ टीस्पून पूड

५-६ लवंगा

२ टे. स्पून साजूक तूप

### कृती:

१. तांदूळ स्वच्छ धुऊन १०-१२ मिनिटे धुवून निथळून ठेवा.

२. नारळ खोवून घ्या.

३. गूळ बारीक चिरून घेऊन गूळ व साखर एकत्र करून घ्या.

४. कुकर गरम करून त्यात एक टेबलस्पून तूप गरम करून त्यात लवंगा घालून परतून घ्या.

५. त्यात तांदूळ घालून दोन तीन मिनिटे परतून त्यात १+३/४ कप पाणी घालून दोन शिट्ट्या काढून भात शिजवून घ्या.

६. कुकरची वाफ मुरल्यावर भात मोकळा करून त्यात गूळ, साखर व खोवलेला नारळ घालून चांगले मिक्स करा.

७. काजू बदामाचे काप, बेदाणे, वेलची पावडर, तूप हे सर्व घालून चांगले मिक्स करून गूळ विरघळून घ्या.

८. मिश्रणाला चांगली वाफ काढा.

९. तयार झालेला नारळी भात डिश मध्ये काढून वरून काजू बदामाचे काप, खोवलेला नारळ घालून सर्व्ह करा.

# शब्दकोडे



**आडवे शब्द**

१. मद्य ३. झकास, उत्कृष्ट ७. गाय ८. मोकळीक १०. दु:ख १२. पगार १३. मच्छर १४. चोर १५. कब्जा १६. न टिकणारे २०. सारखा २१. सजीव व निर्जीव यांनी बनलेली सृष्टी २३. बोकड २४. नफा २५. गवगवा, प्रसिद्धी २७. परिणाम २८. छाया ३०. चौकीदार ३२. सुट्टी ३३. नेहमी ३४. बळकट

**उभे शब्द :**

२. सौंदर्याने उन्मत्त स्त्री ४. मिळालेल्या यशाने अफाट प्रसिद्धी मिळालेले ५. तीळ ६. शावक ९. एक जमात ११. दगड, विटा, माती आदींचा ढिगारा १६. नाव १७. फसवणूक १८. लाकडी फळ्यांपासून बनवलेली छोटी नाव १९. मंद सुगंध २०. पाण्याने भरलेले (डोळे) २२. कथेतून सांगायचे तत्त्व २३. एक फूल २४. प्रश्न आणि उत्तर यांमधून होणारा संवाद २६. वरात (हिंदी शब्द) २७. भेद २९. उणे ३१. पत्नी

## दक्षताच्या वाचकांसाठी खुशखबर...

दक्षता मासिकाशी वाचकांचा स्नेहबंध असाच टिकून राहावा व जास्तीत जास्त वाचक दक्षता परिवाराशी जोडले जावेत या हेतूने आम्ही काही उपक्रम हाती घेतले आहेत. यापैकीच एक म्हणजे अचूक शब्दकोडे सोडवणाऱ्या तीन स्पर्धकांना विजेते म्हणून घोषित केले जाणार आहे आणि त्यांना रोख पारितोषिकही दिले जाणार आहे. त्यासाठी स्पर्धकांनी मूळ शब्दकोडे अचूक सोडवून त्याचे कात्रण, आपले नाव, अचूक पत्ता, पिन कोड, संपर्क क्रमांक तसेच बँकेचा अकाऊंट नंबर व आयएफएससी कोड या माहितीसह आमच्या दक्षताच्या पत्त्यावर त्या महिन्याच्या पंचवीस तारखेपर्यंत पाठवणे आवश्यक आहे. दर महिन्याला विजेत्यांची निवड केली जाईल व पुढील महिन्यामध्ये विजेत्यांची नावे जाहीर केली जाऊन त्यांचे बँक खात्यात ऑनलाईन बक्षिसाची रक्कम वर्ग करण्यात येईल. यासाठी आपला भरघोस प्रतिसाद अपेक्षित आहे.

**बक्षिसे : पहिले ₹५००/-, दुसरे ₹३००/-, तिसरे ₹२००/-**

# जुलै २०२६ च्या अंकात प्रसिद्ध झालेल्या शब्दकोड्याचे उत्तर व स्पर्धेतील विजेत्यांची नावे

नाव : ____________________

पत्ता : ____________________

____________________ मोबाईल : ____________________

अकाऊंट नं : ____________________ आयएफएससी कोड ____________________

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वे | त | न | | व | न | च | र | | गा |
| ष्ट | | य | व | न | | | ज | म | णे |
| न | म | न | | दा | ता | च्या | क | ण्या | |
| | दा | | बा | | ले | | | र | सा |
| द | ल | द | ल | | वा | प | र | | व |
| वा | सा | | | | र | द | ब | द | ली |
| खा | | स | वि | ता | | र | | र | |
| ना | म | क | र | ण | | मो | रा | व | ळा |
| | सा | ल | स | | प | ड | व | ळ | |
| भा | ला | | | मा | सा | | ण | | भू |



१. अविनाश चंद्रकांत मुंजे, नागपूर

# लाखो वाचक

## ज्याची आतुरतेने वाट पाहतात!

महाराष्ट्र राज्य पोलिसांचे मुखपत्र

# दक्षता

सर्वदूर पोहोचलेले वाचकप्रिय मासिक




नागरिक आणि महाराष्ट्र पोलीस यांच्यातील महत्त्वाचा दुवा असलेले, सर्वोच्च खपाचे, ५१ वर्षांची दर्जेदार परंपरा असलेले मराठी मासिक

- रोमांचकारी सत्यकथा,
- विविध उत्कंठावर्धक सदरे,
- जनता व पोलीस यांच्यातील जिव्हाळा जपणारे वाङ्मय
- रसिक वाचकांच्या पसंतीस उतरेल असे दर्जेदार साहित्य...

**आपली प्रत आजच राखून ठेवा!**

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

पत्रव्यवहारासाठी पत्ताः

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
दूरध्वनीः ०२२-२२८३४५११/२२०४९७०१
mpd.dakshata@mahapolice.gov.in

वर्गणीसाठी दूरध्वनीः ०२२-२२८३४५११

DAKSHATA Marathi Magazine August 2026. RNI Registration No. 21352/1974. Postal Reg.No. MCS/131/2024-26 Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office GPO, Mumbai - 400 001 on 5th and 6th of every month. Date of Publication is 1st of every month.

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय




**प्रेषक :**

**सरसंपादक, दक्षता**

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई - ४०० ००१

**प्रति,**